म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बालवा.
दा. क्र. ११५४६

दा. क्र. ११९४६.

# माझी शाळा

लेखक
बाबुराव गणपत जगताप

IRBK-0111946
IRBK-0111946

दा. क्रं. ११९४६

# म...ी शाळा

★ ★ ★

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बाल-वाङ्मय
वा. नं. ८९

: लेखक :

बाबूराव गणपतराव जगताप,
बी. ए., बी. टी.

११९४६
आरज वा.

किंमत एक रुपया

IRBK-0111946

जगताप पब्लि... पुणें २.

# माझी शाळा

★
★ ★

: लेखक :

बाबूराव गणपतराव जगताप

बी. ए., बी. टी.

किंमत एक रुपया

जगताप पब्लिशिंग हाऊस, पुणें २.

प्रकाशक :

जयवन्त बाबूराव जगताप,
बी. ए. ( ऑनर्स ); बी. टी.
संचालक, जगताप पब्लिशिंग हाऊस
१२४८ शुक्रवार पेठ, पुणे २.

मुद्रक :

प्र. भा. काळे,
प्रतिभा प्रेस, ३३५ शनवार, पुणे २.

◆ ◆ ◆ ◆

आवृत्ति तिसरी

# अनुक्रम


(१) उपोद्घात .... .... १
(२) इंग्रजी शिक्षणाची तयारी .... .... ७
(३) अखेर मास्तरकी .... .... .... १२
(४) हंगामी शिक्षक .... .... .... १७
(५) लोक काय बोलतात ? .... .... २२
(६) कांहीं कल्पना व माझी नवी शाळा .... ३४
(७) साक्षरता प्रसार .... .... .... ४१
(८) शाळेसाठीं मदत .... .... ... ५२
(९) आरोग्यविषयक प्रयत्न .... .... ६३
(१०) उद्घाटन समारंभ व मे. चेअरमनसाहेब ....
यांचें भाषण .... .... .... ७२
(११) धर्मसाधन .... .... .... ८०
उपसंहार .... .... .... .... ९१

सरकारनें मंजूर केलेलीं

# बा. ग. जगताप यांचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | माझी शाळा (आवृत्ति तिसरी) | १ रुपया |
| २ | शाळा कशी चालवावी (आवृत्ति तिसरी) | १। रुपया |
| ३ | टॉलस्टॉयच्या गोष्टी (आवृत्ति तिसरी) | १॥ रुपया |

---

छापत आहे

४ अध्यापनाचा परिचय

(आवृत्ति तिसरी)

५ शिशुसंगोपन

(आवृत्ति तिसरी)

★

जगताप पब्लिशिंग हाऊस, पुणें २.

वा. भा. वा. २८८ २५।३।९

# माझी शाळा

## उपोद्घात

मे. एज्युकॅशनल इनस्पेक्टर साहेब

—भाग,

यांचे सेवेशी—

अर्जदार खालीं सह्या करणार बोरगांवचे लोक. कारणे अर्ज करतो कीं आमचे गांवची लोकसंख्या ९००।१००० असून गांवास अजून शाळा नाहीं. आम्ही मुलांच्या आईबापांना वळवून पन्नास मुलें जमविलीं आहेत व गेले सहा महिने जिल्हा स्कूल बोर्डाकडे अर्ज करीत आहोंत. परंतु दाद लागत नाहीं. "शाळा देण्यास सवड नाहीं. सवड झाल्याबरोबर मास्तर पाठवूं," असें ठराविक उत्तर येतें. तरी आपण आमचे मायबाप समजून आम्ही आपणाकडे धांव घेतली आहे. तरी आपण शाळाखात्याचे अधिकारी आहांत; कराल तर होणार आहे. गरीबांना ज्ञानदान देण्याचें पुण्य घ्यावें, ही विनंति.

आपले नम्र

बोरगांवचे समस्त गांवकरी मंडळी

---

यास उत्तर इंग्रजी पत्र

नं. एस्. ७२—

पुणें १५-४-१९—

बोरगांवचे नागरिकांस कळविण्यांत येतें कीं ज्याअर्थीं शिक्षणखातें

सरकारनें लोकांचे ताब्यांत दिलें आहे व ज्याअर्थी आपल्या गांवास शाळा देणें ही गोष्ट जिल्हा स्कूल बोर्डाचे अधिकारांत आहे, त्याअर्थी आपण मे. चेअरमनसाहेब स्कूल बोर्ड यांचेकडे शाळा मिळविण्याबद्दल पुनः अर्ज पाठवावा. आम्ही आपला अर्ज स्कूल बोर्डाकडे फेर विचारासाठीं पाठवीत आहोंत. कळावे

सही इंग्रजी
एज्यू. इनस्पेक्टर

---

मे. चेअरमनसाहेब

जिल्हा स्कूल बोर्ड

यांसी विनंति विशेष

आम्ही समस्त बोरगांवचे मंडळींनीं आपणाकडे आतांपर्यंत ५।६ अर्ज केले; परंतु अजून गांवास शाळा मिळाली नाहीं. आम्ही आपणास ५० मुलें जमा करून देण्याची हमी घेत आहोंत. शिवाय शाळेकरितां चांगली जागा पाहून ठेविली आहे. त्या जागेबद्दल आपणास भाडें पडणार नाहीं. मे. एज्यू. इनस्पेक्टरसाहेब यांचेकडे १५ दिवसांपूर्वी अर्ज केला होता, परंतु पुनः आपणाकडे अर्ज करावा असा त्यांनीं आम्हांस हुकूम दिल्यावरून आम्ही हा अर्ज आपणाकडे पाठवीत आहोंत. कसे तरी करून सोय करावी ही विनंति.

आपले नम्र,
गांवकरी मंडळी.

---

## यास स्कूल बोर्डाचें उत्तर

मराठी पत्र

### बोरगांवचे अर्जदार मंडळीस

विनंति विशेष

आपला अर्ज पावला. त्याचप्रमाणें मे. इनस्पेक्टरसाहेब यांचेकडे आपण जो अर्ज केला होता, तोही त्यांचेकडून आम्हाकडे आला आहे. आम्ही आपणास पूर्वी कळविल्याप्रमाणें शाळा देण्यास तयार आहोंत, परंतु १२०० शिक्षकांपेक्षां एकही जास्त शिक्षक लावण्याची परवानगी सरकारकडून न आल्यामुळें व लोकल बोर्डाचीही स्वतः खर्च करण्याची ताकद नसल्यामुळें आपल्या तालुक्यांतील दुसरी एकादी शाळा बंद झाल्याशिवाय आपल्या गांवास शाळा देतां येणार नाहीं. शाळा मिळण्याबद्दल जी चिकाटी व जो उत्साह आपण दाखवितां, त्याबद्दल आम्ही आपलें कौतुक करतो. अशा परिस्थितींत आपणास शक्य असल्यास आपण स्वतः शाळा चालवावी. आपल्या गांवचा किंवा शेजारचे गांवचा एकादा व्ह. फायनल मुलगा थोड्या पैशांत मिळण्यासारखा आहे. आपली शाळा चांगल्या तऱ्हेनें चालल्यास व आम्हास पैशाची सवड झाल्यास एक वर्षानंतर आपणांस थोडीशी ग्रँट देण्याचा विचार करूं.

आपला

चेअरमन

जिल्हा स्कूल बोर्ड

— —

गंगाधरपंत:—काय भाऊ पाटील, हें चेअरमनसाहेबांचें उत्तर आलें आहे.

भाऊ पाटील:—काय, नकार घंटाच असणार!

गंगाधरपंत:—उत्तर पहिल्यासारखेंच आहे; पण आपण स्वतः शाळा चालवावी असा सल्ला त्यांनीं दिला आहे; व एक वर्षानीं मदत देतो असें म्हणत आहेत. (पत्र वाचून दाखवितात.)

भाऊ पाटील:—हे पाहा पंत, मी आहे खेडवळ माणूस. परंतु पत्राचे शब्दावरून मदत मिळेलच असें नक्की कोठें आहे? शाळा **चांगली** चालली तर, **थोडीशी** मदत, **सवड** झाल्यास ते पाठविणार! शाळा चांगली चालली हें ठरविणार तेच! मला काय बुवा फारशी आशा दिसत नाहीं. आहो, बोर्डाचा कारभार. आपण १००।२०० रुपये खर्च करायचे, आणि पुढें मदत मिळाली नाहीं म्हणजे हा मास्तरचा खर्च पुढे करायचा कोणी?

---

गंगाधरपंत:—काय महादबा पाटील? हें चेअरमन साहेबांचें पत्र आलें आहे.

महादबा पाटील:—काय मिळाली शाळा?

गंगाधरपंत:—छे, उत्तर आपलें पहिलेंच मिळालें आहे; पण तुम्ही स्वतः शाळा चालवा आम्ही ग्रँटची मदत करू असें म्हणतात.

महादबा पाटील:—हे पहा, गंगाधरपंत, ही भानगड मला कांहीं समजत नाहीं. भाऊ पाटलांचें या कामांत लक्ष आहे, पण तुम्ही म्हणतां त्यांचीहि या कामांत उभारी दिसत नाहीं. मी कांहीं सर्वांबाहेर नाहीं. दोन मापटी दाणे मीहि देईन. पण ही शाळेची ब्याद एक वर्षापुरती असती तर!

पण आतां तर सक्तीचा कायदा झाला आहे. सरकार शिका शिका म्हणतात. त्या दिवशीं ते मुंबईचे कां पुण्याचे गृहस्थ आले होते, तेही मुलें शाळेला पाठवा, म्हणत होते; आणि इथें पहावें तर आम्ही मुलें जमवून देण्याची व शाळेला जागा फुकट देण्याची हमी घेऊनही नुसता मास्तर मिळत नाहीं आहे तरी काय भानगड! गंगाधरपंत सरकारला काय भीक लागली, काहो? आम्ही गरिबांनीं काय शाळा चालवाव्यात! आणि करायच्यात काय शाळा आम्हाला. कुठें नोकऱ्यां तरी खोळंबून बसल्या आहेत. तो शिरप्या फायनलची परीक्षा पास झाला. वर्षभर घरीं बसून आहे. शेतीही करतां येत नाहीं. आमच्या तरी गुरामाग जायला आमच्या घरांत आमच्या गंग्याशिवाय कोण आहे! आपला तर काय दम चालत नाहीं; बुवा. आपण पाहा. इतर मंडळींना भेटा.

गंगाधरपंत गांवच्या इतर दोनचार लोकांना भेटतात. उत्तर वरील नमुन्याचें.

दुसऱ्या गांवची शाळा. शिक्षक हातांत कागद घेऊन प्रमुख गांवकऱ्याकडे जात आहेत.

शिक्षकः—राम राम, सदूभाऊ!

सदूभाऊः—या मास्तर या. आज काय आणलंय काम?

मास्तरः—काम कांहीं नाहीं. तो परवा आपण अर्ज केला होता बोर्डाकडे-इमारतीसंबंधीं त्याचें उत्तर आलें आहे.

सदूभाऊः—काय, बोर्ड करते इमारत दुरुस्त?

मास्तरः—छे! सध्या पैसे नाहींत, आणखी दोन चार वर्षें तरी बोर्डाला इमारत दुरुस्त करतां येणार नाहीं, असें बोर्ड म्हणत आहे. शाळा गांवकऱ्यांनीं वर्गणी करून दुरुस्त करावी, असें म्हटलें आहे. मी

मुद्दाम याचसाठीं आपल्याकडे आलों आहे. एक दोन पाऊस जर इमारतीनें खाल्ले तर सगळी इमारतच खालीं येईल. बोर्डाला काळजी नसली तर आपण काळजी घेतली पाहिजे. आपलीं मुलें शाळेंत जातात. त्यांचेसाठीं निवाऱ्याची जागा पाहिजे आहे. जशी आपण देवळाकरतां वर्गणी जमा करतां तशीच थोडी वर्गणी शाळेसाठीं जमवावी, असें मला वाटतें. आपण गांवांत वजनदार गृहस्थ आहांत. आपण मनांत जाणाल तर ५।५० रुपये निघण्यासारखे आहेत.

सदूभाऊ:—मास्तर ! आज चार वर्षें देवळाचें काम चाललें आहे. दोन हजारांत देवळ बांधायला आम्ही निघालों आणि ५०० रु. नुसत्या जोत्यांनींच खाल्ले. मला पंचाईत पडली की दोन हजारांत हे सगळें काम कसे होते ! देवाच्या कामाला वर्गणी जमायला मारामार होते, तर शाळेसाठीं वर्गणी देतो कोण ! एक पैसा लोकांच्या हातून सुटायचा म्हणजे मारामार. वर्गणी जमा करायचें दुःख मलाच ठाऊक. तुम्ही पाहा बुवा. त्या हिरामणशेटना भेटा, किंवा दगडू पाटलांना भेटा, परंतु मला तर हें दुसरें काम, एक पुरें झाल्याशिवाय, हातीं घेतां येत नाहीं; माफ करा.

हिरामण शेट:—या मास्तर, आज कुठें ?

मास्तर:—सदूभाऊनीं पाठविलें आहे. बोर्डाचें आपल्या अर्जाला उत्तर आलें आहे. सध्या पैसे नाहींत व दोन चार वर्षें मिळतील असे वाटत नाहीं, तरी गांवकऱ्यांनीं वर्गणी करून इमारत दुरुस्त करावी असें बोर्ड म्हणत आहे.

हिरामण शेट:—वा, वा, हे तर फार चांगले सांगते, स्कूलबोर्ड. जागा स्कूलबोर्डाची, मग गांव काय म्हणून खर्च करील ! बोर्डाचा आमचा संबंध काय ! आम्ही तरी कुणाकुणाला पैका देणार ! नसली

शाळा तर नसली. आम्ही आमच्या दीपचंदला घरीं शिकवूं. पण आमाला काय मदत करणें नाय !

दगडू पाटलाकडूनही तेंच उत्तर.

सरकार म्हणते शाळाखातें आम्ही लोकांच्या–बोर्डाच्या–ताब्यांत दिलें आहे. बोर्ड म्हणते शाळा सरकारच्या आहेत. सरकारची मदत नसेल, खर्च करण्यास परवानगी नसेल तर आम्हास कांहींच करतां येणार नाहीं. वाटल्यास गांवकऱ्यांनीं खर्च करावा, कारण शाळा त्यांच्या मुलांसाठीं आहेत. गांवकरी म्हणतात शाळा बोर्डाच्या, आम्हाला त्याची जरूरी नाहीं. देवळासाठीं हजारानें खर्च करूं पण शाळेसाठीं दहा रुपयाचीही मदत होणार नाही.

शाळा सरकारची नाहीं ! शाळा बोर्डाची नाहीं ! ! शाळा लोकांची नाहीं ! ! !

**मग शाळा कोणाची ?**

---

## प्रकरण १ लें

# इंग्रजी शिक्षणाची तयारी

मी व्हर्न्याक्युलर फायनल झालों. गुणही बरे मिळाले. माझ्या गांवांत पास होणारा विद्यार्थी मी एकटाच व त्यामध्यें जास्त गुण मिळून पास झालेलों, मग काय विचारता ! माझे शेजारी मित्रानें मला पोहायला येण्याबद्दल आग्रह धरला. त्यानें आपल्या घरीं शेतावर भाकरी लवकर पाठविण्यास सांगून ठेविलें व आम्ही आनंदानें गमत रमत, वाटेंत या झाडाचें फळ पाड, त्या झाडावर चढ, असें करीत करीत, एकदाचे

विहीरीवर पोहोंचलों. परीक्षेचा निकाल लागण्यापूर्वी मन साशंक असल्या-मुळें कोणत्याच गोष्टीवर मन लागत नसे. नेहमीं कांहीं विचारानें तें दडपून गेलेलें असे. पण आज तें दडपण निघाल्यामुळें मनाला किती प्रसन्नता मिळाली म्हणून सांगूं, जग म्हणजे खरोखर आनंदानें भरलेलें आहे, याची साक्ष त्यावेळीं मला पटली. नेहमीं १५ मिनिटांत विहिरींत बुचकळी मारून वर निघायाचे पण आज तास होऊन गेला तरी विहीर सोडवेना. विहीर पूर्वीचीच, परंतु आज किती प्यार भासूं लागली. शेवटीं 'आप्पा' म्हणून कोणी हाका मारीत असल्याचे ऐकूं आले. आम्ही दोघेही देहभानावर आलों. एकमेकांकडे पाहून वर सूर्याकडे नजर फेकली. 'चला राव बारा वाजून गेल्या,' असें म्हणून 'आप्पा'—माझा स्नेही--पाण्याबाहेर निघाला. मीही त्याचे पाठोपाठ निघालों. आप्पाच्या धाकटया बहिणीनें-यमूनें-आम्हासाठीं भाकरी आणल्या होत्या. धोतर नेसून तसेच उघडे झाडाखालीं आम्ही जेवायला बसलों. उन्हाची रखरख सभोंवार पसरलेली पण त्या शीतळ छायेमुळें व माझ्या आप्पाच्या स्नेहभावामुळें ती जागा म्हणजे नंदनवन मला भासूं लागली. दोन पितळ्यांत आम्ही जेवण वाढून घेतलें. नेहमीं भाकरी-बरोबर एक कोरडयास-बहुधा झुणका-असावयाचे. चटणी, कांदा हाही सोबत रहावयाचाच, परंतु आज शेजारच्या मावशीबाईनीं आम्हासाठीं ,पापड पाठविले होते.

आम्ही दोघे जेवावयास बसलों. यमू आम्हाला लागेल तें वाढण्या-साठीं जवळ बसली. आमच्याबरोबर जेवण्याबद्दल आम्ही दोघांनीं तिला आग्रह केला; परंतु पुरुषाबरोबर स्त्रियांनीं जेवावयाचे नाहीं, अगोदर पुरुष मग बाया. या कडक कौटुंबिक नियमामुळें यमूनें जेवणाचें साफ नाकारलें. कदाचित् ती जेवलीही असती, पण 'आई काय म्हणेल' या विचारानें तिचा जेवणास धीर होईना.

आमचें जेवण आटोपलें. यमू बाकी उरलेलें अन्न घेऊन घरीं गेली. आम्ही त्या झाडाखालीं चांगले दोन तास झोपलों. अंगावर ऊन आले तेव्हां जागे झालों. हळूच जांभया देत देत उठलों. विहिरीवर जाऊन तोंड धुतलें, संध्याकाळच्याला शेतांतून थोडी भाजी घेतली व घराकडे परतलों.

घरांत पाय ठेवतो तोंच आई ओरडून म्हणाली, 'अरे बापू दिनू-काका केव्हाचे येऊन बसले आहेत, इतका वेळ कसले रे पोहायला जाणं ! जेवायाला शेतावर राहणार हें मला सांगूनही गेला नाहीं.'

'अग ही सगळी आप्पाची चूक. त्यानें तरी मला सकाळीं इथून जातांना, आज शेतावरच जेवायचें आहे, हें कुठें कळवलें होतें. बरें, पण दिनूकाकाला बसायला तरी दिलें आहे का,' असें म्हणून घरांत शिरतो तों दिनूकाका जुनें पत्र घेऊन वाचीत असल्याचे दिसले. मी बोलण्याअगोदर त्यांनींच सुरवात केली.

'काय बापू ! बराच वेळ लागला रे ? जेवण करून तुला भेटायला मी प्रथम आलों; नेहमींप्रमाणें दुपारचा पडलोंही नाहीं; परंतु तुझाच पत्ता नाहीं. बरा एकदाचा सुटलास बुवा. आजकालचे हे परीक्षेचे पेपर म्हणजे चमत्कारिकच. एक आपली लॉटरीच—पास व्हायचं म्हणजे.... हं आता पुढें काय करणार ?'

'काका, पुढें काय करायचें आहे, हें कुठें कोणी ठरवलें आहे. आपल्यासारख्यांना विचारूनच काय तें करायचें. आमच्या तात्यांना तरी काय कळतंय. तेही आपल्यासारख्यांना विचारून काय तें ठरविणार. काय करावें असें आपणाला वाटतें ? आपल्या हातून माझ्यासारखे बरेच विद्यार्थी सुटले असतील व बऱ्याच जणांना सल्ला देण्याची वेळ आपणांस आली असेल.'

‘ सल्ला विचारायला तसे कोणी फारसे आले नाहींत. माझ्याकडे अगोदर व्ह. फायनल होणारीं मुलें थोडी असावयाचीं व एकादा व्ह. फा. झाला म्हणजे शिक्षकाची नोकरी मिळायला सहसा अडचण पडायची नाहीं. आजकालच नोकऱ्या महाग झाल्या आहेत. थोडी खटपट करून तुला शिक्षकाची नोकरी निदान हंगामी तरी—मिळावयास अडचण पडणार नाहीं; परंतु तुला सध्यां तरी विशेष जरूर आहे, असें मला वाटत नाहीं. परिस्थितीनुरूप तुम्ही मुलांनीं आतां इंग्रजी शिक्षणाचें मागें लागलें पाहिजे. तुझें वयही लहान आहे, बुद्धिही तीव्र आहे, प्रयत्न करावयास हरकत नाहीं. शहर एथून काय फार लांब नाहीं. ’

‘ शहर फार लांब नाहीं, पण शहरचा खर्च आपल्याच्यानें भागला पाहिजे ना ! आमचे मामा आहेत म्हणा तिथें, पण त्यांचेवर तरी भार कसा घालावयाचा. काका काय फार तर दोन तीन रुपयांची मदत करूं शकतील. ’

दिनूकाका हे एक पेन्शनर शिक्षक होते. पेन्शन घेऊन त्यांना आज पांच वर्षें झालीं होती. माझ्या वडिलांचे ते जिवलग मित्र. माझे वडील वारल्यापासून ते माझ्यावर प्रेम फार करीत.माझ्या आजोबांना माझे वडील व माझे चुलते अशीं दोन मुलें. चुलत्यांना फक्त एक मुलगी होती. माझ्या वडिलांना मी एकटाच होतो. कुटुंब अविभक्त होते. कुटुंबामध्यें आम्ही पांच माणसें होतो. खाऊन पिऊन आम्ही सुखी होतो. पैसा खर्च करण्याची पाळी आम्हांवर फारशी येत नसे, व कशाची गरजही फारशी भासत नसे. खेड्यांतला भाजीपाला शहरांत पाठविण्यापलीकडे शहराचा संबंध आला नाहीं. आज शहरांत राहाण्याचा विचार आमच्यापुढें उभा राहिला.

दिनूकाकांनीं आईला हाक मारली. ‘ काय पार्वतीबाई ! बापूला पाठवतां का शहरांत शिकायला ? त्याच्या मामांनीं त्याला खाऊ घाल-

ण्याची हमी घेतली तर त्याचा खर्च भागण्यास अडचण पडणार नाहीं. एथून दोन तीन रुपये पाठविले म्हणजे त्याचा कागद–पेन्सिलीचा वरखर्च भागण्यास अडचण पडणार नाहीं. माझे एक स्नेही तेथें मोठ्या शाळेवर शिक्षक आहेत. त्यांना लिहून बापूच्या मोफत शिक्षणाची सोय करतो. तात्या दोन तीन रुपये पाठवायला कांहीं माघार घेणार नाहींत.' माझी आई बिचारी काय उत्तर देणार. जन्मांत कधीं कोणत्याच गोष्टीचा विचार केला नाहीं. पुरुषांनीं कामें सांगावीत आणि मुक्या जनावराप्रमाणें ती स्त्रियांनीं करावीत, यापलीकडे त्यांना कांहींच माहीत नाहीं. 'दिनूभाऊ मला काय त्यांतलें समजतंय. आपण आहांत, त्याचे चुलते आहेत, तुम्ही ठरवाल त्यात मी आहे.'

'बरें तर, मी लिहितो पत्र माझ्या मित्राला. चार पांच दिवसांनीं पुनः बोलू. संध्याकाळीं तात्या आले म्हणजे त्यांनाही सांगून ठेवा.' असे म्हणून दिनूकाका निघून गेले. संध्याकाळीं मळ्यांतून तात्या आले. त्यांनाही दिनूकाकाबरोबर झालेल्या भाषणाची कल्पना दिली. त्यांचीही दोन तीन रुपये खर्च करण्याची तयारी दिसली. आपला पुतण्या इंग्रजी शिकण्याकरितां आतां शहरांत जाणार, या कल्पनेनेंच त्यांचा स्वतःच्या कुळाबद्दल अभिमान जागृत झाला. आय. सी. एस. च्या परीक्षेसाठीं मुलाला विलायतेला पाठवितांना जो आनंद शहरांत राहणाऱ्या पांढरपेशा कुटुंबांना वाटतो, तोच आनंद आमच्या घरांत आज वाटत होता. कितीतरी बाया माझ्या आईला भेटल्या. कित्येक गांवकरी आमच्या तात्यांचें व माझें अभिनंदन करून गेले. माझ्या किती सोबत्यांनीं माझी पाठ थोपटली, जणूं काय मी मोठाच दिग्विजय मिळविला. मला मात्र माझ्या शिक्षणाची किंमत कळत होती. शहरांतल्या शिक्षणाची व शिक्षण-संस्थांची साधारण ओळख असल्यामुळें खेड्यांतल्या लोकांच्या अज्ञानाची मला मधून मधून कींव येत असे.

पांच दिवस निघून गेले. मामांना लिहिलेल्या पत्राचें उत्तर आलें. 'माझीं जशीं दोन मुलें, तसाच बापू' ही पत्रांतील ओळ वाचून सर्वांना आनंद झाला. दिनूकाकांच्या स्नेहाचेंही पत्र आलें. 'सध्यां शाळा बंद आहे. परंतु मी खटपट करीन. पूर्ण नादारी नाहीं, तर निदान अर्धी नादारी देवविण्याची खटपट करीनच.' असे त्यांचेकडूनही आश्वासन आलें. अखेर इंग्रजी शिकण्याकरितां जाण्याचा बेत ठरला.

---

## प्रकरण २ रें

### अखेर मास्तरकी

शाळा जून ६ ला सुरू होत्या, परंतु एकंदर व्यवस्था करण्यासाठीं मी चार दिवस अगोदर निघालों. जातांना दिनूकाकाकडून त्यांचे शिक्षक मित्रांना एक चिठ्ठी घेतली. बरोबर माझे कपडे, हांतरूण, पांघरूण, थोडीं उपयुक्त वाटलीं तीं पुस्तकें व किरकोळ सामान घेतलें व मामांच्या घरीं जाऊन सुखरूप पोहोंचलों. माझे मामा एका व्यापाऱ्याचे येथें हिशेब लिहिण्याकरितां कारकून किंवा 'दिवाणजी' होते. प्रपंच चार-पांच माणसांचा होता. घरची मोठी चांगली स्थिति होती असें नाहीं, परंतु काटकसरीनें राहून जगांत ते चांगुलपणानें दिवस काढीत होते. वागणूक अत्यंत सरळ असल्यामुळें ते आपल्या मालकांना नव्हे तर उभ्या बाजार पेठेला प्रिय झाले होते. वर्षाला ५०० रुपये मिळून वही-पूजनाचे दिवशीं एक पागोटें व उपरणें मिळत असे. याशिवाय अडीअडचणीला शेटजी मदत करीत असत ती वेगळीच. माझे मामा जितके सरळ तितकी माझी मामी वांकडी. मी आल्यापासून तिचें काम वाढलें. मामांचे गैरहजेरींत कोणत्या तरी निमित्तानें रागावून माझ्यापुढून

तणतणून ती जात असे; व जातांना वक्रदृष्टीनें माझ्याकडे पाहून 'आयते मेला खायला आणून ठेवले आहेत, घरचं झालं थोडं आणि व्याह्यानं धाडलं घोडं, शिकायला यायचं होतं तर खाणावळी काय ओस पडल्या होत्या काय, चुलत्याला काय भीक लागली काय? पाटील झाला मोठा,' वगैरे शेलक्या शब्दांची पुष्पांजली त्या वहात असत. मामापेक्षां आमचें कुटुंब गरिबीचे परंतु तेथें ही धुसपुस कधींही नसावयाची. एकाची चूक दुसरा पोटांत घालवयास सदैव तयार. माझें चुकलें, आईनें सांभाळून घ्यावें. आईचें चुकलें, चुलत्यानें एक ब्रही वेडा-वांकडा उच्चारूं नये. आई आणि चुलती तर सख्या बहिणीप्रमाणें वागत त्याप्रमाणें आम्ही कोंड्याच्या भाकरी करून खाल्या तरी त्या अमृताहूनही गोड लागावयाच्या. मला अकरा वाजतां शाळेंत जावयास लागावयाचे व माझे मामा एक वाजतां घरीं जेवावयास यावयाचे. मामीला असें वाटे कीं, 'यजमानाचे अगोदर ताजे तुकडे परक्याचे पुढे काय म्हणून घालवयाचे?' रोज अकरा वाजतां ताट पुढें येतांना आदळ आपट व्हावयाची. मनुष्य सहनशील असला तरी या सहनशीलतेस कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं? कित्येक वेळां मला माझ्या मामीचा राग यावयाचा, परंतु उपयोग काय, त्या रागानें माझेंच नुकसान व्हावयाचे. माझे वर्गांतील अभ्यासाकडे लक्ष देखील लागावयाचें नाहीं. कधीं मी स्वतःची समजूत घालीत असे. 'मामी रागावते याचें कारण तिचा माझ्यावर राग आहे, असें नसून तिचें मामावर जास्त प्रेम आहे; तिच्या या विचित्र वागणुकीमुळें आपण स्वतःला त्रास काय म्हणून करून घ्यावयाचा?' या माझ्या समजुतीनें मी शांत राहिलों म्हणजे या माझ्या कोडगेपणामुळें माझ्या मामीला जास्त राग यावयाचा. कसे वागावे हें कांहीं मला सुचेना. मामांना या गोष्टीचा पत्ताही नसावयाचा. त्यांचे कानावर गोष्ट घालावयाची तर असें वाटे कीं मामांना या कटकटी

सांगून उगीच शीण कां द्या! हें सर्व सांगितलें व मामामामीवर रागावले तर त्यामुळें तिच्यापासून होणारा त्रास उलट जास्त वाढण्याचा संभव.

मी दिनूकाकाच्या मित्रांच्या मदतीनें शाळेंत जाऊं लागलों. शाळा कसली! शाळेंतच तो एक खाजगी वर्ग होता. व्ह. फायनल विद्यार्थ्यांना एक वर्षांत तीन इयत्ता शिकविल्या जात असत. रोजचे अभ्यास रोज मेहनतीनें केल्यासच तीन इयत्ता होणें शक्य आहे, असे वर्गशिक्षकानें आम्हां सर्व विद्यार्थ्यांना बजाविले होते. माझी अभ्यास करण्याची फार इच्छा होती, परंतु घरच्या भानगडीमुळें माझें लक्ष अभ्यासावर लागेना. या सर्व गोष्टी आईस किंवा चुलत्यास पत्रानें लिहाव्या किंवा एकदा गांवीं जाऊन यावे, असें अनेकदां वाटलें. परंतु तसे करण्याचा मला धीर होईना. मी आईस माझे हे सर्व हाल कळविण्यापूर्वींच आईचें पत्र आले. त्यावरून मला स्पष्ट बोध होईना, परंतु तिला देखील असाच कांहीं तरी त्रास होत असला पाहिजे, अशी शंका येऊ लागली. मी मामाकडे होतो व आई चुलत्याकडे होती, परंतु खऱ्या प्रेमाची माणसें आम्ही दोघेच, आई मला व मी आईला. आई आणि चुलती या सख्या बहिणीप्रमाणें वागत असत, परंतु ‘ जावेच्या मुलाची सर्वत्र चहा व्हावी, त्याच्याकरितां पदरचे दोनचार रुपये महिन्यास खर्ची व्हावयाचे, आपल्या पोटीं मुलगा नाहीं, आम्ही कष्ट करावयाचे व इस्टेटीचे मालक दुसरे व्हावयाचे, ’ यासारख्या कल्पना चुलतीच्या मनांत उत्पन्न न होण्यास ती काय थोडीच देवमाणूस होती! आईनें पत्रांत ‘ मी आतां कंटाळले ’ असें लिहिलें. यावरून कांहींतरी बेबनाव झाला असला पाहिजे खास, असा मी कयास बांधला. माझे शिक्षकानें दिनूकाकांना माझी अभ्यासांतील प्रगति बरोबर नाहीं असें कळविले ही गोष्ट कदाचित् दिनूकाकानें आईस कळविली असावी व आईनेंही दिनूकाकास माझा विद्याभ्यास थांबवून मला नोकरी मिळवून देण्याबद्दल

विनंति केली असावी. आईचे पत्रामागून दोन दिवसांनीं दिनूकाकांचें पत्र आले. 'अभ्यासाचा बोजा झेपत नसल्यास कळवावे. शिक्षकाच्या नोकरीची खटपट करूं. आपल्या मातोश्रीसही आपण शहरास गेल्यापासून म्हणावें असें करमत नाहीं.' वगैरे वगैरे. ज्याप्रमाणें त्यांनीं मला एक पत्र लिहिलें त्याप्रमाणें त्यांचे ओळखीचे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर त्यांनाही मला नोकरी देण्याबद्दल एक पत्र लिहिलें असें दिसते. कारण सात आठ दिवसांनीं दिनूकाकांचें पुनः पत्र आलें. नोकरीची तजवीज केली आहे. तरी मामांना विचारून सर्व सामान-सुमान घेऊन गांवीं निघून यावे, हा त्यांत मजकूर. मामाना मी हे पत्र दाखविले. त्याना याचे वर्म कांहींच कळेना. भाचा शिकण्याकरितां आला काय व परत, कांहीं न शिकतां, जातो काय ! मला जाण्यास त्यांनीं परवानगी दिली व 'बापूला परत कां बोलावलें समजलें नाहीं' म्हणून चुलत्याला एक पत्रही दिलें. मी गांवीं आलों. मी आईला व आईनें मला अंतःकरणांत खोल दडवून ठेवलेल्या सर्व गोष्टी मोकळ्या मनानें एकांतांत निवेदन केल्या. नोकरी केल्याशिवाय उभयतांचा त्रास वांचवितां येणें शक्य नाहीं, असें ठाम ठरवून, मे. ॲडमिनि-स्ट्रेटिव्ह ऑफिसर यांचे पत्राची वाट पहात आम्ही बसलों. गांवीं आल्याबरोबर दिनुकाकांनीं माझ्याकडून ॲ. ऑफिसरांना नोकरी मिळण्याबद्दल एक रीतसर अर्ज पाठविला होता, हें सांगणें नकोच.

सुमारें १०।१२ दिवसांनीं हुकूम आला. 'आवळवाडी एथील शिक्षक सीक रजेवर जात असल्यामुळें पत्र पावतांच तेथें जाऊन चार्ज त्यांच्यापासून घ्यावा व इकडे रिपोर्ट करावा.' ज्याप्रमाणें मला त्याप्रमाणें माझ्या आईला आनंद झाला. आतां मी पैसे मिळवणार या कल्पनेनें माझ्या मनोवृत्तीमध्यें अननुभूत असा फरक मला दिसून आला. एखाद्या वकीलाबरोबर किंवा डॉक्टराबरोबर एखा नववधूचें लग्न लागावे

व तिला जसा ‘ आपण आज वकिलीणबाई किंवा डॉक्टरीणबाई झालों ’ या कल्पनेनें मोठेपणाचा अभिमान चढावा, त्याप्रमाणें ‘ मी आज मास्तर झालों, आतां सर्व लोक मला दिनूकाकाप्रमाणें मान देतील ’ या विचारानें थोडी ताठ मान करून, मी आज इतराकडे पाहूं लागलों. पत्र घेऊन मी दिनूकाकाकडे गेलों. कसे जावयाचे, तेथें गेल्यावर काय करावयाचे, लोकांशीं कसे वागावयाचे, शाळेचें काम कसे करावयाचें वगैरे गोष्टी मी त्यांना विचारल्या. त्यांनीं जवळ जवळ तीस वर्षें शाळाखात्यांत घालविली होती. उत्तम शिक्षक म्हणून लौकिक संपादन केला होता. त्यांनीं अर्धा तासपर्यंत इतका उपदेश केला कीं शिक्षकाचें काम जें सोपें आहे असें मला वाटत होते तें कठीण वाटावयास लागले, ज्याला नाडीपरीक्षा नाहीं अशा माणसाच्या हातांत रोग्याचा हात पडावा, अशी माझी स्थिति झाली. ‘ तूं अजूनही विद्यार्थी आहेस ही भावना ठेव, म्हणजे तुझें काम तुला सर्व कांहीं शिकवील ’ हें एकच वाक्य मी सगळ्या उपदेशाचें सार म्हणून लक्षांत ठेवले. दिनूकाकांना नमस्कार केला. माझ्या डोळ्याला का कोण जाणे थोडें पाणीही आले. त्यांचाही कंठ सद्गदीत झाला. त्यांनीं प्रेमळ अंतःकरणानें माझ्या पाठीवरून हात फिरविला व ‘ परमेश्वराला स्मरून आपलें काम प्रामाणिकपणानें करीत जा, म्हणजे तुला यश मिळेल ’ असा उपदेशवजा आशिर्वाद दिला.

दिनूकाकाचे कुटुंब दुर्गाकाकू जवळच उभे होते, त्यांनाही मी नमस्कार केला. हंसत मुखानें त्यांनींही मला निरोप दिला. ‘ तुझा एकदा जम बसला म्हणजे आम्हाला बोलव दोन दिवस, हवा खायला ’ म्हणून इच्छाही प्रदर्शित केली. परंतु दिनूकाकांनींच, हा सध्या हंगामी दोन महिन्याच्या नोकरीवर जात आहे, ही माहिती दिली व त्यामुळें मला पुनः सांगण्याची पाळी आली नाहीं. जेवण करून मी निघणारच होतो. हळू हळू माझी मित्रमंडळी जमूं लागली. जेवण झाल्यावर माझ्या

चुलत्यानेंही नीट रहाण्याबद्दल उपदेश केला. मी आईला बरोबर घेण्याचें ठरविलें. मी ठरविलें म्हणण्यापेक्षां माझा भाकरतुकडा करून घालण्यासाठीं माझ्याबरोबर जाण्याची परवानगी तात्याकडून तिनें अगोदरच काढून ठेविली होती. त्यांनींही फारसे आढेवेढे घेतले नाहींत. आम्हां दोघांना लागतील एवढीं भांडींकुंडीं, कपडेलत्ते त्यांनीं दिले व आम्ही सर्वांचा प्रेमळ अंतःकरणानें निरोप घेतला.

---

# प्रकरण ३ रें

## हंगामी शिक्षक

आवळवाडीस मास्तरांचे घरीं गेलों. दुसरीकडे कुठें जाणार! बहुतेक संध्याकाळ झाली होती. दुसऱ्या दिवशीं चार्ज घेऊन मास्तरांना मोकळे करावयाचें ठरलें. गांवासंबंधीं व शाळेसंबंधीं नवीन माणसाला जेवढी माहिती ठाऊक असणें जरूर आहे तेवढी माहिती त्यांनीं दिली. दुसरी जागा न पाहातां एका खोलीमध्यें सर्व सामान टाकून दुसरी खोली आम्हाकरितां रिकामी करून देण्याचें मास्तरांनीं कबूल केलें. ही एक सोयच झाली म्हणावयाची! कारण खेड्यामध्यें एक तर सोईस्कर जागा नसावयाची व असलीच तर शिक्षकाला थोड्या भाड्यानें मिळेलच असा काय नियम आहे?

दुसऱ्या दिवशीं शाळेची रजिष्टरें व इतर कागदपत्र पाहून घेतले व ती रजिष्टरें कशी भरावयाची यांचीही माहिती घेतली. एक एक मूल दारांतच उभे राहून आम्हाकडे पाहूं लागले. मास्तर दोन तीन दिवस

आजारी असल्यामुळें शाळा बंदच होती. नवीन मास्तर आलेले पाहून कांहीं मुलांना हर्ष झाला व ती पाटी-दप्तर आणावयास घरीं गेली, तर कांहीं दडून बसली. थोडयाच वेळांत शाळेंत नवीन मास्तर आले ही गोष्ट सर्व गांवाला कळली. एकाद दुसरा पालक येऊन चौकशी करूं लागला.

आवळवाडी हा गांव पावसाळी असल्यामुळें दलदलीचा असे व त्यामुळें बहुतेक शिक्षक हिवतापानें आजारी होऊन रजा घेऊन जावयाचे किंवा रजा न मिळाल्यास आपली प्राणाहुती देण्यापेक्षां नोकरीवर पाणी सोडून जावयाचे. या गांवची शाळा म्हणजे नांवाचीच होती. चांगला शिक्षक अशा गांवाला लाभणें अशक्य. हिंदुस्थानचा कैदी जसा अंदमान बेटावर जावयाचा तसा जिल्ह्यांतील कामचुकार शिक्षक शिक्षेदाखल या शाळेवर पाठविला जावयाचा. ही शाळा गांवकऱ्यांना सुशिक्षित करण्यापेक्षा गुन्हेगार शिक्षकांना वठणीवर आणण्यासाटी एक प्रकारचा तुरुंगच होऊन बसली होती. अशा शाळावरचे सुपरवायजर म्हणजे शिक्षकांना योग्य दिशा दाखविणारा तज्ज्ञ म्हणण्यापेक्षां कैद्यांना वागविणारा एक जेलरच समजावयाचा. तुरुंग अस्तित्वांत आल्यामुळें जशी गुन्हेगारांची संख्या कमी झाली नाहीं, त्याप्रमाणें अशा शाळेवर पाठविलेले शिक्षक स्वत: सुधारावयाचे ऐवजी शाळेचा मात्र खेळखंडोबा करीत असत. चांगले शिक्षक मिळण्याबद्दल गांवकऱ्यांनीं पुष्कळ अर्ज केले, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. चांगलें काम करणाऱ्या शिक्षकांना अशा शाळावर पाठवायाचे म्हणजे त्यांच्या चांगुलपणाचे चांगलेच बक्षिस देण्यासारखें आहे. गांवकऱ्यांनींही पुढें पुढें अर्ज करण्याचेही सोडून दिले. यामुळेंच शाळेकडे त्यांचें बिलकूल लक्ष नसे. शिक्षक आला काय व गेला काय सारखाच. नवीन शिक्षक थोडयाच दिवसांत पळ काढावयास लागावयाचा हे बहुतेक ठरलेलेच.

अशा शाळांची स्थिति सुधारण्याची योजना खात्यानें थोडीफार आंखून ठेविली आहे, असें दिनूकाका एकदां म्हणत होते. परंतु ती योजना कशी काय उपयोगी पडते याचा प्रयोग बोर्ड करील तर ना! ती योजना अशी—जे लोक या दलदलीच्या भागांत जन्मास आले आहेत, वाढले आहेत, त्यांना या हवेपासून फारसा त्रास होत नाहीं. या भागांत शिक्षकाचें काम करण्यासाठीं अशाच लोकांतून शिक्षक नेमावेत. अशा प्रकारचे लोक खात्यांत कमी असल्यास नवीन शिक्षक नेमतांना या जातीचा जास्त भरणा करावा, म्हणजे या रोगट हवेंत काम करण्यास चांगल्या—कोरड्या हवेंतील शिक्षक आणण्याचें काम पडणार नाहीं.

परंतु कोणत्याही एका नियमाप्रमाणें वागणें म्हणजे स्कूल बोर्ड सभासदांना आपल्या अधिकाराचा उपमर्द केल्यासारखें वाटतें. त्यांच्याकडे नोकरीसाठीं किंवा बदलीसाठीं जे शिक्षक येतात, त्यांचें काम जर झालें नाहीं तर 'आम्ही बोर्डांत असून काय उपयोग?' असें त्यांना वाटत असावें.

एकंदरींत शाळेची परिस्थिति असावी तशी नव्हती. गांवचें लक्ष शाळेकडे मुळींच नव्हतें. मुलांना स्वतः वाटलें तर शाळेंत जावें, कंटाळा आला तर जाऊं नये, अशी परिस्थिति होती. स्कूलबोर्डाचें लक्षही अशा शाळांकडे बेताचेंच असावयाचें हें उघड आहे. नकाशा असला तर क्रमिक पुस्तकें असावयाचीं नाहींत, क्रमिक पुस्तकें मिळालीं तर शाळेची पडझड दुरुस्त व्हावयाची नाहीं. अशा बिकट परिस्थितींत माझ्यासारख्या नवख्या माणसाला शिक्षकाचें काम करण्याची पाळी आली. मोठ्या शाळेंत माझें शिक्षण झालें असल्यामुळें एका इयत्तेवर एक शिक्षक अशी माझी कल्पना होती, परंतु चार पांच वर्ग एका शिक्षकाला शिकवावयास लागावयाचे. एका वर्गाचे मुलांना शिक्षण देतांना दुसऱ्या वर्गाचे मुलांना गुंतवून ठेवील म्हणावें तर

साधनें कांहींच नाहींत. घरांत दोन मुलें असली तर आई त्यांचेपुढें दोन खेळणीं टाकून आपण आपलें काम करूं लागते. एथें मुलांपुढें काय खेळणीं द्यावींत ! कामावर रुजू होण्यापूर्वीं शिक्षकाच्या कामाचीं जीं गोड स्वप्नें होतीं तीं पार वितळून गेलीं. आमच्यासारख्या अनभिज्ञ लोकांना एकाचवेळीं एकापेक्षां जास्त वर्ग जेथें शिकवावे लागतात अशा शाळेवर स्कूलमास्तर म्हणून का पाठवितात, याचेंच मला आश्चर्य वाटूं लागले. नवख्या माणसाला एखाद्या मोठ्या शाळेंत चांगल्या हेडमास्तराचे हाताखालीं निदान सहा महिने काम शिकविल्याशिवाय स्वतंत्र शाळेची जबाबदारी देणे धोक्याचें आहे, असें मला अनुभवानें वाटूं लागले.

बोर्ड तरी काय करणार ? जिल्ह्यामध्यें एक शिक्षकी शाळा निम्याचे वर असावयाच्या. ट्रेन्ड शिक्षकाचें प्रमाण शेंकडा ५० ते ६० असावयाचें. एक शिक्षकी शाळांना ट्रेन्ड शिक्षक देण्याचें ठरविल्यास पूर्ण प्राथमिक शाळांचे वांटयास ट्रेन्ड शिक्षकही राहावयाचे नाहींत. अनट्रेन्ड शिक्षक शिक्षकाचे धंद्यास चालतात ही कल्पना मुळांतच चुकीची आहे. ठराविक ज्ञान असल्याशिवाय जसे डॉक्टर किंवा वकील होता येत नाहीं, तसाच नियम शिक्षकाचे धंद्यास लागू होणें इष्ट नाहीं काय?

सरकार तरी काय करणार ? त्यांना हे सर्व कळत नाहीं असें नाहीं. परंतु पैसेच कमी असल्यामुळें त्यांचाही नाइलाज होतो.

पैसे कमी असतील व ट्रेन्ड शिक्षक नेमणें शक्य नसेल तर अन्ट्रेन्ड शिक्षक नेमून काय फायदा होणार ? थोड्या पगारावर शिक्षक मिळाल्यामुळें प्रथम समाधान वाटेल परंतु शेवटीं ही पद्धत महागच पडणार आहे, हे आपल्या नेहमींच्या व्यवहारांवरून सहज कळण्यासारखे आहे. कोर्टांत केस भांडविण्यास बॅरिस्टर देण्याची ऐपत नाहीं म्हणून एखाद्या मुखत्यार वकिलावर काम निभावून नेतां येईल कां ?

परंतु हा सगळा विचार करून करावयाचे काय? दोन महिने जसें होईल तसें काम करण्यापलीकडे काय गत्यंतर होते! सकाळीं लवकर उठून शाळेंत गेलों. तक्ते, नकाशे नीट झटकून ठेविले. फळा मुलाकडून पुसून घेतला. तो पुसला काय व न पुसला काय सारखाच. त्याचा काळा रंग निघून किती दिवस झाले होते कोण जाणें. नवीन फळा शाळेंत येतांना जो त्याला एकदां रंग लागला होता तेवढाच, पुन: रंग लावण्याची पाळी आलीच नसावी. शाळेंत खडूचा पत्ता नव्हता. शिक्षक खडू वापरीत होते की नाहीं शंका दिसते.

पहिल्या दिवशीं ८।१० मुलें आलीं. पहिल्या दिवशीं पुस्तकांतील नवा अभ्यास न घेतां अगोदर मुलांना काय येते तें पाहिलें. मोठ्या मुलांना गोष्टी सांगावयास सांगितलें. लहान मुलांनीं गाणीं म्हटलीं. मला कांहीं गमतीच्या लहान लहान गोष्टी येत होत्या त्या मी सांगितल्या. संध्याकाळीं सर्वांचें खेळ घेतले. मीही त्यांच्याबरोबर थोडा खेळलों.

मुलांना पहिल्या दिवसाचा कार्यक्रम आवडला. नवीन मास्तर चांगले आहेत म्हणून त्यांनीं आपल्या गैरहजर मित्रांना वर्दी दिली. दुसऱ्या दिवशीं संख्या १८ वर गेली. अभ्यासाचा कार्यक्रम कांहीं दिवस तरी मुलें जमेपर्यंत पहिल्या दिवसासारखाच, करमणुकीचा ठेवावयाचा असें मी ठरविलें व त्याचा परिणामही इष्ट झाला. मधून मधून पालक मंडळी येऊं लागली.

एक दोन दिवसांत मी दिनूकाकांना शाळेच्या हकीकतीचें एक पत्र लिहिलें व त्यांचा सल्ला विचारला. " आहे त्या परिस्थितींत काम मन लावून करावें. दोन महिने ही हंगामी नोकरी झाल्यानंतर कायमच्या रिकाम्या झालेल्या जागेवर तुझी नेमणूक करण्याबद्दल मी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर यांना कालच लिहिलें आहे. शाळेच्या कामाशिवाय गांवांतील कोणत्याहि दुफळींत पडूं नये. शाळेंतील मुलांना

तुम्ही आवडाल असेच बंधुत्वाचें नातें ठेवावें, म्हणजे गैरहजर मुलांची संख्या कमी पडेल. दिपवाळीचे सुटींत गांवीं आला म्हणजे शिक्षण पद्धतीबद्दल बोलूं. "—वगैरे वगैरे

दिनूकाकाचे उपदेशाप्रमाणें दोन महिने मोठया काळजीनें मी काम केलें व त्याचा परिणामही इष्ट झाला. सुटीनंतर हेच शिक्षक आम्हांस मिळावें म्हणून त्यांनीं मे. ॲड. ऑफिसर यांचेकडे अर्ज केला. पूर्वीचे शिक्षक बरे होऊन पुन: येणार असल्यामुळें व त्यांचे रजेचे मुदतींत मी काम करीत असल्यामुळें मला एथें काम करण्याची संधी मिळणार नाहीं, हें मी जाणून होतों व त्याप्रमाणें गांवकऱ्यांना उत्तरही मिळालें. माझ्या विद्यार्थ्यांनीं व त्यांचे पालकांनीं मला प्रेमाचा निरोप दिला, व यांतच मला माझ्या श्रमाचें फळ मिळालें असें वाटलें.

---

# प्रकरण ४ थें

## लोक काय बोलतात ?

दोन महिने शिक्षकाचे कामाचा अनुभव घेतला. शिक्षकाचें काम सोपें अशी प्रथम माझी कल्पना होती, परंतु प्रत्यक्ष कार्यास सुरवात केली आणि एक एक अडचणी उत्पन्न होऊं लागल्या. शिक्षणविषयक नव्हे तर सामाजिक व धार्मिक गुंतागुंतीचे प्रश्न माझेपुढें उभे रहात असत. अशा प्रकारच्या कांहीं प्रश्नांचें मी टांचण करून ठेविलें होतें व सवडीनुसार दिनूकाकांना विचारावयाचे असेंही मी माझ्या मनाशीं ठरविलें होतें.

दोन महिन्यांनीं आम्ही परत गांवीं आल्यावर आमच्या तात्यास,

काकूस, आमच्या धाकट्या गंगूस कितीतरी आनंद झाला. दोन महिन्यापूर्वी आई आणि काकू यांच्यामध्यें जो अंतस्थ बेबनाव झाला होता तो या दोन महिन्यांचे काळानें पार धुऊन गेला असें मला वाटलें. माणसानें आपआपल्या प्रेमी जनापासून कांहीं दिवस तरी दूर जाणें इष्ट आहे, असें या अनुभवावरून मला वाटूं लागले. कांहीं वेळ उपोषण केलें म्हणजे जशी अन्नाला एक प्रकारची रुची आल्यासारखे वाटते; त्याचप्रमाणें पिता पुत्र, पति-पत्नी, मित्र मित्र, यामध्यें घडणाऱ्या वियोगानें त्यांच्यामधील प्रेमाला नूतन जोम फुटल्याचा अनुभव येतो.

दिनूकाकांच्याकडे मी मधून मधून जात असे व माझ्या शंका कुशंका विचारीत असे. एकदां असेंच आमचें बोलणें चाललें होतें.

दिनूकाका—बापू तूं दोन महिने कां होईना शिक्षकाचे कामाचा अनुभव घेतला आहेस. तुला तें काम आवडतें कां ! हे मला प्रथम सांग. तें काम त्रासाचें आहे हें मी जाणून आहें, परंतु त्या कामांत तुला आनंद वाटत असेल तरच तूं शिक्षकाचे धंद्यांत पड, नाहीं तर दुसरे कांहीं करणें बरें.

मी:—दिनूकाका, दुसरें मी काय करणार ? दुसरी नोकरी माझ्यासारख्याला काय करतां येईल ? असें काय माझें शिक्षण झालें आहे. शेती करावयाची तर तीही मोठीशी नाहीं. शेतींत कष्ट करणाऱ्या लोकांनाच पोटभर अन्न मिळत नाहीं. मला शिक्षकाचा धंदा आवडो कीं न आवडो त्याशिवाय मला गत्यंतर नाहीं. शिक्षकाच्या धंद्याविषयीं आज मला ठाम असें मत देतां येणार नाहीं, परंतु एवढें मी सांगूं शकेन कीं मुलांना गोष्टी सांगणें, त्यांच्याबरोबर खेळणें मला आवडतें.

दिनूकाका:— हीच जास्त महत्त्वाची गोष्ट आहे. मुलांमध्यें काम करणें आवडलें म्हणजे शिक्षकाच्या धंद्यांतील निम्मे—अधिक यश तूं मिळविलें, असें म्हणावयास पाहिजे. आतां ही गोष्ट खरी आहे कीं

आपल्याला आवडेल असें काम करण्याचें प्रत्येकाच्या नशिबी असतें असें नाहीं. तरी पण जें काम करण्याचें आपल्याला भाग पडेल त्या कामावर प्रेम ठेवून तें आत्मसात करण्याचा प्रयत्न माणसानें केला तर तें काम पुढें आवडूं लागतें व त्या कामापासून आपणाला आनंद मिळवितां येतो. शिक्षकाचे धंद्यांत पडण्याचा तुझा निश्चय असेल—मी तर त्याप्रमाणें धरून चाललो व तसें मे. अॅड. ऑफिसर यांना लिहिलेही—तर यापुढें तें काम समजावून घेण्याचा तूं प्रयत्न कर. चार शाळा पाहा, या खात्यांत जी वेगवेगळया नात्यानें काम करतात अशा माणसाशीं विचारविनिमय कर. शिक्षक काय म्हणतात, शिक्षकाबद्दल लोक काय म्हणतात, शिक्षकानें काय करावें अशी सरकारची व लो. बोर्डाची इच्छा आहे, तें समजावून घे, म्हणजे तुला तुझा मार्ग योग्य प्रकारें आखतां येईल.

अशा प्रकारचें आमचें बोलणें नेहमीं व्हावयाचें. एकदां दिनूकाकांना मी सहज गोष्ट काढली. ‘ आपल्या गांवाशेजारी तीन मैलांवर आंबेवाडींत रा. नारायणराव पवार स्कूल बोर्ड सभासद आहेत, त्यांना भेटावें, म्हणजे शिक्षकासंबंधीं त्यांचें काय म्हणणें आहे तेंही कळेल व एका सभासदाचा परिचय होईल. दिनूकाकांना ही सूचना पसंत पडली व आम्ही एक दोन दिवसांनीं रा. पवार यांचेकडे जाण्याचें नक्की केलें. दिनूकाकांचा व त्यांचा अल्पसा परिचय होता. जाणाऱ्या येणाऱ्या बरोबर आम्ही येणार आहोत म्हणून रा. पवारांना वर्दीही दिली. ठरल्याप्रमाणें आम्ही त्यांचेकडे गेलों. ते मोठे शिकलेले होते असें नाहीं, परंतु दोन दीड वर्षे स्कूलबोर्डांत कामाची बरीच माहिती त्यांनीं मिळविली होती, असें त्यांचे बोलण्यावरून आम्हांस वाटलें.

सहज बोलतां बोलतां शिक्षकाचे कामाविषयीं गोष्ट निघाली. रा. नारायणराव म्हणाले:—हे पहा, काका, आपल्या वेळेस काय परि-

स्थिती होती हें कांहीं मला सांगतां येणार नाहीं; परंतु सध्या तरी शिक्षकांचें लक्ष शाळेवर नाहीं. पहावयास गेलो तर चांगले शिक्षक शेंकडा १० तरी सांपडतील कीं नाहीं शंका येते. पांच रुपये अलौन्स मिळत असला तर १० कसा मिळेल, पोष्टाचा फायदा कसा पदरांत पाडतां येईल, याच गोष्टीकडे बऱ्याच शिक्षकांचें लक्ष. परवां मी कोळवाडीस कुस्त्याचा हगाम्याला गेलों होतों. वाटेंत किकवी गांवाला मोटार येतांच तेथील शाळेचे शिक्षक गाडींत शिरले. बिचारा गांवीं नुकताच आला होता व त्यामुळें तो मला ओळखीत नव्हता. मी स्कूलबोर्ड सभासद आहे, हे मोटारींतील इतरांना माहीत नव्हते. इतक्यांत आमच्या गाडींतील मास्तरांच्या ओळखीच्या इसमानें मास्तराला विचारलें, 'काय मास्तर आज शनिवारची शाळा नाहीं वाटते?' त्यावर मास्तर काय म्हणतात, 'अहो शाळा आहे कीं. पंचांना विचारून निघालें. इकडे आडबाजूला कोण येतो मरायला!' मी त्यावेळीं ओळख दिली नाहीं. त्या दिवशीं किकवीचे शिक्षकांनीं रजा घेतली होती कां? शाळा चालू होती कां? वगैरे प्रश्न यादी पाठवून मे. ॲड. ऑफिसरांना विचारलें. शिक्षकानें शनिवारीं शाळा बंद असूनही स्वत:ची हजेरी मांडून मुलांची हजेरी मांडली होती. हें सर्व प्रकरण उपस्थित झाले व शिक्षकाची लबाडी उघडकीस आली. परवां दुसरें एक प्रकरण असेंच उद्भवलें. जिल्ह्याचे पश्चिम भागांत पाऊस जास्त पडतो. त्या भागांतील एका कोपऱ्याच्या शाळेंतील शिक्षकानें सबंध पावसाचे तीन महिनें शाळा बंद ठेविली. गांवच्या एकदोन पुढाऱ्यांना आपलेसे करून शाळा बंद केल्याबद्दल तक्रार होणार नाहीं एवढी काळजी त्यानें अगोदर घेतली होती. तीन महिने बहादर जिल्ह्यांत राहिला व तेथून टपालानें पगार—पत्रक पाठवून पगार घेतला. तिसऱ्या पगार—पत्रकाचे लिफाफ्यावर पाहातां पोस्टाचे सर्व

शिक्के जिल्ह्याच्या नांवांचे. त्यावरून शंका आली व मग सर्व कपट उघडकीस आले. अशा माणसाला खात्यांतून कमी करण्यापलीकडे आम्हांला काय मार्ग होता !

जिल्ह्यामध्यें कांहीं ठिकाणें हवापाण्याच्या दृष्टीनें फारशीं चांगली नाहींत. परंतु जोपर्यंत तेथें शाळा आहेत तोपर्यंत तेथें कोणी ना कोणी काम करणें जरूर आहे कीं नाहीं ? परंतु तिथें काम करण्याची तयारी कोणाचीही नाहीं. बदलीबद्दल नेहमीं खटपटी. बदली न केली तर मुलांची संख्या हळू हळू कमी करावयाची. ती संख्या १५ पेक्षां कमी झाली म्हणजे बोर्डाला शाळा बंद करणें भाग पडते. मास्तरला विचारावें तर गांवकरी मुलें जमविण्यास मदत करीत नाहींत व त्यामुळें मुलें जमत नाहींत, हें उत्तर येतें. गांवकऱ्यांना विचारावें तर शिक्षकाचें लक्ष शाळेकडे नाहीं. मुलें शाळेंत आणली तरी ते नांव घालीत नाहींत. शाळेंत येण्यास मुलांना थोडा वेळ झाला तर मुलांना परत लावून देतात. वगैरे वगैरे उलट तक्रारी मास्तरविरुद्ध आहेतच.

नारायणरावांनीं आणखीही कांहीं तक्रारी सांगितल्या असत्या परंतु आम्हीच विषय बदलला. शिक्षकाविरुद्ध या तक्रारी ऐकून शिक्षकाच्या बाजूनें ऐकिलेल्या कांहीं तक्रारी त्यांचेपुढे टाकून, कित्येक वेळीं सभासदांचा किंवा बोर्डाचाही दोष असतो हे पटविण्यासाठीं म्हणून आम्ही कांहीं गोष्टींचा त्यांना खुलासा विचारला. रामटेकचा गुरव मास्तर कामामध्यें तर फार उत्तम म्हणून सर्वत्र ख्याति, मग बोर्डानें त्याला का हो बदलला ? लोकांकडून वर्गणी काढून दोनशें रुपये इमारतीसाठीं जमविले, ५० मुलांची संख्या होती ती १२० केली आणि या मेहनतीचा फायदा काय तर गांवांपासून दूर ठिकाणीं त्याची बदली !

नारायणराव:—हा अन्याय केवळ सरकारी नियमामुळें, सरकारच्या अलौन्स पद्धतीमुळें, झाला आहे. गुरव मास्तरनें शाळा वाढविली ती पांच अलौन्सची दहा अलौन्समध्यें आली. परंतु गुरव मास्तर हे ज्युनिअर असल्यामुळें त्यांना दहा अलौन्स मिळणार नाहीं. त्यांच्यापेक्षां जे सीनिअर आहेत त्यांना या शाळेवर नेमणें भाग आहे. कांहीं शाळा वाढतात तर कांहीं शाळा रोडावतात. म्हणजे दहा अलौन्सच्या पांच अलौन्सवर येतात. अशा वेळीं रोडावलेल्या शाळेंतील १० अलौन्स घेणाऱ्या शिक्षकांचें नुकसान होऊं नये, म्हणजे १० चा ५ अलौन्स होऊं नये, यासाठीं त्यांची बदली जेथें १० अलौन्स मिळेल अशा शाळेवर करणें भाग पडते.

मी:—म्हणजे जो शिक्षक १० ची शाळा ५ वर आणून ठेवतो त्याला दंड न होतां, उलट दुसऱ्यानें वाढविलेल्या शाळेवर पूर्ववत दहा रुपये अलौन्स घ्यावयास पाठविणें अन्याय नव्हे काय ?

नारायणराव:—१० अलौन्सची शाळा ५ अलौन्सवर आली याला सर्वतोपरी कारण हेडमास्तरच असेल असें म्हणतां येणार नाहीं. हेडमास्तर म्हणतील मला असिस्टंट मास्तर बरोबर मिळाले नाहींत, गांवकऱ्यांचें लक्ष शाळेकडे नाहीं, वगैरे वगैरे. एकंदरींत अशा हेडमास्तरांना १० अलौन्सच्या शाळेवर न घातलें तर 'अन्याय, अन्याय' म्हणून ओरडण्यास ते कमी करणार नाहींत.

मी:—गुरव मास्तरनीं ५० मुलांची शाळा वाढविली नसती तर त्यांची बदली झाली असती कां ?

नारायणराव:—छे ! मग बदलीचें काय कारण !

मी:—म्हणजे मुलांची संख्या वाढविली याबद्दल त्यांना कांहीं बक्षिस मिळावयाचे ऐवजी, आपला गांव सोडण्याची शिक्षा झाली, हें न्याय्य झालें काय ?

नारायणराव:—म्हणून तर मी सरकारच्या नियमास दोष देतो. या अलौन्स पद्धतीनें शिक्षकामध्यें बेबनाव वाढला आहे. काम करावयाचें सर्वांनीं व त्याचा फायदा—अलौन्सरूपानें—मिळणार फक्त हेडमास्तरांना किंवा फार तर पहिल्या असिस्टंटास, त्यामुळें कांहीं ठिकाणीं खोटी हजेरी भरण्याकडे सुद्धां हेडमास्तरांची व असिस्टंटांची तयारी असते. अलौन्स पद्धती अमलांत आणणारांचा हेतु चांगला असेल व त्याप्रमाणें संख्या वाढण्यास या पद्धतीचा थोडा फार उपयोगही झाला असेल, परंतु या योजनेंत दोष अनेक आहेत. केवळ या अलौन्स-पद्धतीमुळें आम्हांला शिक्षकांच्या बदल्या करणें भाग पडते. जास्त बदल्या केल्या म्हणजे सरकार पुन: जास्त बदल्या झाल्या म्हणून दोष देते ते वेगळेंच. नियमांची अम्मल बजावणी करणें फार कठिण जाते. या पद्धतीमुळेंच कांहीं ठिकाणीं शिक्षकांचें काम बेताचेच असते. म्हणजे शिक्षकाला चांगल्या प्रकारें काम करण्याची शक्ति असतांना देखील ते काम करीत नाहींत, कारण त्याचें बक्षिस उलट स्वरूपांत मिळावयाचें हे त्याला माहीत असतें. रा. गुरवांचीच गोष्ट घ्या ना. आतां हे कांहीं पूर्ववत मेहनत घेऊन काम करणार नाहींत. म्हणजे पर्यायानें बोर्डाचें नुकसान नाहीं काय ?

मी:—एकंदरींत हें बोर्डाचें यंत्रच बिघडलेलें आहे. पण या बाबतींत आपण योग्य अधिकाऱ्याकडे लिहून कायद्यांत योग्य त्या सुधारणा कां घडवून आणीत नाहीं ?

नारायणराव:—हे सर्व दोष सरकारच्या कानावर अनेकवार अनेकांनीं घातलेले आहेत. प्रायमरी ॲक्टामध्यें सुधारणा करण्याचें घाटत आहे असे आज किती दिवस तरी ऐकतो आहे. परंतु प्रत्यक्ष सुधारणा होईल तेव्हां खरें ?

शिक्षकाचे हातून जशीं पापें घडतात त्याप्रमाणें बोर्डाचे हातूनही,

प्रा. शिक्षणाचे कायद्यामुळें कां होईना, कांहीं पापें घडतात, ही गोष्ट रा. नारायणरावांनीं स्वतः कबूल केली हे पाहून आम्हांला समाधान वाटलें. आमचा चहा वगैरे झाला व नारायणरावांचा निरोप घेऊन आम्ही परतलों. दोनतीन दिवसांनीं आमच्या गांवच्या उत्तरेस पांच मैलांवर असलेल्या मोरगांवीं जाण्याचा माझा व दिनूकाकांचा बेत ठरला. त्या गांवचे शिक्षक दिनूकाकाचे विद्यार्थी होते व चांगला शिक्षक म्हणून तो नाणावलेला होता.

दोन दिवसांनीं मोरगांवीं दिनूकाकाचे विद्यार्थी रा. देशपांडे यांचे घरीं गेलों. गुरुजी आलेले पाहून देशपांड्यांना फार आनंद झाला. गुरुजीच्या सन्मानाबरोबर माझाही थोडा सन्मान झाला हें सांगणें नको. दिपवाळीमुळें शाळेस सुटी होती, तरी सर्व शाळा आम्ही फिरून पाहिली. एकंदर टापटीप पाहून समाधान वाटले. भिंतीवर लावलेलीं चित्रें, नकाशे वगैरे पाहून शिक्षकांच्या कामाबद्दलही थोडी कल्पना आली व शाळेला उत्तम स्वरूप येण्याचें कारण काय असा साहजिकच प्रश्न मी देशपांड्यांना विचारला.

शाळेकडे ज्यांचें लक्ष आहे अशीं माणसें सर्व आपली असें समजण्याची संवय लागली पाहिजे; मग ती कोणत्या कां जातीची असेनात. पुष्कळ वेळां आम्ही शिक्षक गांवांतल्या दुफळ्यामध्यें भाग घेतो व त्यामुळें काम तर होत नाहींच, पण लवकरच गांव सोडणें भाग पडतें. गांवकऱ्यांचे चुकत असले तरी त्याबद्दल त्यांचा तिटकारा न करतां सर्वांशीं प्रेमानें वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे, म्हणजे गांवकरीही उलट प्रेम करावयास लागतात. त्यांची भक्ति लाभण्याचें दुसरें एक कारण असतें. आपलीं आवडती मुलें त्यांनीं शिक्षकाचे ताब्यांत दिली असतात. त्यांना योग्य शिक्षण देण्याची खटपट शिक्षक करतो आहे, एवढें त्यांचे लक्षांत आले तर अशा शिक्षकांकरितां पालक वाटेल ते करावयास तयार

होईल. माझ्या या धोरणामुळें मला जी जी अडचण आली ती गांवकऱ्यांनीं दूर केली. सर्व गोष्टी बोर्ड करूं शकेल या भावनेनें खोळंबून बसलों तर कांहीं होणार नाहीं. परवां त्या हिरामण शेटजींनीं आपल्या घराला तेलाचा रंग दिला. चांगले दोनतीनशें रुपये खर्च केले. उरलेला रंग आमच्या शाळेच्या एक दोन दारासाठीं द्या असें म्हटल्याबरोबर स्वत:चीं माणसें पाठवून आमची दारें, कपाटें त्यांनीं रंगवून दिलीं. हीच गोष्ट बोर्डाकडून करावयाची म्हटली असती म्हणजे त्या कामाच्या खर्चाचा अंदाज अगोदर कळवावयाचा, त्याची जरूरी दाखवावयाची व नंतर बोर्डाच्या पैशाच्या सवडीवर काम व्हावयाचें. शाळांच्या जरूर त्या दुरुस्त्या होत नाहींत, तेथें दारांना रंग लावून मिळणें अशक्य. कांहीं कांहीं शिक्षक बोर्डावर उगीच अवलंबून राहातात. मी तुम्हांला साधी गोष्ट सांगतों. हे आमचे फळे पाहा. किती काळेभोर दिसतात. रंग सारखा लागलेला आहे, शिवाय ते चकाकत नाहींत. आतां तुम्ही कांहीं शाळा पाहिल्या असतील व कांहीं पाहाणारही असाल. या काळ्या रंगाची किंमत फार थोडी, पण तो कांहीं शाळांच्या फळ्यांना मिळत नाहीं. शिक्षणशास्त्रामध्यें फळा हा शिक्षकांचा मित्र असें म्हटलें आहे. परंतु तो चांगल्या स्थितींत पुष्कळ वेळां ठेवला जात नाहीं. फळा रंगवून मिळावा म्हणून ॲड. ऑफिसरकडे आम्ही लिहितो. ॲड. ऑफिसरजवळ असा कोणी मनुष्य नाहीं कीं तो फळे रंगवून देईल. ते लिहितात इंजिनीअरला. इंजिनीअरला फळा कशा रीतीनें रंगवला गेला पाहिजे याची कल्पना नसते. फळा काळा करावयाचा एवढेंच त्यांना माहीत असते. ते डांबर लावण्याबद्दल आपल्या माणसाला हुकूम देतात. फळ्याला डांबर लावलें जातें. डांबर घट्ट असल्यामुळें फळ्यावर सारखे लागलें जात नाहीं; शिवाय फळा चकाकतो. इंजिनीअरसाहेबाकडून ॲड. ऑफिसरकडे फळे रंगविल्याचें बिल जाते. प्रत्येक फळ्यासाठीं

१०।१२ आणे बोर्डाला द्यावे लागतात. बोर्डाचा पैसा जाऊन शिवाय जसा रंग पाहिजे तसा मिळत नाहीं तो नाहींच. हें रंग देण्याचें काम शिक्षकच करील तर दोन आण्यापेक्षां जास्त खर्च येणार नाहीं.

मी:—शिक्षकानें काय काय कामें करावींत? मुलांना त्यानें शिकवावें, शाळेला रंगरंगोटी करण्याचेंही त्यानें पाहावें!

देशपांडे:—हे पाहा, शाळा एकदां माझी असें तो समजूं लागला म्हणजे शाळेसंबंधीं उत्पन्न होणारें प्रत्येक काम त्यानें करावयास पाहिजे. फळा रंगविण्यासाठीं म्हणण्यासारखा खर्च होत नाहीं व वेळही जात नाहीं. एक फळा रंगविण्यास फार तर १० मिनिटें लागतील.

मी:—रंग तुमचा घरगुती दिसतोय.

देशपांडे:—छे घरगुती नाहीं, बाजारीच आहे. साहित्य एकदां आणून ठेविलें म्हणजे पुष्कळ दिवस जाते. रंग देण्याचा एक ब्रश ४ ते ६ आण्यापर्यंत मिळतो. तेलाचे रंग विकणारे जे बोहरी असतात त्यांचे दुकानांत ब्लॅक जपान या नांवाच काळा पातळ रंग मिळतो. हा मधासारखा घट्ट असतो. तो नुसता फळ्याला लावला तर तो चकाकतो. यासाठीं तो रंग थोडा घेऊन, बोहऱ्याच्या दुकानीं काजळीचे पुडे मिळतात त्यांतील थोडी काजळी त्या रंगांत टाकावयाची व रंग सारखा बसावा म्हणून पातळ करण्यासाठीं घासलेट ओतावयाचें, म्हणजे झाला रंग तयार. ब्लॅक जपानचा रंग लहान मोठ्या डब्यांतून मिळतो. लहान डबा १०।११ आण्याला मिळतो. काजळीचे पुडेही ३ आण्यापासून ६ आण्यापर्यंत मिळतात. ब्लॅक जपान हा रंग जर्मनी, बेल्जम या देशांत विशेष तयार होतो. आतां वारनिसचे देशी रंग होऊं लागले आहेत. पुढें मागें हे रंग देशीही मिळूं शकतील.

मी:—आपण एथें किती वर्षें आहांत?

देशपांडे:—हें माझेंच गांव आहे. गेली पांच वर्षें मी या शाळेंत काम करीत आहे. पांच वर्षांत मी थोडेसें काम केलें. आणखी कांहीं वर्षें असतो तर याही पेक्षां जास्त करून दाखवितां आले असते.

मी:—म्हणजे, आपली आतां दुसऱ्या शाळेवर बदली झाली आहे की काय ?

देशपांडे:—होय, आतां नोव्हेंबरपासून मी सोनगांवला जाणार आहे. सोनगांवीं बोर्डाचे एक सभासद आहेत. आपल्या गांवची शाळा सुधारावी म्हणून मला त्यांनीं मुद्दाम मागून घेतले आहे.

मी:—स्वतःचा गांव सोडण्याची पाळी तुमच्या या चांगल्या गुणामुळेंच आली, असेंच कीं नाहीं ?

देशपांडे:—पण त्याला उपाय काय ! स्वतःचें गांवची शाळा सुधारण्याबद्दल चांगल्या शिक्षकांची मागणी करण्यांत स्कूलबोर्ड सभासदानें कांहीं चुकले असें मला वाटत नाहीं. शिवाय चांगले शिक्षक वाईट शाळांत न जातील तर त्या सुधारणार कोण ? शिवाय या शाळेंत असिस्टंट मास्तर बरे आहेत. मी कोणत्या धोरणानें काम करीत होतो हें त्यांना माहीत आहे. तें धोरण ते स्वीकारतील तर शाळा याहीपेक्षां सुधारेल असा मला भरवसा वाटतो.

मी:—बदलीहून स्वतःचा गांव सोडण्याची पाळी आली तरी आपणास दुःख वाटत नाहीं हें विशेष आहे !

देशपांडे:—दुःख कां वाटावे, मला समजत नाहीं ! ही जशी माझी शाळा तशी जिल्ह्यांतील ज्या शाळेवर मला काम करण्याचा प्रसंग येईल तीही माझीच शाळा, ही भावना असेल तर वाईट वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. खरें पाहिलें तर शिक्षकाला आपला गांव नाहीं. जग सुधारण्याची त्याची तयारी असली पाहिजे. स्वतःची

जमीन, घरदार असले तरी त्यामध्यें त्यांचें लक्ष नाहीं. एकादें गांवीं तो जन्मास आला म्हणून तो त्याचा गांव ठरत असला तरी जग हेंच त्याचें गांव. मुलीचें लग्न झाले म्हणजे जसे मुलीला आपल्या पित्याच्या घराला मुकावें लागते; तीच गत शिक्षकाची. त्याला गांव नाहीं. जग हें त्याचें गांव आणि मनुष्य ही त्याची जात. आपल्याला जें जें ठाऊक आहे तें तें दुसऱ्याला देणें हाच त्याचा धर्म. निदान माझी तरी समजूत ही आहे व त्यामुळें मला पुष्कळ समाधान वाटते. लटकी कल्पना करून दुःख भोगण्याचा प्रसंगच माझ्यावर येत नाहीं.

मी मधून मधून दिनूकाकाकडे पाहात होतो. देशपांडे यांचे हे थोर विचार ऐकून काकांचे डोळ्याला आनंदाश्रु आले.

दिनूकाका:—पांड्या ( देशपांड्यास काका आवडीनें पांड्या म्हणत असत ) या तुझ्या विचारानें मला केवढें समाधान झाले म्हणून सांगू ! ज्यांना आपण शिकविले ते धनवान झाले, विद्वान झाले म्हणजे जो आनंद गुरुजीला होत असतो त्याची बरोबरी कशानेंही होणार नाहीं. हा सात्विक आनंद म्हणजेच शिक्षकानें भोगिलेल्या कष्टाची भरपाई असें मी समजतों.

ज्याप्रमाणें दिनूकाकांना, त्याप्रमाणें मलाही, देशपांडे यांची स्वत:ची समाधान मानून घेण्याची प्रवृत्ति पाहून संतोष वाटला. आपल्या भावी शिक्षकाचे धंद्यांत जशी दिनूकाकाची त्याप्रमाणें देशपांड्यांची मदत होईल असा मी मनाशीं विचार केला. थोडे किरकोळ बाबतींत आमचे भाषण होऊन आम्ही रा. देशपांडे यांचा निरोप घेतला.

---

# प्रकरण ५ वें

## कांहीं कल्पना व माझी नवी शाळा

ज्या शाळाखात्यांत नोकरी करावयाची त्यासंबंधीं सर्व बाजूनें शक्यतोंवर माहिती मिळवून पाऊल टाकावयाचें, या धोरणानें चालविलेला प्रयत्न पुष्कळच फलदायक झाला. स्कूलबोर्ड सभासद यांची दृष्टि कळली, शिक्षकांचें म्हणणें समजलें, कांहीं नमुनेदार शिक्षकांपासून ध्येयासाठीं लागणारी स्फूर्तीही मिळाली. आतां मे. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफीसर यांना भेटून चांगल्या गांवीं उत्तम शिक्षकाच्या हाताखालीं काम मिळण्याची संधि मागण्याचेंच बाकी राहिलें होतें. दिवाळीची सुटी संपण्यास दोन दिवसांचाच अवकाश होता. दिनूकाकांनीं ठरविल्याप्रमाणें मे. ॲड. ऑफीसर यांना आठवण देण्यासाठीं व नोकरीची खटपट करण्यासाठीं आम्ही शहराकडे निघालों. मे. ॲड. ऑफीसर यांची त्यांचें घरीं गांठ घेतली. त्याच दिवशीं बोर्डाची सभा असल्यामुळें कामांतच होते. आम्हांस पाहिल्याबरोबर 'तुमच्या नेमणुकीचा मी प्रश्न आज मंडळीपुढें ठेविला आहे,' असे ते म्हणाले. 'अहो या नेमणुकीला बोर्ड कशाला पाहिजे, ही तर तुमच्या हातांतली गोष्ट आहे.' दिनूकाका म्हणाले.

ॲ. ऑ:—होय, ती माझ्या अधिकारांतली गोष्ट आहे. परंतु नेमणुकीच्या बाबतींत—मग या नेमणुका हंगामी असोत की कायमच्या असोत—आमच्या बोर्डानें एक पोट-कमिटी नेमिली आहे व दर महिन्याला हंगामी लाविलेल्या नोकरांची याद त्यांचेपुढें ठेवावी लागते.

दिनूकाका:—हंगामी शिक्षकांची याद या पोट कमिटीपुढें का ठेवावयाची, हें नाहीं समजलें मला.

अॅ. ऑ.:—सरकारनें मागासलेल्या वर्गांतील शिक्षक जास्त प्रमाणांत लावावेत असा ठराव केला. हा ठराव प्रत्येक स्कूलबोर्डाकडे जाऊन बरेच दिवस झाले, परंतु म्हणण्यासारखी मागासलेल्या शिक्षकांची संख्या वाढली नाहीं. याचें कारण असे—अॅड. ऑफीसरचा ओढा सहसा तो ज्या जातीचा त्या जातीकडे असावयाचा. त्या जातींतील शिक्षक हंगामी लागले म्हणजे तीन वर्षांनीं तेच कायम व्हावयाचे. एकादा हंगामी लागलेला शिक्षक अखंड नोकरी तीन वर्षें करूं शकला तर त्याला तीन वर्षांनंतर सहसा काढतां येत नाहीं. यासाठीं रिकाम्या जागीं हंगामी शिक्षक नेमतांना, नेमणूक सरकारी धोरणाप्रमाणें होते आहे कीं नाहीं, हें पाहाण्याचें काम या पोट–कमिटीचें आहे. मला वाटतें ही योजना कांहीं वाईट नाहीं. नेमणुकीच्या बाबतींत अॅड. ऑफिसरांचे जेवढें चोख वर्तन असावयास पाहिजे तेवढें साधारणतः दिसत नाहीं. हे मी अॅड. ऑफीसर म्हणूनच सांगतों. तुमच्या बापूसाहेबांची नेमणूक कायम रिकाम्या झालेल्या जागीं असल्यामुळें तें प्रकरण मी या पोट–कमिटीपुढें ठेविलें आहें. आज संध्याकाळीं त्याचा निर्णय लागेल. उद्या सकाळीं माझेकडून हुकूमच घेऊन जा म्हणजे झालें, त्याची नेमणूक एका उत्तम शिक्षकाचे हाताखालीं मी केली आहे. गांवही बरा आहे. दोघांनीं खटपट केली तर मुलांची संख्या १५० पर्यंत जाण्यासारखी आहे. गांवचे लोक सधन आहेत. हवापाणी चांगलें आहे गांवकऱ्यांना आपल्या बाजूला वळविणें शिक्षकांवर आहे.

आपलें बहुतेक काम झालें असें वाटून आम्ही साहेबांचा निरोप घेतला व दिनूकाकांच्या ओळखीच्या कांहीं माणसाकडे भेटावयास गेलों. साक्षरता कशी वाढेल, प्राथमिक शिक्षणाचा प्रसार कसा होईल याविषयीं थोडी चर्चा कांहीं ठिकाणीं झाली. ज्या ध्येयानें सक्तीचा कायदा पास झाला तें ध्येय गांठतां येणें शक्य नाहीं, हें आज सर्वांना

कळून चुकलें आहे. बोर्डाच्या शाळांमधून पैशाचा अपव्यय फार होतो. शिक्षकांचें कामावर लक्ष नाहीं. सुपरवायजर फार तर वर्षांतून दोन वेळां शाळा तपासतील, पण शिक्षकांची काम करण्याची प्रवृत्तीच नसली तर सुपरव्हिजन वाढवून तरी काय उपयोग होणार आहे? रोजानें कामावर लाविलेल्या नोकरांना जसे सारखे मागें लागून काम करवून घ्यावें लागतें तसें शिक्षकांचें मागें लागणें शक्य नाहीं. त्यापेक्षां माणसें साक्षर करण्याचे कॉन्ट्रॅक्ट सरकारनें किंवा बोर्डानें कांहीं शिक्षकांना द्यावे. वाचतां, लिहितां व हिशेब करतां येऊं लागला म्हणजे कांहीं ठराविक रक्कम प्रत्येक विद्यार्थ्यामागें शिक्षकाला द्यावी. यायोगें स्वतंत्ररीत्या शाळा बऱ्याच निघतील व सुपरव्हिजनचा प्रश्नच उत्पन्न होणार नाहीं.

एक जणानें तर आमच्या दिनूकाकांनाच उपदेश केला. दोनचार पेन्शनर शिक्षकांनीं एकत्र येऊन एक लहानसा संघ बनवावा. या संघानें तालुक्याच्या ठिकाणीं मुख्य शाळा चालवावी व त्याच्या शाखा जवळपास चार पांच मैलांचे घेरांत ठिकठिकाणीं काढाव्यात. या शाळांवर देखरेख या मध्यवर्ती शाळांच्या चालकांची असावी. या शाळांना स्कूलबोर्डानें ग्रँट द्यावी. आज प्रत्येक मुलामागें सरकारला १५।१६ रुपये खर्च येतो. संघानें चालविलेल्या शाळांतून पास झालेल्या प्रत्येक मुलामागें संघास ७।८ रुपये ग्रँट मिळाल्यास आज कितीतरी शाळा पुढें येतील व सध्यां बदल्या, सुपरव्हिजन वगैरेसाठीं जो बराच मोठा खर्च होतो तो वांचेल. सरकारनें आपल्या कायद्यांत थोडी दुरुस्ती केली पाहिजे किंवा आहेत ते नियम सहानभूतीनें वापरले पाहिजेत. आज "ए" जातीच्या शाळांतून प्रत्येक मुलामागें १० रुपये ग्रँट मिळते, पण "बी" जातीच्या शाळांना प्रत्येक मुलामागें तीन रुपये मिळतात. लोकलबोर्डाचें शाळेमधून ज्या प्रकारचें शिक्षण दिलें जातें, तशाच प्रकारचे शिक्षण संघानें दिल्यास,

त्याला प्रत्येक मुलामागें—शिक्षणाचें मगदुराप्रमाणें— पांच ते आठ रुपयापर्यंत ग्रँट कां देऊं नये, समजत नाहीं.

विशेषतः या दोन योजना मला बऱ्या वाटल्या. या योजनांप्रमाणें कांहीं ठिकाणीं प्रयोग व्हावयास पाहिजेत. म्हणजे यामधून हळू हळू शिक्षण—प्रसारास इष्ट अशी एखादी योजना प्रगट व्हावयाची. परंतु हा प्रयोग करावयाचा कोणी? प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न आम्ही लोकल बोर्डाकडे सोपविला आहे. ठरल्याप्रमाणें कांहीं नियमांच्या अटीवर मदत देणें एवढेंच आमचें कार्य आहे, असें सरकार म्हणणार. सरकार जर जास्त खर्च करण्यास तयार नाहीं तर लोकांवर शिक्षणासाठीं जादा कर बसवून स्वतःच्या जबाबदारीवर नवीन प्रयोग आम्ही कां करावेत, असें बोर्ड म्हणणार. बरें स्कूलबोर्डानें विचारानें एकादी गोष्ट करावयाची म्हटल्यास तें तरी कोठें स्वतंत्र आहे? एक पैसाही खर्च लोकल ॲथॉरिटी——लोकलबोर्ड——ला विचारल्याशिवाय त्याला करतां येत नाहीं. लोकलबोर्डाला जिल्ह्याच्या हिताच्या अनेक गोष्टी करावयाच्या असतात व यामुळें शिक्षणविषयक बाबीचा खोल विचार करण्याची त्यांना फुरसत नसते. शिवाय 'आम्ही मालक' हा त्यांचा अभिमान पदोपदीं जागृत होत असतो व त्यामुळें स्कूलबोर्डाच्या मागणीचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं.

आवळवाडीला मी प्रथम मास्तर म्हणून गेलों, त्यावेळीं असा विचार माझ्या मनांत आला कीं, जें काम करण्यासाठीं स्कूलबोर्डानें मला पाठविलें आहे तें कार्य करण्यास मी कितपत समर्थ आहे याचा विचार कोणी कसा करीत नाहीं? शाळा आहे, त्याच्यावर कोणी तरी एक मनुष्य पाहिजे. जसा गुरें हाकण्याकरितां एकादा गुराखी असावा त्याचप्रमाणें——म्हणून मला पाठविलें, याच्या पलीकडे काहीं नाहीं. मी व्ह. फायनल होतो, परंतु मुलांना कसें शिकवावें याची मला काय कल्पन

होती? शिक्षक रजेवर गेले असतां त्यांचे रजेचे मुदतींत काम करण्यासाठीं माझ्यासारखी पांच-पंचवीस माणसें, शिक्षणशास्त्राचें काम चलाऊ शिक्षण देऊन, तयार ठेवणें स्कूल-बोर्डाला अशक्य आहे काय ? लढाईचे वेळीं नवीन भरतीच्या शिपायांना ज्याप्रमाणें बंदुक कशी धरावी, नेम कसा मारावा वगैरे महत्त्वाच्या गोष्टी प्रामुख्यानें शिकविल्या जातात व त्यांची रवानगी तांतडीनें समरांगणाकडे केली जाते; त्याचप्रमाणें शिक्षक होऊं पाहणाऱ्या माणसाला तो ट्रेनिंग कॉलेजमध्यें जाऊन ट्रेंड होईपर्यंत, निदान शिक्षण देतांना शिक्षकानें वर्गांत बसावें का उभें रहावें, खडू कसा धरावा, फळ्याचा उपयोग काय, खेळ, गोष्टी, गाणीं यांचा कोठें कसा उपयोग करावयाचा, खेड्यांतील लोकांशीं आपलें वर्तन कसें ठेवावयाचें, हें शिकविण्यासाठीं निदान १५ दिवसांचा ट्रेनिंग-कोर्स असणें योग्य नाहीं काय? असो. ज्याअर्थी कोणतेंच स्कूलबोर्ड या गोष्टीचा विचार करीत नाहीं, त्या अर्थी त्यांच्याहि कांहीं अडचणी असतील, कदाचित.

आतां कोणी असें म्हणतील कीं सरकार एखादी गोष्ट करीत नाहीं, म्हणून ती लोकांनीं कां करूं नये ? कॉलेजचें शिक्षण, हायस्कूलचें शिक्षण गरिबांना देखील घेतां यावें यासाठीं जशा शिक्षण-प्रसारक-मंडळी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, वगैरे सारख्या संस्था निर्माण झाल्या, त्याप्रमाणें प्राथमिक-शिक्षण-प्रसारक संस्था जन्मास कां येऊं नयेत ? खरोखर हा विचाराचा प्रश्न आहे. शहरांतून प्राथमिक शिक्षण जवळ जवळ सार्वत्रिक झालें असेल, परंतु खेड्यांत त्याचें पाऊल कोठपर्यंत पडलें आहे, शहरांत ज्याप्रमाणें ज्ञानदान देणाऱ्या संस्था आहेत त्याप्रमाणें त्या खेड्यांत कां असूं नयेत ? या संस्था कोणी काढावयाच्या ? खेड्यांत जन्म घेणारे शहरांत जाऊन उच्च शिक्षण घेतात, मोठी नोकरी करून पैसा मिळवितात व अखेर त्या शहरांत पेन्शनर म्हणून सुखानें

आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस घालवितात. हे पेन्शन घेतल्यावर शहरांत न राहतां जर आपआपल्या गांवीं जातील व तेथील थोड्याशा शिक्षित लोकांची मदत घेऊन जर गांव सुधारण्याचा प्रयत्न करतील तर देशावर किती तरी उपकार होतील ! त्यांनीं प्रत्यक्ष अंग मेहनतीचें काम करावयास नको. खेड्यांमध्यें **योजकाची** उणीव भासते, ती उणीव त्यांनीं दूर करावयाची आहे. व्ह. फायनल पास झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना बोर्डांत शिक्षकाची नोकरी मिळत नाहीं. यांपैकीं बरेचसे लोक या शिक्षण-प्रसाराचें कामीं थोड्या पगारावर काम करण्यास तयार होतील. निदान हा प्रयोग करून पाहाण्यासारखा खास आहे असे मला वाटते.

शहरांत लोकांच्या भेटी घेतांना नाना विचार सुचतात, परंतु त्या विचाराची अम्मलबजावणी खेडयांत करतांना मनुष्य गांगरून जातो. मे. ॲड. ऑफिसर यांचा हुकूम घेऊन मी हुकूमाप्रमाणें कामावर रुजू झालों. ज्यांचे हाताखालीं मला काम करावयाचें होतें ते गृहस्थ फारच गोड स्वभावाचे होते. त्यांचे घरांत एक प्रकारची टापटीप दिसली, दुसऱ्याशीं बोलतांना त्यांचे अंगीं वसत असलेली नम्रता पाहून मला समाधान वाटलें. त्यांच्याशीं थोडा वेळच माझें बोलणें झालें. त्यावरून मनुष्य ध्येयनिष्ठ दिसला. गांव सुधारावा ही एकच महत्त्वाकांक्षा पाहून आपणही याच ध्येयानें काम करूं या, अशी सहजच स्फूर्ती झाली.

गांव फारच रमणीय होता. गांवाजवळ एक सुंदर टेकडी असून त्याजवर शंकराचें लहानसें देवालय होतें. देवळास लागून असलेल्या वृक्षांनीं त्या देवळावर जणूं छायाच केली होती. गांवाजवळ, अर्ध्या फर्लांगावर, एक नदी वहात होती. तिला बारा महिने भरपूर पाणी नसलें तरी आठ महिने पुरेसें पाणी असून खडकामुळें मुलांना पाहण्याची सोय

झाली होती. गांव फारसा श्रीमान नसला तरी तो कंगाल नव्हता. विही-रीच्या पाण्यावर थोडेफार बागाईत होत असे. कुठलाही शेतकरी कष्टाळू असतो, त्याप्रमाणें तो तेथेंही होता. मारुतीचें देऊळ गांवाच्या वेशी-जवळ होतें. गांवांत मध्यभागीं विठोबा-रुक्माईचें मोठें देऊळ होतें, तेथें कधीं कधीं कथाकीर्तनें होत असत, या वरून गांव धार्मिक होता असें म्हणावयास हरकत नाहीं.

या सगळ्या थाटमाटावरून कोणी शाळेची व शाळेच्या इमारतीची कल्पना करील तर ती चुकीची ठरेल. मारुतीचे देवळास लागून एक चावडीवजा शाळेची इमारत होती, ती अगोदर तीन बाजूनीं बांधलेली होती. अशा इमारतींत सामानसुमान ठेवण्यास अडचण पडते अशी तक्रार बरेच दिवस केल्यामुळें चवथ्या बाजूनें दोन दारें व दोन खिडक्या लावून बोर्डानें भिंत बांधून दिली होती. यायोगानें रात्रीच्या वेळीं कुत्रीं आणि गाढव यांची झोपण्याची बरीच गैरसोय झाली होती. गांवांतील लोकांचे शाळेकडे विशेष लक्ष नसे, परंतु यावरून त्यांचा शाळेवर डोळा होता असें मात्र नाहीं. बादशहाच्या वाढदिवसाचे वेळीं मास्तरानीं आमंत्रण दिलें म्हणजे गांवची पुढारी मंडळी तरी न चुकतां हजर रहात असत. मास्तर थोडे हौशी असल्यामुळें ते पाडव्याची व दस-ऱ्याची पाटीपूजा करीत असत. या समारंभाचे निमित्तानें व खोबऱ्याच्या प्रसादाच्या आशेनें शाळेंतील मुलांमुलींचे बरोबर त्यांचे धाकटे भाऊ व धाकट्या बहिणी येत असत. ज्या मास्तरांचे हाताखालीं आज ना उद्यां आपणाला दिवस कंठावयाचे आहेत त्या मास्तरांची, पुसट पुसट कां होईना, ओळख होत असे.

शाळा गांवाबाहेर असल्यामुळें शाळेला लागणारा एकांत अनायासेच प्राप्त झाला होता. कामचुकार शिक्षकाला शाळेच्या वेळांत झोप घेण्यास ही नामी जागा होती. शाळा महारवाड्यासारखी दूर असल्यामुळें

मास्तर जागे आहेत कां झोपले आहेत हे पाहाण्यासाठीं एकही पालक जागरूक असण्याचा संभव नव्हता. शाळेची परिस्थिती अशी असली तरी नमुनेदार काम दाखवावयाचें असें आम्ही दोघां शिक्षकांनीं ठरविलें. कोणीही शाळेकडे पाहिले नाहीं, तरी **शाळा माझी** आहे ही भावना ठेवून शाळेचा प्रपंच-अर्थात् गांवकऱ्यांच्या मदतीनें-वाढविण्याचा आम्ही संकल्प केला व कार्यास लागलों.

---

# प्रकरण ६ वें

## साक्षरता-प्रसार

पहिल्या दिवशीं शाळेंत पटावर ६२ मुलें होतीं व पैकीं ५५ मुलें हजर होतीं. दुसरे मास्तर येण्यावर बालवर्गांतील कांहीं मुलें थोपवून धरिलीं होतीं. तीं हळू हळू येऊं लागलीं. आठ दहा दिवसांत पटावर १० मुलें वाढलीं. बालवर्गांतील मुलांशिवाय इतर मुलें फारशी आलीं नाहींत. ७२ मुलांपैकीं हजर मुलांचें प्रमाण प्रथम वाढविण्याचा प्रयत्न केला. मुलगा गैरहजर राहिला कीं त्याची विचारपूस करण्याची आम्हीं सुरवात केली, घराशेजारीं रहाणाऱ्या मुलांना बरोबर घेऊन येण्याबद्दल मुलांना सूचना दिली, या योगानें शेजारच्या मुलांना गैरहजेरीचें कारण तरी कळून येऊं लागलें. ‘मास्तर मला नाहीं ठाऊक, रामा कां नाहीं आला ते’ या ऐवजीं, ‘मास्तर तो आपल्या आईबरोबर मळ्यांत गेला आहे; त्याच्या मामाच्या एथें जेवण आहे म्हणून तो आपल्या आईबरोबर गेला आहे; त्याचें पोटांत दुखत आहे.’ वगैरे कारणें मुलें देऊं लागलीं. कित्येक वेळां मुलें क्षुल्लक कारणावरून

गैरहजर राहतात असें दिसलें व त्यास कारण पालकांची फूस असें जरी म्हणतां येणार नाहीं, तरी पालकांची निष्काळजी हें खास कारण देतां येईल. आपल्या एथें जेवण असावयाचें संध्याकाळीं पांच वाजतां. स्वैंपाक करण्यासाठीं आई जावयाची सकाळीं. पण या मुलाला आई-बरोबर जाण्याचें प्रयोजन काय? तो थोडाच स्वैंपाकाला मदत करणार आहे? ही स्थिति सुधारण्यासाठीं प्रत्यक्ष पालकांना भेटल्याशिवाय गत्यंतर नव्हते.

गैरहजेरीचें प्रमाण कमी करण्यासाठीं आम्हीं दोघांनीं एकत्र बसून विचार केला. जीं मुलें गैरहजर असतील अशा मुलांच्या पालकांना शाळा सुटल्यानंतर भेटावयाचें असें आम्ही ठरविलें. शाळेवर आम्ही दोघेच मास्तर होतो. दुसरे मास्तर सिनिअर होते. तेव्हां त्यांना हेड-मास्तर म्हणावयास हरकत नाहीं. शाळेवर एकच शिक्षक असतील तर त्याना हेडमास्तर म्हणत नाहींत. हेडमास्तरप्रमाणें ते सर्व जबाबदारीचीं कामें करीत असतील परंतु त्यांना हेडमास्तर न म्हणतां स्कूल मास्तर म्हटले जातें. मी आल्यामुळें शाळेचें पूर्वीचे मास्तर स्कूलमास्तरचें ऐवजीं हेडमास्तर झाले; म्हणजे माझ्यामुळें त्यांना एक प्रकारचें प्रमोशन मिळालें असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांनीं आपणाकडे मराठी चवथी, तिसरी व बालवर्गाचीं मुलें घेतलीं होतीं व माझ्याकडे दुसरी व पहिली इयत्ता दिली होती.

गैरहजेरीचें प्रमाण कमी कसें करतां येईल याचा आम्ही दोघांनीं बसून विचार केला. जीं मुलें गैरहजर असतील अशा मुलांच्या पालकांना भेटावयाचें आम्हीं ठरविलें. ज्यानें त्यानें आपआपल्या वर्गांतील गैरहजर मुलांविषयीं चौकशी करावी असें ठरविल्याप्रमाणें या कामाची वांटणी दोघांमध्यें झाली. गैरहजर मुलांचें प्रमाण बालवर्गांतील मुलांचें जास्त असल्यामुळें व बालवर्ग हेडमास्तर यांचेकडे असल्यामुळें कधीं कधीं

हेडमास्तर यांना जास्त फिरावे लागत असे. शक्य तर मीहि त्यांचे बरोबर जाऊन मुलांची चौकशी करीत असे.

प्रथम प्रथम या नवीन कामाचा आम्हाला कंटाळा येत असे व कशाला हें काम वाढवून घेतलें असें प्रत्येकाला मनांत वाटत असे. परंतु हें दुसऱ्यास बोलून दाखविण्याचें धैर्य होत नसे. कारण अशी दुर्बलता दाखविली तर आपल्या कृतनिश्चयापासून आपण च्युत झालों असा आरोप आपल्यावर दुसऱ्याकडून व्हावयाचा ही भीति दोघासही वाटावयाची. थोड्या दिवसांनीं हें काम आमच्या अंगवळणीं पडलें. कित्येक वेळां विनाकारण मुलें गैरहजर रहात असत, हें जरी खरे असले तरी कित्येक वेळेला पालकांच्या अडचणी विचारांत घेण्यासारख्या खास होत्या. पालकांच्या भेटी घेण्यानें पालकांची स्थिति कोणत्या प्रकारची आहे याची आम्हाला कल्पना येत असे.

पालकांची—शेतकऱ्यांची—खरी स्थिति आम्हास कळत असे; त्याच-बरोबर 'मास्तर आपल्या घरीं आले' या विचारानें पालकही थोडें लाजत असत व मोठेसें कारण असल्याशिवाय मुलगा सहसा गैरहजर ठेवावयाचा नाहीं, असा मनांत निश्चय करीत असत. मास्तर मुलांबद्दल फार काळजी घेतात; केवळ शाळेंत येणाऱ्या मुलांना शिकवायचें अशी पगारी वृत्ति न ठेवितां ते मुलांची प्रेमानें चौकशी करतात व मुलांच्या हिताच्या दोन गोष्टी पालकाला सांगतात हें खरोखर आम्हावर उपकार आहेत, असें पालकांना वाटूं लागलें. एकदां एका पालकास आपल्या मुलास घेऊन शेजारच्या गांवीं लग्नास जावयाचे होते. ते पालक आम्हाकडे आले व 'दामूला एक दिवसाची रजा द्या, आम्हाला लग्नाला जावयाचें आहे' असें म्हणूं लागले. यापूर्वी शाळेंत येऊन कोणत्याही पालकानें रजा मागितली नाहीं असें हेडमास्तर म्हणूं लागले. आपण केलेल्या प्रयत्नाचें चीज आपणास खात्रीनें मिळेल, असा

विश्वास आम्हाला वाटूं लागला व त्यामुळें आनंद झाला. मास्तर हा उपकारक प्राणी आहे एवढी पालकांची खात्री झाली म्हणजे शिक्षकामुळें शाळेवर त्यांचें प्रेम बसल्याशिवाय राहणार नाहीं. असें आम्हास वाटलें व त्याप्रमाणें अनुभवही येऊं लागला.

कोणत्या ना कोणत्या निमित्तानें पालक शाळेकडे येऊं लागले. शाळा सुटण्यापूर्वीं अर्धा तास आम्ही खेळाकरितां राखून ठेविला होता. यावेळीं गांवांतील कांहीं हौशी माणसें येऊन मुलांचे खेळ पाहात असत. खोखोचा खेळ कसातरी न खेळतां पुणें, सातारा वगैरे शहरीं ज्या नियमानें खेळला जातो त्या नियमानें आम्ही तो खेळूं लागलों. मुलांना नियम समजले, या खेळांत ते थोडे प्रवीणही झाले. या रीतीनें खेळ खेळण्यांत विशेष शिस्त दिसून येते ही गोष्ट पालकांनीं कबूल केली.

ज्याप्रमाणें खेळण्यामध्यें शिस्त दाखविण्याचा आम्ही प्रयत्न केला त्याप्रमाणें शाळा सुरू होण्यापूर्वीं प्रार्थना पद्यें म्हणण्याचें वेळींहि शिस्तीचा आम्ही अवलंब केला. शाळेमध्यें प्रार्थना न करितां कधीं कधीं मारूतीच्या देवळांत ती करीत असूं. प्रथम ईश प्रार्थनेनंतर शाळेसंबंधाचे पद्य व शेवटीं राष्ट्रगीत अशीं तीन पद्यें अगोदर आम्ही चांगलीं बसवून घेतलीं व नंतर सर्व वर्गांना एकत्र आणून ती म्हणण्यास सुरवात केली. आवाज फार मोठा न करतां व म्हणतांना घाई न करतां तालबद्ध म्हणण्याची संवय झाल्यावर प्रार्थनेच्या वेळीं जवळपासच्या १०।५ घरांतील मुलें माणसें जमा होत असत. खेळ आणि गाणीं यांकडे मनुष्याची ओढ असते व म्हणून या दोन कार्यक्रमामुळें पुष्कळांचें लक्ष शाळेकडे लागलें.

शाळा म्हणजे एक लहानसें जग आहे. शाळा पूर्णत्वानें सुधारावयाची असेल तर त्याला आजूबाजूचें जगही सुधारावें लागतें. गांवांतील एक घर सुधारलें म्हणजे सर्व गांव सुधारला असे होत नाहीं. मला

माझ्या घरांत स्वच्छता ठेवावयाची असेल तर केवळ स्वत:चें घर स्वच्छ ठेवून भागत नाहीं, शेजारी स्वच्छ व्हावा लागतो. जोपर्यंत जगाचा व्यवहार एकमेकांच्या मदतीवर किंवा सहकार्यावर चालतो, तोंपर्यंत केवळ स्वत:पुरता विचार करून कसे भागेल ! मला शेजाऱ्यांशीं काय करावयाचे आहे ! असें म्हणून भागत नाहीं. मोठमोठी मंडळी जेवणा-करितां जमलेली आहेत. टेबलावर सर्व सुंदर थाटमाट केला आहे. जेवणाचे पदार्थही स्वच्छ असून उत्तम बनविले आहेत. परंतु वाढण्या-साठीं मळके कपडे घातलेले वाढपी असतील तर चालणार नाहीं. हे वाढपी जातीनें महार असतील, कमी पगाराचे असतील, परंतु वाढण्याचे वेळीं स्वच्छ कपड्यामध्यें सजवूनच त्यांना आणावे लागते. हे स्वच्छ कपडे त्या वाढप्याकरितां नसून जेवणास जमलेल्या लोकांकरितां असतात, हें काय सांगावयास पाहिजे.

शाळा जर सुधारावयाची तर त्याच्या आजूबाजूची परिस्थिति सुधारावयास नको काय ! मुलास शिक्षण द्यावयाचें व त्यांच्यावर ज्या घाणेरड्या परिस्थितीचा हरघडी परिणाम होतो, तिचा यत्किंचितही विचार करावयाचा नाहीं, असें म्हणून कसे भागेल ! शाळेंत पांच तास शुद्ध मराठी शिकविलें, परंतु शाळा सुटल्याबरोबर हेंगडी भाषा बोलण्याचा व ऐकण्याचा प्रसंग मुलांवर येत असेल तर तो तरी शुद्ध बोलावयास कसा शिकावयाचा; मुलगा शाळेंत शिकत असतांही त्याच्या तोंडांतून वेडेवांकडे उच्चार बाहेर येतात याचें कारण काय ?

या विचाराबद्दल दुमत होण्यासारखें नाहीं. परंतु जेथें लहानशी शाळा सुधारतां येत नाहीं तेथें गांव कसा सुधारावयाचा ! थोडयाबहुत प्रमाणांत गांवही सुधारावा लागेल; व गांव सुधारत चालला म्हणजे त्याचा परिणाम शाळेवर होऊन शाळाही सुधारत राहील. शाळा सुधारणें हें जसें आम्हां शिक्षकांचें काम, त्याप्रमाणें गांव सुधारण्याचें

प्रयत्न अर्थात् जशी फुरसत सांपडेल त्याप्रमाणें करण्याचें आम्ही उभयतांनीं ठरविलें. गांवचे पाटलाचा मुलगा—त्यांना भाऊसाहेब आम्ही म्हणत असूं—आम्हांमध्यें येऊन मिसळत असे. कधीं कधीं शाळांतील मुलांमध्यें ते खेळण्याकारितांही येत असत. वडिलांनीं त्यांच्याकडे प्रपंचाची थोडी जबाबदारी टाकली होती. त्यांतून वेळ काढून आम्हाला—शाळेला—मदत करण्याची त्यांची प्रवृत्ति असे. त्यांचें शिक्षण चार इयत्तेपर्यंत झालें होतें. जवळपासच्या एकाद्या मोठ्या शाळेंत घालून व्ह. फायनल पर्यंत त्यांना शिक्षण देण्यास कांहीं हरकत नव्हती. 'पण काय करावयाचे आपणास शिकून' या पाटलांच्या नेहमींच्या विचारसरणीमुळें पुढचें शिक्षण बंद पडलें. मुलगा चवथीपर्यंत शिकला परंतु शाळेंतून बाहेर पडल्यावर पुस्तक कांहीं हातांत पडलें नाहीं. तें पडणार कोठून! दागदागीने, भांडीकुंडीं जशी मालमत्ता समजली जाते, तसे पुस्तकांचे थोडेच्च आहे. नाहीं म्हणावयास एकादें दुसरें पत्र भाऊसाहेबाकडे वाचावयास म्हणून शेजारीपाजारी आणीत असत, पण अशीं पत्रें नेहमीं मोडीत असल्यामुळें भाऊसाहेब होतांहोईतो तीं टाळीत असत. गांवांमध्यें हीं कामें करायला मास्तर असल्यावर मग भाऊसाहेबांनीं तरी हा भार कां सहन करावा!

भाऊसाहेबांसारखी साक्षर परंतु जवळ जवळ निरक्षर बनलेली १५।२० तरुण माणसें आमच्या गांवीं होती. हीं माणसें एकत्र आणून त्यांचा उपयोग शाळा सुधारण्यासाठीं किंवा शाळेच्या आजूबाजूस पसरलेल्या गांवाची स्थिति सुधारण्याचें कामीं करावा असे आम्ही ठरविलें. कार्य खेड्यांतलें आहे हें जाणून फारसा मोठा कार्यक्रम सुरवातीसच न ठेवतां, प्रथम दर शनिवारीं मारुतीच्या पूजेच्या निमित्तानें आम्ही रात्रीं जमण्याची सुरवात केली. आठवडयांतून एकदां मारुतीच्या देवळांत जमावयाचें, मारुतीची पूजा करावयाची व पूजा

झाल्यानंतर रामायण, महाभारतांतील कांहीं गोष्टी वाचावयाच्या. जेवण करूनच जमावयाचें ठरल्यामुळें पूजेनंतर घरची फारशी काळजी राहत नसे प्रथम भाऊसाहेब पूजेला व कथेला हजर राहूं लागले व त्यानंतर हळू हळू त्यांचे मित्र येऊं लागले. कांहीं वृद्ध माणसेंही भाविकपणानें येत असत. लहान मुलें ही आपल्या थोरल्या भावाबरोबर किंवा वडिलाबरोबर म्हणून येत असत. राहतां राहिल्या म्हणजे स्त्रिया. त्यांना घराबाहेर पोरासोरांना टाकून कोठें जातां येणार? चूल आणि मूल यामध्यें बिचाऱ्या कायमच्या गुरफटलेल्या!

दोन चार आठवडे हा आमचा लहानसा कार्यक्रम नियमितपणें सुरू ठेवल्यावर मारुतीच्या देवळांत न बसतां आम्ही शाळेंत बसण्यास सुरवात केली. कधीं कधीं भाऊसाहेब व त्यांचे तरुण सोबती माझी गोष्टीचीं पुस्तकें घरीं वाचावयास म्हणून घेऊन जात असत. इतकेंच नव्हे तर रात्रीच्या कथेच्या वेळीं आम्ही त्यांच्याकडे गोष्ट स्वतः वाचण्याची कामगिरी हळू हळू सोपविली. बरेंच दिवस वाचण्याची संवय मोडल्यामुळें ट, फ, करीत ते प्रथम वाचूं लागले, परंतु ही परिस्थिति फार दिवस राहिली नाहीं. आठवड्यांत एक दिवस म्हणजे फार कमी पडतो तर आपण तीन वेळां जमूं या, अशी सूचना आपण होऊनच भाऊसाहेबांनीं आणिली. त्याला नकार कोण देणार! घास-लेटच्या कंदिलाकरितां तेलाचा खर्च करण्याची तयारी भाऊसाहेबांनीं दाखविली. तेलाशिवाय नाहीं-तरी दुसरा खर्च कोणता होता? मी माझ्या घरचे हांतरण्याकरितां आणीत असे. आम्हां दोघां शिक्षकांची ५।६ वाचनीय पुस्तकें होती. पण काय ती विद्यार्थ्यांचीच!

कांहीं महिन्यांतच या आमच्या साक्षरतारक्षक शाळेंतील विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागली. देवादिकांच्या गोष्टींपासून सामाजिक गोष्टी— लघुकथावाचनाकडे कांहींचा कल जाऊं लागला. आठ दहा माणसें

वाचूं लागल्यावर आमचीं ५।६ पुस्तकें किती दिवस पुरणार ! हळूहळू शहरांतून एक एक पुस्तक खेड्यांत येऊं लागलें. पुस्तकें जमूं लागल्यावर तीं ठेवावयाचीं कोठें, हा प्रश्न उत्पन्न झाला. पुस्तकालयांत पुष्कळ पुस्तकें जमेपर्यंत तीं सर्व शाळेंतील एका कोनाड्यांत ठेवण्याचें आम्ही ठरविलें.

आपण कांहीं मंडळी कांहीं विशिष्ट हेतूनें एकत्र येतो, व तो हेतू चांगल्या रीतीनें सफळ होतो, तरी या कार्याचें सूचक असें एकादें नांव धारण करून एक संस्थाच जन्मास आणावी असें कांहींचें म्हणणें दिसलें. संस्था खरोखर जन्मास आली होती. परंतु जन्मास आलेल्या मुलांचें जसे ताबडतोब आपण नांव ठेवीत नाहीं; १०, १२ दिवस जाऊं द्यावे लागतात, त्याचप्रमाणें आमच्या या संस्थेची स्थिति होती. कांहीं संस्था अगोदर नांव धारण करून नंतर जन्मास येतात व कांहीं कालानें विलयास जातात; तशी स्थिति आमची नव्हती; असो.

आमच्यापैकीं कांहींनीं या संस्थेस—' वडगांव लायब्ररी' असें नांव सुचविलें. लायब्ररी या इंग्रजी शब्दाचे ऐवजी 'वडगांव वाचनालय ' असें असावें, अशी दुसऱ्यानें सुधारणा केली. परंतु आमचा मुख्य उद्देश केवळ वाचनालय स्थापण्याचा नव्हता, तर गांवाला साक्षर करण्याचा होता. साक्षरतेच्या कार्याला स्वयंसेवक प्रथम तयार करण्यासाठीं या वाचन संस्थेला आम्ही सुरवात केली होती. तेव्हां 'साक्षरता प्रसारक मंडळ ' यासारखें कांहीं तरी नांव असावें, असें आम्हांस वाटत होतें. एकदम नांव सुचविण्यापेक्षां प्रथम भावी कार्याची कल्पना देऊन नंतर हें सुचवावें म्हणजे सर्वांना त्याचें औचित्य कळून ठराव पास होण्यास अडचण येणार नाहीं, असें वाटल्यावरून मी भावी कार्याची रूपरेखा मंडळीपुढें ठेवण्यास सुरवात केली.

' मारुतीरायाच्या कृपेनें आज ४।५ महिने हें कथावाचनाचें आपलें काम निर्विघ्नपणें सतत चालू राहिलें याबद्दल प्रभुरायाचें आपण आभार

मानूं या. आपण सर्व तरुण मंडळी वेळांत वेळ काढून नियमानें जमतां, याबद्दल मी आपला आभारी आहे. तुम्हीं शाळेंत असतांना जीं क्रमिक पुस्तकें होतीं, तेवढीच तुम्ही वाचीत होता. त्या पुस्तकांबाहेर इतर कांहीं पुस्तकें वाचनीय आहेत, याची तुम्हांला कल्पना नव्हती. आपण एकत्र जमल्यापासून पुष्कळ गोष्टींचीं पुस्तकें तुमच्या पाहण्यांत आलीं व तीं बहुतेक आपण आनंदानें वाचलीं. या आपल्या उपक्रमाचा किती फायदा आहे हें मी सांगावयास पाहिजे असें नाहीं. दिवसभर आपण काबाडकष्ट करतों, तीं कामें उरकल्यानंतर मनाची करमणूक करणारीं, मनाला रंजविणारीं कांहीं पुस्तकें वाचणें अगदीं आवश्यक आहे. यायोगें आपला थकवा नाहींसा होतो. पुस्तक वाचल्यानें मनाची करमणूक होते, इतकेंच नव्हे तर, जगांत रहावे कसे याचें थोडें ज्ञानही होतें. जगांत सारखी धरपड चालू आहे. सुखाचा शोध सर्वत्र चालू आहे. आपल्या सुखासाठीं कोण काय प्रयत्न करतात हें आपणांस कळणें इष्ट नाहीं काय? निरनिराळ्या प्रकारचे रोग आहेत, त्यावर उपाय योजून काढणाराचे जगावर केवढे उपकार झाले आहेत! देवीपासून किंवा प्लेगापासून आतां फारशीं माणसें दगावत नाहींत, कारण वेगवेगळ्या लसी निघाल्या आहेत. त्या टोंचून अंगांत घातल्या म्हणजे रोग होत नाहींत. या लसी शोधून काढणारांनीं मानव प्राण्यावर अगणित उपकार करून ठेविले आहेत. आगगाड्या निघाल्या, मोटरगाड्या निघाल्या, व आतां तर विमानें निघालीं. या वाहनांचे साहाय्यानें थोड्या वेळांत दूर जातां येतें. आपले आप्त किंवा मित्र, जे कांहीं दिवसापूर्वीं अगदीं दूर असें वाटत असत, ते आतां कितीतरी जवळ आल्यासारखे वाटतात. एकाच इमारतींत राहणाऱ्या दोन माणसांनीं एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर बोलावयाचे त्याचप्रमाणें टेलिफोननें पुण्याचा मनुष्य मुंबईच्या

मनुष्याबरोबर बोलूं शकतो. ज्या मंडळींची आपली तोंड ओळखही नाहीं अशांची गाणीं ग्रामोफोनमधून आपण ऐकतों, व त्यांचीं चित्रें सिनेमामध्यें पाहातों. विजेच्या साहाय्यानें तर नानाप्रकारचे चमत्कार आज होत आहेत, हे आपण शहरांत गेलों म्हणजे दिसून येतें. या सुखाच्या सोयी—ज्या रोज नवीन आपल्या पाहाण्यांत येतात त्या—निर्माण करण्यास विचारी व ज्ञानी माणसेंच कारणीभूत नाहींत काय? या विचारी माणसांचे विचार आपणांस ऐकावयास नकोत काय ? हे विचार आपण न ऐकिले तर रानटी माणसाप्रमाणें आपली स्थिति होईल. कोणत्याही प्रकारचा विचार न करणारीं व दुसऱ्यांनीं केलेला विचार न ऐकणारीं कितीतरी माणसें आपल्या या हिंदी समाजांत आहेत! या लोकांना पाश्चिमात्य लोक रानटी मानतात. हें नांव आपणाला आवडत नसलें तरी यामुळें नांव ठेवणारे चुकले असें आपणांस म्हणतां येणार नाहीं. आपण या गांवांत आज १०।१२ शिकलेले लोक आहात. जगांतला थोडा तरी व्यवहार आपणाला कळतो. आपण रानटीपणाचा डाग—जो आपल्या देशाला लागला आहे तो—नाहींसा करण्याचा प्रयत्न करूं या. आपण वाचावयास, लिहावयास शिकलों. आपण आपल्या गांवांतील वडील-प्रौढ-माणसांना वाचावयास व लिहावयास शिकवूं या. आपण १० माणसांनीं प्रत्येकीं पांच माणसें साक्षर करावयाचीं असें ठरवूं या. सहा महिन्यांत तीं वाचूं लागतील असें मला वाटतें. हा माझा उद्देश आपणाला पसंत असेल तर आपल्या या संस्थेचें नांव 'वडगांव साक्षरता प्रसारक मंडळ' असें असावें असें मी सुचवितों. आपण सर्वांनीं मनावर घेतलें तर आपणास पुष्कळ यश येईल असा मला विश्वास वाटतो. आपल्या गांवांत साक्षरता झाली म्हणजे आपल्या शेजारचें गांव जागें होईल व तेंही ह्या स्तुत्य कार्याला लागेल. एका माणसाचें साहाय्यानें दुसरा, व एका गांवाचें उदाहरण पाहून दुसरा

गांव शिकूं लागला, म्हणजे संबंध समाज सुधारल्याशिवाय राहणार नाहीं.'

या माझ्या भाषणाचा योग्य तोच परिणाम झाला. सर्वांना नांव व हेतु पसंत पडला व हळू हळू मंडळी कार्यास येऊं लागली. अडचणीहि थोडया आल्या आणि त्या कोठें येत नाहींत. अगोदर आम्ही १०-१२ स्वयंसेवक होतो, परंतु प्रत्येक वर्षीं जेवढीं मुलें पास होऊन बाहेर पडावयाचीं तेवढीं स्वयंसेवक म्हणून काम करावयाचीं. एक वर्षानंतर या कार्याचा वाढदिवस म्हणून साजरा करण्याचें आम्ही ठरविलें. मुंबई शहरचे प्रसिद्ध वकील रा. भोळाभाई ठाकर हे कांहीं स्नेहसंबंधामुळें वडगावीं आले होते. त्यांचे अध्यक्षतेखालीं समारंभ साजरा करण्याची तयारी सुरू केली. शाळेच्या इमारतीबाहेर लहानसा मांडव उभारला. अशोकाच्या डहाळ्यांनीं व केळीच्या खुंटांनीं मांडव सुशोभित केला. ज्यांना ज्यांना लिहितां येते त्यांना एक पिवळ्या रंगाच्या जाडया कागदाचें बिल्लेवजा पदक छातीवर लावण्यासाठीं दिले. समारंभाचे वेळीं साक्षर माणसें एकदम ओळखतां यावींत हा हेतु. मी एकंदर कार्याचा अहवाल लिहिला व आमचे हेडमास्तर यांनीं सभेचे वेळीं तो वाचला. भाऊसाहेबांनीं अध्यक्षांचे व आलेल्या पाहुण्यांचें आभार मानले. आजूबाजूच्या खेडयांतील शिक्षक कांहीं प्रमुख मंडळीसह आले होते. त्यांनीं कार्याचें कौतुक केलें व अशा प्रकारचे प्रयत्न आपणही करावेत अशी इच्छा साहजिकच त्यांचें मनांत उत्पन्न झाली. अध्यक्षसाहेबांनींही कार्यकर्त्या मंडळींचें अभिनंदन करून प्रोत्साहनादाखल १०० रुपयांची देणगी दिली. यांतूनच तीस रुपयांपर्यंत एक लाकडी कपाट तयार केलें व बाकीची रक्कम पुस्तकांमध्यें खर्च केली. हातीं घेतलेल्या कामामध्यें यश आल्यामुळें आम्हा दोघांना–हेडमास्तरांना व मला मोठें समाधान वाटलें.

# प्रकरण ७ वें

## शाळेसाठीं मदत

रा. भोलाभाई ठाकर यांचे अध्यक्षतेखालीं केलेल्या समारंभानें सर्व वडगांव व वडगांवचे आसपासचा भाग खडबडून जागा झाला. खेड्याच्या शाळेमध्यें मुंबईचे धनिक शेटजी अध्यक्षाचे जागेकरितां लाभावेत, ही खरोखर वडगांवची पुण्याईच म्हणावयाची. श्रीमंत अध्यक्ष लाभून त्यांनीं आपल्या मोठेपणास शोभेल अशी देणगीही दिली, ही गांवकऱ्यांना विशेष आश्चर्याची गोष्ट वाटली. शहरांतल्या संस्थांना हजारांनीं देणग्या मिळत असतील, पण खेड्यांत होत असलेल्या लहानसहान प्रयत्नाचें कौतुक करावयास माणसें आहेत कुठें ! खेड्यांत उत्साह आहे, कार्य करून दाखविण्याची हौस आहे, परंतु त्या हौसेचें कौतुक करणारे कोणीही नाहीं. गांवाचे उत्सव गांवांतील लोकांच्या वर्गणीनेंच साजरे व्हावयाचे. दहापांच नाहींत, चांगले शंभर रुपये मिळाले, असे जो तो स्वाभिमानानें म्हणूं लागला.

या देणगीमुळें पुष्कळांना आनंद झाला; परंतु कांहीं उपद्व्यापी मंडळींना वाईटही वाटलें. शाळेच्या इमारतीमध्यें आज जवळजवळ वर्षभर काय कार्य नियमितपणें चाललें आहे, त्यांत कोण कोण भाग घेतात, संस्था खरोखर उपकारक आहे कीं नाहीं वगैरे कोणत्याही गोष्टींचा विचार न करतां, शाळेमध्यें समारंभ करून मास्तरनें शंभर रुपये मिळविले, मास्तरांचे शाळेकडे लक्ष नाहीं वगैरे मजकूर लिहून आमच्या नांवाचा रिपोर्ट मे. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर यांचेकडे झाला. खेड्यापासून दूर असलेल्या अधिकाऱ्यांना खरी वस्तुस्थिति काय आहे हें समजणें कठीण पडतें व असा एकाद्यानें उपद्व्याप केला म्हणजे

आपली खरी बाजू अधिकाऱ्यापुढें मांडणें ही अत्यंत त्रासाची व खर्चाची गोष्ट होऊन जाते. पत्रद्वारें सर्व लिहितां येत नाहीं व यासाठीं पदरमोड करून अधिकाऱ्यांना समक्ष भेटणें जरूर पडतें.

खेड्याची परिस्थिति आम्हा दोघां शिक्षकांना चांगली अवगत होती. दुसऱ्याचें चांगलें झालेलें कांहीं माणसांना कधीं पहावयाचें नाहीं. अशीं माणसें कांहीं भावड्या लोकांना हाताशीं धरून अनंत खटपटी करतात. दोन फळ्या ज्या गांवीं नाहींत असा गांव सहसा विरळा. या परिस्थितीमुळें गांवसुधारणा करणें कठीण पडते. बाहेरचे लोक मदत करतील, पण गांवच्या लोकांनीं भांडण्याचें व्रत सदैव चालविलें तर त्या मदतीचा काय उपयोग होणार! शेतकऱ्यांना मदत करण्याकरितां सरकारनें सहकारी ( को-ऑपरेटिव्ह ) खातें निर्माण केलें, परंतु त्याचा व्हावा असा उपयोग झाला नाहीं व होत नाहीं, याचें कारण काय? हें शेतकऱ्यांचें अज्ञान—हा विचित्र स्वभाव—शेतकरी सोडून देतील व आपलें हित कशांत आहे हें पाहतील तरच त्यांचा तरणोपाय आहे. स्वतः सुधारण्याचे प्रयत्न त्यांनीं न केलें तर बाहेरच्या कसल्याहि मदतीचा फायदा होणार नाहीं.

शिक्षकाचें मुख्य काम मुलांना शिक्षण देणें हें आहे व त्या कामाकरितांच बोर्डाकडून शिक्षकांना पगार मिळतो. या कामाव्यतिरिक्त कोणत्याही कामामध्यें शिक्षकानें पडूं नये, असे कांहीं गांवकऱ्यांना वाटतें. इतकेंच नव्हे तर, शाळाखात्याच्या अधिकाऱ्यांनाही वाटते. परंतु गांवची सुधारणा करणें म्हणजे पर्यायानें शाळा सुधारण्यासारखें आहे, अशी आमची ठाम समजूत असल्यामुळें आम्ही या इतर भानगडीमध्यें पडलों. चांगल्या हेतूनें काम करणाऱ्या शिक्षकांना देखील बऱ्याच वेळां त्रास सोसावा लागतो, हें आम्ही जाणून होतो व म्हणून प्रथमापासून

आमचे कार्यासंबंधीं गैरसमज—जनतेचा किंवा खात्याचा—होणार नाहीं याबद्दल आम्ही दक्ष होतों.

थोड्या महिन्यांपूर्वी आमच्या भागाचे सुपरवायझर शाळा तपासण्याकरितां आले होते. त्यावेळीं त्यांनीं आमचे गांव सुधारण्याचे प्रयत्न पाहिले होते. गांवकऱ्यांनीं मुख्य साहेबाकडे तक्रारी-अर्ज दिला तर तो नेहमीं सुपरवायजरकडे पाठविण्यांत येतो. हेतु हा कीं त्यांनीं गांवीं जाऊन वस्तुस्थिति काय आहे, ती समक्ष पहावी व रिपोर्ट करावा. आमच्या विरुद्ध केलेल्या अर्जाचीहि तीच गत झाली. तो सुपरवायझरसाहेबाकडे गेला व त्यांना सर्व माहिती असल्यामुळें त्यांनीं योग्य तो रिपोर्ट अधिकाऱ्याकडे दिला.

आम्ही दोघांनीं हें साक्षरता-मंडळ प्रामुख्यानें चालविलें असलें तरी त्या कामाची जबाबदारी कागदोपत्रीं तरी भाऊसाहेब आणि मंडळी यांचेकडे सोंपविली होती. शाळेस मिळालेली देणगी देखील समारंभ झाल्यानंतर गांवकऱ्यांसमक्ष भाऊसाहेबाचेजवळ, ते सेक्रेटरी व खजिनदार म्हणून, आम्ही दिली; यामुळें अधिकाऱ्यांना आमचा यत्किंचितहि संशय येणें शक्य नव्हतें. पूर्वींपासून हे सावधगिरीचें धोरण आम्हीं स्वीकारलें नसतें तर आम्हास बराच त्रास होण्याचा संभव होता. खऱ्याला मरण नसते हें जरी खरें असलें तरी त्या खऱ्याला रोग असा पछाडतो कीं, रोगानें हालअपेष्टा होण्यापेक्षां मरण बरें असें त्याला वाटूं लागतें.

आम्हाला शंभर रुपये एकदम कसे मिळाले याचें पुष्कळांना आश्चर्य वाटलें. त्यांना असें वाटलें कीं मास्तर शेटजीकडे समारंभाचे अध्यक्ष होण्याबद्दल विनंति करण्याकरितां गेले व शेटजीनें सहज कबूल केलें व देणगी दिली. परंतु ही देणगी सहजासहजी मिळालेली नाहीं व बहुतेक देणग्या तशा मिळतही नसतात. त्यासाठीं फार धडपड करावी

लागते. हे ठाकर आमच्या गांवचे रा. हिराचंद नानचंद यांचेकडे नेहमीं येत असत. हिराचंद नानचंद यांचा व आमचा फार लोभ. त्यांच्या एका लहान मुलास आमचे हेडमास्तर शिकवावयास जात असत, परंतु शिकविण्याबद्दल कोणत्याही प्रकारची फी घेत नसत. शेटजींनीं अनेक वेळां फी घेण्याबद्दल आग्रह केला असेल परंतु फी कशी ती त्यांनीं घेतली नाहीं. 'मला फी काय करावयाची आहे. मी एकटा प्राणी, वेळ रिकामा असतो, आपल्या घरीं मुलांबरोबर रमत गमत तो माझा वेळ मी घालवतों. याबद्दल पैसे काय म्हणून ?' असे आमचे हेडमास्तर नेहमीं म्हणत असत. यामुळें हिराचंद शेटजींचा हेडमास्तरावर फार लोभ बसला. मास्तर फी घेत नाहींत, तर दुसऱ्या कोणत्या तरी रीतीनें आपण आपल्या उपकाराची फेड करावी; असे शेटजींच्या मनांत नेहमीं येत असे. श्री. ठाकर यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें याचें खरें कारण आमचे हिराचंद शेटच. त्यांची शिफारस व त्यांचें वजन या ठिकाणीं खर्च न होतें तर शंभर रुपयांची देणगी मिळतीच ना.

ज्याप्रमाणें एकादें फळ आपणांस पाहिजे असेल तर अगोदर बीं लावावें लागतें, रोपटें वाढविण्यासाठीं त्याला पाणी घालावें लागतें, नंतर वृक्ष तयार होतो व त्याला फळ येतें; तद्वतच संस्थेकरितां देणगी मिळविण्यास खटपट करावी लागते. संस्थेची योजना किंवा नियम किंवा रिपोर्ट देऊन वर्गणी मिळत नसते. प्रथम स्वतः भेटून संस्थेची माहिती सांगून संस्थेचें कार्य नजरेखालीं घालण्याबद्दल विनंति करावी लागते. एकदां जाण्यानें कार्यसिद्धी न झाल्यास पुनः भेटण्याची तसदी घ्यावी लागते. संस्था स्तुत्य हेतूनें काम करीत असेल तर तिचे कार्याचा परिणाम सहसा झाल्याशिवाय रहात नाहीं. संस्थेचें कार्य समाधानकारक रीतीनें चाललें आहे ही दात्याची समजूत एकदां झाली म्हणजे संस्थे-बद्दल थोडा जिव्हाळा त्यास वाटावयास लागतो. हा जिव्हाळा कायम

राहील असें संस्था चालकानें केलें पाहिजे. संस्थेमध्यें वेळोवेळीं समारंभ होतात; त्यावेळीं अगत्य ठेवून त्यांना आमंत्रण दिलें पाहिजे. संस्था चांगलें कार्य करते व हें कार्य करण्यासाठीं तिला दुसऱ्याची मदत घेणें जरूर पडतें; हा विचार दात्यांच्या ठिकाणीं जागृत झाला कीं संस्थेच्या गरजा त्यांच्यापुढें मांडाव्यात. त्या गरजा मांडतांना दात्याची सांपत्तिक स्थिति व संस्थेबद्दल त्यांना वाटणारी कळकळ यांचा विचार व्हावयास पाहिजे. दाते श्रीमंत असतील परंतु कार्याबद्दल विशेष सहानुभूति त्यांचे ठिकाणीं उत्पन्न झाली नसेल, तर फारशी मदत मिळत नाहीं. योग्य, माणसाकडून योग्य मदत मिळावी असें वाटत असेल, तर कोणत्याही प्रकारची घाई करूं नये. वर्ष दोन वर्षांनीं १००।२०० रुपये मिळ-ण्याची संधि असतांना आजच ५।१० रुपयांवर संतुष्ट होऊं नये.

संस्थेस मदत करणारे लोक नेहमीं विचार करूनच मदत देत असतात, असे मात्र नाहीं. कित्येक वेळेला संस्थेबद्दल फारशी विचारपूस न करतां आपल्या गांवांतील पाटील किंवा एकाद्या खात्यांतील अधिकारी संस्था मदतीस लायक आहे असें म्हणतात, म्हणून लोक मदत करतात. एक दोन पुढाऱ्यांनीं मदत केली म्हणजे त्यांचे शब्दाला मान देऊन खेड्यांतील इतर लोक आपआपल्या शक्तीप्रमाणें मदत करतात; असा अनुभव आहे. संस्थाचालकांनीं दात्यांच्या विचाराला जेवढें जपावयास पाहिजे तेवढेंच त्यांच्या भावनांनाही जपावयास पाहिजे. कांहीं व्यक्तींना आपण त्यांच्या घरीं भेटलों व मदतीबद्दल गोष्ट काढली तर ते, त्यांच्या विचाराला येईल ती लहानसहान मदत करावयास तयार होतात. परंतु एखाद्या समारंभाचे वेळीं इतर मंडळी समक्ष त्याच व्यक्तींना मदतीबद्दल विनंति केली, तर जास्त मदत मिळण्याचा संभव असतो. प्रत्येक माणसाला एकांतात जें वाटतें त्यापेक्षां कांहींतरी वेगळें, तो समाजांत असतांना, त्याला वाटत असतें. समाजांत असतांना आपला व आपल्या

घराण्याचा मोठेपणा व समाजाशीं असलेला आपला संबंध याची विशेष जाणीव माणसांना होत असावी. घरीं सतरा चकरा घालून ज्या व्यक्ती वळत नाहींत त्या समारंभाचे वेळीं चार लोकांसमक्ष वळतात.

मदत मागण्याकरितां एकाद्या माणसाकडे जावयाचें केव्हां हा सुद्धा विचाराचा प्रश्न आहे. मनुष्य जरी एक असला तरी दिवसाच्या बारा तासाला त्याचे बारा रंग होतात. कधीं तो आनंदीत असेल, तर कधीं तो रागावलेला व कष्टी असूं शकेल. जेवण झालें आहे व मुलाबाळांसह तो आनंदानें पानसुपारी खात गप्पागोष्टी करीत आहे, अशा वेळीं आपण गेला असतां आपल्याला जो अनुभव येईल, त्यापेक्षां अगदीं वेगळा अनुभव तो ऑफिसांतून कावून आलेला आहे व अजून चहाही घेतला नाहीं, अशा वेळीं आपण गेला, तर आपणास मिळणार आहे.

एकदां आमच्या गांवच्या धनिक माणसाकडे मला मदतीसाठीं जाण्याचा प्रसंग आला. त्यांचे व गांवांतील दुसऱ्या एका धनिक माणसाचें बिनसलें होतें. जेव्हां जेव्हां मी त्यांचेकडे जाई तेव्हां तेव्हां ‘ तुम्हांला काय मोठ्या लोकांची मदत आहे. आमच्या मदतीची काय जरूर आहे. ’ असें त्यानें टोंचून म्हणावें. प्रत्येक वेळीं त्यानें टोंचून बोलावें व आम्ही तें सर्व विसरून पूर्ववत मोकळ्या मनानें पुनः त्याचेकडे जावे. चार पांच वेळां अशा रीतीनें गेल्यावर त्यांना काय वाटलें कोणास ठाऊक, ते होऊन म्हणाले, ‘ मग मास्तर तुम्हाला काय पाहिजे ! आम्हाला सोडीत नाहीं एकूण ! ’ त्यावर मी म्हणालों, ‘पाटील, आम्ही शाळेकरितां आपणाकडे येतों. आमच्या स्वतःच्या प्रपंचाकरितां एक पै देखील मागत नाहीं. एकदां सोडून दहादां जाण्यामध्यें आम्हाला लाज कां वाटावी ? आतां आपला व गांवांतील कांहीं मंडळींचा बेबनाव झाला असला, तर ती खाजगी बाब. त्यामध्यें आम्हांला पडण्याचें

कारण नाहीं.' यानंतर या गृहस्थानें टोंचून बोलण्याचें सोडून दिलें व थोडी फार मदत केली व ती आम्ही आनंदानें स्वीकारली.

श्रीमंताकडून मोठी रक्कम यावी असें आपणास वाटतें, परंतु ती तशी येतेच असें मात्र नाहीं. कित्येकांचे ठिकाणीं देण्याची प्रवृत्ति कमी असते. अशा वेळीं अमुकच आम्हाला मिळालें पाहिजे असा हेका न धरतां जें येईल तें आनंदानें स्वीकारावें. कार्याचें स्वरूप व इतर कमी श्रीमंत माणसांनीं केलेली जादा मदत पाहिली म्हणजे त्यांची त्यांना लाज वाटते व ते जास्त मदत पुनः करूं शकतात. ज्यांना कशानेंच पाझर फुटणार नाहीं, अशाही कांहीं व्यक्ती असतात, नाहीं असें नाहीं, पण त्या अपवादादाखल समजावयाच्या.

शाळेची स्थिति सुधारावयाची तर चांगलीं कार्यकर्ती माणसें व पैसा दोन्हीही पाहिजेत. परक्या माणसांनीं शाळेला शंभर रुपये दिल्यापासून गांवकऱ्यांनाही मदत करण्याची इच्छा उत्पन्न झाली. शाळा व शाळेच्या बाहेरचें जग हीं दोन्ही सुधारावयाची तर त्याला पैशाची चांगलीच मदत पाहिजे. शाळेच्या खरोखर गरजा काय आहेत, याची कल्पना गांवकऱ्यांना फारशी नव्हती. ती कल्पना यावी यासाठीं संक्रांतीचे निमित्तानें एक लहानसा समारंभ साजरा करण्याचें आम्हीं ठरविलें. अध्यक्ष गांवांतीलच निवडला. समारंभाकरितां फक्त दहा मुलांचाच संघ-व्यायाम घ्यावयाचें ठरविलें. हीं दहा मुलें निवडतांना पांढऱ्या पैरणीचीं व जवळजवळ सारख्या उंचीचीं निवडण्यांत आलीं होतीं. सर्वांचे धोतर पांढरें असतेंच. प्रथम निवडक मुलांकडून ईशप्रार्थना, स्वागतपर पद्य झालें, नंतर आमच्या हेडमास्तरांनीं शाळेसंबंधीं दोन शब्द सांगितले. हा अहवाल वाचतांना 'साक्षरताप्रसार मंडळाचा' प्रामुख्यानें उल्लेख केला होता. शाळेमध्यें आज ९० चे वर मुलें झालीं होतीं. दोन महिन्यामागेच मे. ॲड. ऑफिसर यांना जादा असिस्टंट देण्याबद्दल

विनंति केली होती व त्यांनीहि सवड होतांच तो देण्याचें मोठ्या आनंदानें कबूल केलें होतें. सवड होतांच याचा अर्थ दुसरीकडे कोठें शाळा बंद झाली किंवा मुलांची संख्या रोडावली व शाळेंतील शिक्षक कमी झाले म्हणजे तो शिक्षक आमच्यासारख्या वाढलेल्या शाळेला मिळावयाचा. पैशाच्या अभावीं सरकार जादा शिक्षक नेमण्याची परवानगी देत नाहीं व बोर्डाजवळही पुरेसा पैसा नसल्यामुळें स्वतःच्या पैशानें जादा शिक्षक नेमण्याची त्याला ताकद नाहीं. सक्तीचें शिक्षण राहिलें बाजूला, परंतु शाळेची जी स्वाभाविक वाढ होत आहे त्या वाढीला लागणारे पुरेसे शिक्षकही पुरवितां येऊं नयेत, हें देशाचें दुर्दैव होय ! या परिस्थितीमधून स्वराज्याला लायक असा हिंदुस्थान निर्माण होणार ! अजब कोडेंच हें ! ! आमच्या हेडमास्तरांनीं गांवकऱ्यांना एक अशी विनंति आपल्या अहवालमध्यें केली होती कीं, बोर्डाचा शिक्षक येईतोंपर्यंत गांवांतील एका व्ह. फायनल मुलास आम्हा दोघांचे मदतीस द्यावयाचें व त्याच्या पोटापाण्याकरितां धान्याच्या रूपानें किंवा पैशाचे रूपानें गांवकऱ्यांनीं मदत करावयाची. तोही मुलगा आज स्वस्थ बसून आहे. त्यालाही खात्यांत मास्तरची नोकरी मिळेपर्यंत थोड्या पगारावर काम करणें जड जाणार नाहीं.

वाढत्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न कसा सोडावयाचा याला आमच्या हेडमास्तरांनीं काढलेली तोड, आमच्या ‘ साक्षरता-प्रसार-मंडळाच्या ’ सभासदांच्या अनुमतीनें सुचविण्यांत आली होती. इतकेंच नव्हे तर अहवाल वाचनानंतर ज्या कांहीं व्यक्तींना भाषणें करण्याची विनंति करण्यांत येणार होती, त्यांमध्यें वरील मंडळाचे कांहीं सभासद होते व ते या जादा शिक्षक नेमण्याच्या सूचनेस जोराचा पाठिंबा देणार होते. याशिवाय अगदीं क्षुल्लक वाटणाऱ्या परंतु महत्त्वाच्या अशा दोन तीन सूचना होत्या. शाळेंत जीं मुलें येतात त्यांचे कपडे स्वच्छ नस-

तात. त्याचप्रमाणें कित्येकांच्या पैरणीला गुंड्या नसतात. गुंडी एकदा तुटली म्हणजे ती पैरण फाटेपर्यंत त्या पैरणीला गुंडी मिळावयाची नाहीं. बिचारे आईबाप सकाळपासून संध्याकाळपर्यंत कामामध्यें चूर असावयाचे. आतां गुंडी लावावयास वेळ किती लागावयाचा, परंतु शेजारच्या रामूच्या पैरणीला गुंडी नाहीं, मग आपल्या मारुतीच्या पैरणीला ती लावलीच पाहिजे असें त्यांना कधींही वाटत नाहीं. अंगांत अडकविण्यासाठीं एकादें वस्त्र असलें म्हणजे झालें ही त्यांची कल्पना. आपण घाणेरडे आहोंत ही कल्पना मुलांना येत नाहीं. शहरांत ज्याप्रमाणें आरशांत आपला चेहरा पाहून मुलगा शाळेस जावयास निघतो. आपल्या शेंडीचे केस बाहेर आले तर आपणास शाळेंतील मुलें हंसतील ही जाणीव त्याचे मनांत असते; परंतु खेड्यांत सर्वांचेच पोषाख गबाळ्यासारखे, कोणी कोणास हसावें ! ही लागलेली संवय नष्ट व्हावी व टापटीपीची संवय लागावी म्हणून एक पांच रुपयांचा मोठा आरसा शाळेमध्यें असणें जरूर आहे, अशी हेडमास्तरांची मागणी होती. 'कांहीं लो. बोर्ड शाळांमधून अशा आरशांच्या देणग्या देण्यांत येतात व त्यावर दात्याचें नांव घालण्यांत येतें. आपल्या वडिलांचे किंवा मातोश्रीचे पुण्यस्मरणार्थ पांच रुपयांची देणगी यासारख्या गांवांतून निघणार नाहीं असें मला वाटत नाहीं, ' हा रिपोर्टांतील मजकूर वाचला जात असतानांच कित्येकांचे चेहऱ्यावर प्रसन्नता दिसून आली व एकच काय पण तिघे गृहस्थ आरसा देण्यास तयार झाले.

आरशांत मुलांनीं आपला पोषाख व चेहरा पाहावा, तोंड स्वच्छ नसल्यास धुवावें, गुंडी नसेल तर ती लावावी, कपडे स्वच्छ नसतील तर ते धुवावेत ही एक नवीन कामगिरी मुलांना सोपविण्यांत आली. सर्वच मुलें आपले कपडे धुण्यास किंवा पैरणीस गुंड्या लावण्यास समर्थ असतात असें नाहीं. यासाठीं एक मोठ्या मुलांचा स्वयंसेवक—संघ

निर्माण करण्यांत आला. या मुलांनीं शाळेच्या स्वच्छतेकडे लक्ष द्यावयाचें असून लहान मुलांना मदत करावयाची असें ठरविलें. गुंड्या पुरविण्याची जबाबदारी एका गांवकऱ्यानें स्वीकारली, दुसऱ्यानें साबण देण्याचें कबूल केलें.

हेडमास्तरांनीं आपल्या अहवालांत ज्या दोनचार गोष्टी मागितल्या होत्या, म्हणजे गुंड्या, साबण, आरसा व शिक्षक, त्या गांवकऱ्यांनीं पुरविण्याचें कबूल केलें. परंतु कांहीं गोष्टीच्या उणीवा केवळ भासविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला, हेतु हा कीं समंजस गांवकऱ्यांना ती उणीव दिसून यावी. व्यायामाकरितां एका पोशाखामध्यें उभें केलेल्या दहा मुलांची ड्रील लोकांना फार आवडली. यापूर्वीं त्यांनीं ही ड्रील पाहिली होती; परंतु आज सारख्या पोशाखानें एक वेगळाच परिणाम त्यांच्या मनावर केला होता. विठू पाटलाचा मुलगा त्या दहा मुलांमध्यें ड्रील करण्यास अगदीं उत्सुक होता, आपल्या बापाला आपला मनोदयही त्यानें कळविला, परंतु अजूबाजूच्या मुलांनींच 'त्याची पैरण पांढरी नसल्यामुळें हेडमास्तरांनीं याची निवड केली नाहीं.' असें सांगितलें. हेडमास्तरकडे विठू पाटील आपल्या मुलाची तक्रारच घेऊन जाणार होते, परंतु त्यापूर्वींच मुलाकडून हें कारण समजल्यावर ते उठले नाहींत. मात्र पांढऱ्या पैरणीच्या अभावीं जर माझे मुलाची निवड झाली नसेल, तर ती आपण आणून देऊं हा विचार त्यांचे मनांत जागृत झाला, त्यांच्याच नव्हे, त्यांच्याप्रमाणें इतर पालकांना देखील आपल्या मुलांनीं खेळांत भाग घ्यावा असें वाटलें व समारंभ संपल्यानंतर या पालकांनीं हेडमास्तरांना आपला मनोदय कळविला. 'सर्वांचे पोशाख सारखे असले म्हणजे समारंभाचें वेळीं काम उठून दिसतें, व एवढयाच करितां या दहा मुलांची निवड केली. स्वच्छ पांढरे सदरे असते तर आज पन्नास मुलांचीं सामुदायिक ड्रील घेतां आली असती. बालवीरांचा जसा एक

विशिष्ट प्रकारचा पोशाख असतो तसा जरी करतां आला नाहीं तरी, प्रत्येकाजवळ एक पांढरा सदरा अत्यंत आवश्यक आहे, 'असें हेड-मास्तरांनीं समारंभ संपल्यानंतर खाजगी वाटाघाटींत कांहीं पालकांना सुचविलें.

समारंभाला सुरवात करण्यापूर्वीं अशीच एक उणीव लोकांच्या नजरेला आली. सभेची वेळ झाली होती. गांवकरी मंडळी जमली होती. इतक्यांत असें कळून आलें कीं, ज्या मुलांस रा. माधवराव गुरवाच्या एथून बाजाची पेटी आणावयास सांगितलें होतें, तो अजून आला नाहीं. 'पेटीकरितां समारंभ थांबला, पेटीकरितां समारंभ थांबला.' असें सर्वांना कळून चुकले. आमचे भाऊसाहेब सर्वांना ऐकूं जाईल अशा आवाजानें 'मास्तर आतां शाळेला एक बाजाची पेटी घेऊन टाका' असें म्हणाले व हेडमास्तरांनींहि 'होय, तोहि योग येईल लवकरच' असें हंसत हंसत म्हणून भाऊसाहेबांचे सूचनेस पाठिंबा दिला.

एकंदरींत हा संक्रांतीचा समारंभ फारच यशस्वी ठरला. शाळेला थोडी मदत झाली व याहीपेक्षां जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे संक्रांतीच्या सुमुहूर्तानें चांगल्या संवयी मुलांच्या अंगीं बाणण्याचे प्रयत्न सुरू झाले. ज्ञानाचा जसा आपण सरस्वतीशीं किंवा गणपतीशीं संबंध जोडतो, त्याचप्रमाणें स्वच्छता ही ईशस्वरूप आहे. स्वच्छतेची शिकवण ज्ञान-दानाबरोबर दिली गेली पाहिजे. आजच्या समारंभांत कल्पनेबाहेर यश मिळाल्याबद्दल आम्हां दोघां शिक्षकांनाच नव्हे तर आमच्या साक्षरता–प्रसार–मंडळास अत्यंत आनंद झाला. 'माझी शाळा' या भावनेनें शाळेकडे पाहाणारे लोक मिळाल्यावर शाळेचा प्रपंच कां वाढणार नाहीं !

—

# प्रकरण ८ वें

## आरोग्य-विषयक प्रयत्न

मुलांमध्यें साक्षरतेचा प्रसार चांगल्या प्रकारें करावयाचा तर तो मुलांच्या पालकांमध्येंही होणें इष्ट होतें व त्यासाठीं साक्षरता-प्रसार-संस्था निर्माण करण्यांत आली व याकरवीं गांवकऱ्यांना साक्षर बनविण्याचा प्रयत्न बऱ्याच अंशानें यशस्वीही झाला. शिक्षण प्रसार थोडा थोडा होऊं लागला. तो जास्त प्रमाणांत व्हावयाचा असेल तर त्याचा ज्या गोष्टींशीं संबंध आहे त्या गोष्टींचा विचार होणें जरूर आहे. मुलांना सुधारण्या-साठीं ज्याप्रमाणें त्यांचे संबंधी जे पालक त्यांना सुधारावे लागते, त्याप्रमाणें शिक्षणाचा संबंध आरोग्याशीं असल्यामुळें शिक्षणाचे पाठोपाठ आरोग्याचें रक्षणही व्हावयास पाहिजे. गांवांमध्यें नाना प्रकारचे रोग असतील तर त्याचा परिणाम मुलांचे हजेरीवर व्हावयाचा व वर्षांतून निम्मे दिवस मुलें गैरहजर राहूं लागलीं तर सर्व वर्गांचे जे अभ्यास वर्ष-अखेर व्हावयास पाहिजेत ते होणें शक्य नाहीं.

हे विचार सुचण्याचें कारण, एके दिवशीं नित्याप्रमाणें शाळा भरली. हजर गैरहजर मुलांची चौकशी झाली. आज गणू भुजबळ गैरहजर असल्याचें दिसून आलें. मुलांना विचारतां त्याला नारू झाल्याचें कळून आलें. दोन तीन दिवस त्याचे पायाचे घोटयास फोड आला होता व आज नारूनें तोंड काढल्यामुळें मुलगा अंथरुणावर पडून होता.

आम्ही दोघे संध्याकाळीं शाळा सुटल्यावर त्या मुलाचे पालकाला भेटा-वयास गेलों. पालक नुकतेच शेतावरून घरीं आले होते. आम्ही दोघे मुलाच्या समाचारास आलेले पाहून त्याला मोठें समाधान वाटलें. त्यानें

आम्हास बसण्यास घोंगडी दिली. मुलाचा पाय आम्ही पाहिला व इकडची तिकडची थोडी चौकशीहि केली. नारू बिघडलेल्या पाण्यामुळें होतात हें आम्हाला माहीत असल्यामुळें आम्ही पाणी कोठचें पितां म्हणून चौकशी केली. इतकेंच नव्हे तर ज्या विहिरीचें ते पाणी पीत होते ती विहीर आम्ही समक्ष पहावयासही गेलों.

भुजबळांचें कुटुंब व आणखी सात आठ कुटुंबें गांवापासून थोडे दूर अशा वाडीमध्यें रहात होतीं. या वाडींतील सर्व माणसें एका विहिरीचें पाणी पीत असत. या विहीरीस पायऱ्या होत्या व पायऱ्या उतरून पाणी नेण्याची सोय होती. या सात आठ कुटुंबांतील माणसें पिण्याकरितां लागणारें पाणी एथून नेत असत. त्याचप्रमाणें कांहीं माणसें या विहिरींत अंघोळ करीत असत. तसेच ही अंघोळ करणारी मंडळी व स्त्रिया येथेंच कपडे धूत असत. विहीर फारशी मोठी नसल्यामुळें व पाणीही मुबलक नसल्यामुळें पाण्याला गढुळपणा आला होता.

सात आठ कुटुंबांमध्यें नारूनें कोणी आजारी आहे काय हें पाहाण्यासाठीं आम्ही त्या त्या घरीं जाऊन चौकशी केली एका घराचे दारांतच एक गृहस्थ बसले होते. त्यांना विचारतां, ' होय बाबा मी चार महिने भोगतो आहे दुःख ' असे म्हणून त्यानें आपला पाय पुढें केला. या रोगासंबंधीं या लोकांच्या काय कल्पना आहेत हें अजमावण्यासाठीं आम्ही त्यांच्याशीं बोलणें सुरू केले. रा. भुजबळही आमच्या-बरोबर होते.

मी :—काहो, हे नारू कशानें होतात ?

गृहस्थः—काय सांगावे, हा आमच्या नशीबाचा खेळ, जेवढे भोगावयाचे तेवढे भोगल्याशिवाय काय सुटका आहे. देवादिकांना जेथें हे भोग सुटले नाहींत, तेथें आमची काय वाट !

मी:—देवादिकांना नारू कुठें झाले होते? आपल्या नाहीं बुवा हें वाचण्यांत.

गृहस्थ:—अहो नारूच कशाला पाहिजेत. श्री रामचंद्रांनीं वनवास नाहीं भोगला?

मी:—अहो, पण तुमच्या आमच्या सारखे आईबापांच्या पोटीं ते जन्मले होते. आपण जशीं माणसें आहोंत, तसे रामही होते. आपल्या आईबापांना जसा राग येतो व ते आपणाला कधीं मारतात, त्याच प्रमाणें रामाची सावत्र आई कैकेयी ही रामावर रागावली व तिनें दशरथाकडून त्याला वनवासाला पाठवावयाला लाविलें. रामाच्या दुःखाला कारण परमेश्वर नव्हता, तर त्याची आईच होती.

गृहस्थ:—तें इतकें कांहीं मला कळत नाहीं. पण रामासारख्या देवमाणसाला जेथें दुःख भोगावें लागलें, तेथें आमच्यासारख्या पापी माणसांचा पाड काय?

मी:—दुःख सर्वांनाच थोडें फार सहन करावें लागेल, पण जेथें तें टाळतां येण्यासारखें आहे तेथें तें टाळण्याचा प्रयत्न आपणांस करावयास नको काय? आतां नारू हा रोग घाण पाणी पोटांत गेल्यानें होतो. तुमच्या सबंध वडगांवांत या सात आठ घरांशिवाय कोठेंही नारू दिसत नाहींत, याचें कारण काय? याच घरांनीं असें काय पाप केलें आहे? गांवांतील सर्व विहिरी बंद आहेत. लोक रहाटानें पाणी काढतात. त्यामुळें पाणी घाण होत नाहीं. तुमच्या या विहिरीमध्यें तुम्ही आंघोळ करतां, कोणीही जावें व पाण्यांत तोंड धुवावें, खाकरे टाकावेत, नारू झालेल्या माणसांनीं जावे व आपले पाय पाण्यांत बुडवावेत. या योगानें पाण्यांत नारूचे किडे तयार होतात व तेच तुमच्या पोटांत पाणी पितांना जातात.

गृहस्थ:—मग याला काय करावें ?

मी:—पिण्याचें पाणी दुहेरी पदरानें गाळून घेतलें तरी हे किडे काढून टाकतां येतात, येवढे ते मोठे असतात. हें पाणी तापवून प्यालें तर त्याहीपेक्षां चांगलें.

गृहस्थ:—पण एवढें करायला रोज कसें फावणार ?

मी:—आपल्या आरोग्यासाठीं—सुखासाठीं—आपणांस हे करावयास नको काय ?

थोडी फार समजूत त्या माणसाची झाल्यासारखे दिसले. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं मंडळाचे सभासदापुढें आम्ही केलेल्या आरोग्य-पहाणीची हकीकत ठेविली व गांवांत साक्षरता वाढविण्यासाठीं जसे आपण प्रयत्न करीत आहोंत त्याप्रमाणें गांवाचें आरोग्य राखण्याकरितां देखील आपण यापुढें प्रयत्न करावयास हवेत अशी मी सूचना केली. याबाबतींत काय प्रयत्न करावयाचे हें नक्की करण्यापूर्वी सर्व गांवांत फिरून गांवच्या आरोग्याची पाहाणी करण्याचें ठरलें. आमच्या मंडळीपैकीं फक्त तीन सभासद व शिक्षकांपैकीं मी, अशा चार माणसांनीं संध्याकाळीं पांच नंतर फिरावयाचे व आठ दिवसांनीं याबाबीसंबंधीं काय उपाययोजना करतां येईल हें ठरविण्याकरितां जमावयाचें असें ठरलें.

प्रथम शाळेपासूनच आम्ही सुरवात केली, कारण याच ठिकाणीं आम्ही चौघांनीं जमावयाचें असें ठरविलें होतें. शाळेंतून निघाल्याबरोबर डाव्या बाजूला निवडुंग पुष्कळ माजून राहिला होता. या निवडुंगामुळें गांवांतील लोकांना प्रातर्विधि उरकण्यास एक चांगली जागा सांपडली होती. या निवडुंगाजवळ एक पडीक विहीर आम्हांस दिसली. तींत थोडें पाणीही होते. परंतु दगडमाती पडल्यामुळें ती बहुतेक बुजून गेली होती. शाळा गांवांबाहेर असल्यामुळें आपल्या घरांतील घाण

गांवाबाहेर, परंतु शाळेशेजारी, टाकण्यामध्यें लोकांना कोणतीच दिक्कत वाटत नव्हती. आपली किंवा आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांचीच मुलें या ठिकाणीं शिकावयास जावयाची, तरी त्यांच्या आरोग्यास बिघाड होईल असें कोणतेंच वर्तन आपण करतां कामा नये, असा विचारच त्यांना कधीं सुचला नाहीं व यामुळें जाणून बुजून गांवाला पीडा केल्याचें पाप त्यांचें पदरीं बांधण्यापेक्षां अजाणपणामुळें ते स्वतःचा करीत असलेला घात पाहून त्यांची आम्हाला कींवच करावीशी वाटते.

रस्त्यावर पडलेले लहान मोठे दगड, वाटेल तेथें उगवूं दिलेला निवडुंग, पडक्या इमारतीच्या ढासळलेल्या भिंती व तेथ वाढलल गवत, ही पाहात पाहात आम्ही एका शेतकऱ्याच्या वाड्यावर आलों. आंत शिरलों. नुकतींच जनावरें शेतावरून आलीं होतीं. गोठा सकाळीं झाडला होता, परंतु वाड्याच्या मधोमध सखल असल्यामुळें जनावरांचें मलमूत्र त्यांत थोडें फार राहिलें होतें व त्यांची दुर्गंधी येत होती. त्याच वाड्यांत एका बाजूला एक खड्डा करून त्यांत गुरांचें शेण व गवताच्या काड्यांकुड्या टाकण्याची सोय केली होती. या योजनेनें या शेतकऱ्यास वर्षाकांठीं शेतासाठीं खताची पैदास होत असे; पण या पैदासीबरोबरच डांस चिलटाचीही पैदास होत असे. या वाड्यांतील माणसांना या घाणीपासून विशेष त्रास होत असावा असें दिसलें नाहीं; कदाचित् हा संवयीचाही परिणाम असेल. मला मात्र त्या ठिकाणीं फारसें उभें रहावेना.

कांहीं घरांमध्यें आम्ही जाऊन तेथील आरोग्य पाहिलें घरामध्यें भरपूर उजेड व हवा खेळावी, हें तत्त्व बहुतेक ठिकाणीं पाळलेलें दिसलें नाहीं. शेतकऱ्यांचा बराच वेळ शेतावर– उघड्या हवेवर–जात असल्यामुळें त्यांना हवेशीर घरांची फारशी गरज नाहीं, असे कित्येकांना वाटत असेल. परंतु हें म्हणणें चुकीचें आहे. घरांत दिवसा हवा खेळणें जितकें आवश्यक आहे तितकीच ती रात्रीं खेळणें आवश्यक आहे. उजेड

आणि हवा येण्याचा दरवाजा दिवसाचा उघडा तरी असतो. परंतु रात्रीं तोही बंद होतो;व कोंदट हवेमध्यें कुटुंबांतील मुलांमाणसांना श्वासोच्छ्वास करणें भाग पडते.

आठ दिवसांनीं मंडळामध्यें ठरल्याप्रमाणें गांवांतील आरोग्यासंबंधाचा विचार झाला. आपण होऊन गांवांतील लोकांना शहाणपण शिकविण्या-पेक्षां सोनाराकडून कान टोंचणें बरें, असें आम्ही ठरविलें. शहरांमध्यें आरोग्याकडे किती लक्ष दिले जाते, व त्यांसाठीं म्युनिसिपालिटी किती खर्च करते याची साधारण कल्पना खेड्यांतील माणसांना असणें जरूर आहे. म्युनिसिपालिटीच्या आरोग्यखात्यांतील एका अधिकाऱ्यास विनंति करून व्याख्यान देण्याकरितां बोलवावें, असें आम्हाला अगोदर वाटलें. परंतु खेडेगांवांशीं म्युनिसिपालिटीचा कोणत्याही प्रकारचा संबंध नसतां असा अधिकारी मनुष्य पाठविण्यास म्युनिसिपालिटी सहसा तयार होणार नाहीं, असें पुनः वाटल्यामुळें पूर्वींचा तो बेत आम्हांस रहीत करावा लागला. जिल्हा स्कूलबोर्डामध्यें एक दोन मॅजिक लॅन्टर्नस असतात व त्यांचे सहाय्यानें सदीप व्याख्यान देण्याची जबाबदारी सुपरवायझिंग ऑफिसर्स यांचेकडे सोपविण्यांत आलेली असते. नारूच्या रोगासंबंधीं तसेच डांस, पिसवा, ढेकूण, माशी हे रोगांचे जंतू एका ठिकाणाहून दुसरीकडे कशी नेतात यासंबंधीं चित्रें तयार केलेलीं असून तीं कांहीं खेडयांतून दाखविली जातात; ही गोष्ट मला माहीत होती. आमच्या शाळेची या वर्षाची परीक्षा अजून व्हावयाची होती. या परीक्षेच्या वेळीं मे. सुपरवायझिंग ऑफिसर यांचेकडून सदीप व्याख्यानें देण्याची व्यवस्था व्हावी अशी विनंति गांवकऱ्यांनीं मे. ॲड. ऑफिसर यांचेकडे केली. आमच्या गांवांत आरोग्यविषयक व्याख्यानें करा असें आग्रहानें म्हणणारा. तो आमचाच गांव, हे पाहून मे. ॲड. ऑफिसर यांनीं आमच्या विनंतीस मोठया आनंदानें मान दिला. दोन व्याख्यानें

व्हावीत अशी आमची, इच्छा होती, परंतु मे. सुपरवायझिंग ऑफिसर यांना वेळ नसल्यामुळें एका व्याख्यानांतच नारूसंबंधीं कांहीं चित्रें व मलेरिया तापासंबंधीं कांहीं चित्रें दाखविण्यांत आलीं. नारू ज्या जंतू-पासून होतात तें जंतू पाण्यांतून कसे काढतां येतात व ज्या डांसापासून थंडीताप लागतो त्या डांसापासून आपलें रक्षण कसें करतां येते, हें चित्रांच्या सहाय्यानें उत्तम रीतीनें दाखविण्यात आले. व्याख्यानाचा परिणाम गांवचे लोकांवर चांगला झाला. नारूसारखे रोग कायमचे नाहीसें करण्याचें साधन माणसाजवळ असून देखील मनुष्य त्या बाबतींत किती बेफिकीर असतो, हें पाहून ज्यांचा त्याला अचंबा वाटला. शेवटीं मंडळातर्फे मे. सुपरवायझिंग ऑफिसर यांनीं आमच्या विनंतीस मान देऊन सदीप व्याख्यान दिले याबद्दल त्यांचें आभार मानण्यांत आले.

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं वाडीची दोन माणसें मंडळामध्यें आलीं. वाडीच्या विहिरीपासून होणारा त्रास कसा थांबवितां येईल याचा विचार झाला. प्रथम विहिरींत उतरण्याचा मार्ग कांटे लावून बंद करण्याचे ठरले. नंतर पाण्यामध्यें जे जंतू आहेत. ते नाहींसे करण्यासाठीं औषध आणून पाण्यांत टाकण्यांत यावे व त्यानंतर लागणारें पाणी शेंदून काढण्यांत यावें किंवा विहिरीस रहाट लावून रहाटानें काढण्यांत यावें असें सर्वानुमतें ठरले. वाडीच्या विहिरीची सर्व सुधारणा तेथें राहणाऱ्या मंडळींनीं करण्याचे आपल्या अंगावर घेतले. गांवाचे आरोग्याचा प्रश्न हा चुटकीसरशी सुटण्यासारखा नव्हता. कांहीं गोष्टी समजतात परंतु उमजत नाहींत. त्याकरितां कांहीं वेळ जाऊं द्यावा लागतो. वेळोवेळीं उपदेशाच्या चार गोष्टी लोकांना सांगाव्या लागतात. गोष्ट त्यांच्या हिताचीच असते परंतु ती देखील ऐकण्यास त्यांची तयारी नसते. आमच्या मंडळींतून थोडी वृद्ध व शांत स्वभावाची अशीं माणसें आम्ही निवडून त्यांचें एक आरोग्य-

मंडळ बनविलें. या मंडळामध्यें आम्ही कोणीही शिक्षक सभासद म्हणून भाग घेतला नाहीं; कारण शाळेच्या आरोग्यासंबंधींची पूर्ण जबाबदारी आम्हां शिक्षकांवर मंडळानें टाकली होती.

आम्ही तिघे शिक्षक व वरच्या इयत्तेंतील दोन विद्यार्थी असे मिळून शाळेकरितां आमचें आरोग्य-मंडळ आम्ही बनविलें. मुलांचे दांत पाहाणें, ते घासले नसतील तर राखेनें घासून घेणें, कपडे स्वच्छ नसतील तर तें धुणें, शाळा स्वच्छ झाडणें, शाळेसमोर—विशेषतः उन्हाळ्यांत—पाणी शिंपडणें वगैरे कामें एका शिक्षकाकडे सोंपविण्यांत आलीं होतीं व त्याचे मदतीस एक विद्यार्थी देण्यांत आला होता. आमच्या शाळेंत कांहीं चांभाराचीं व महाराचीं मुलें होतीं. महारांना भेटून शाळेसमोर पसरलेला निवडुंग त्यांच्या सवडीप्रमाणें काढण्याची विनंति त्यांना आम्हीं केली. तीं त्यांनीं मोठ्या आनंदानें स्वीकारली. पडीक विहिर जर दुरुस्त करतां आली तर तिचा उपयोग होईल. शाळेशेजारीं लहानशी बाग तयार करतां येईल. मुलें हौसेनें बागेला पाणी घालतील. म्हणून उन्हाळ्यामध्यें विहिरीचें पाणी कमी झाल्यावर त्यांत पडलेले दगड व माती काढण्याचे आम्ही ठरविले. एका वर्षांत शक्य न झाल्यास निदान दोन वर्षांनीं तरी विहीर आपल्या उपयोगास येईल असा भरंवसा आम्हांस वाटूं लागला.

शाळेंत मुलांची संख्या वाढूं लागली. आज तिसरा शिक्षक बोर्डाकडून मिळाला. गांवकऱ्यांनीं एक मदतनीस दिला होताच. शिक्षकांची संख्या पुरेशी असल्यामुळें शाळेच्या उपांगाकडे लक्ष देण्यास आम्हांस सवड सांपडत असे. आमच्या हेडमास्तरांचा प्रपंच म्हणजे शाळा. शाळेविषयीं नेहमीं विचार त्यांच्या डोक्यांत घोळत असावयाचे. ही सुधारणा कर ती सुधारणा कर. याला भेट त्याची विनवणी कर, हा मनुष्य स्वार्थ-

त्यागानें शाळेचें काम करीत आहे हें गांवकऱ्यांना कळून चुकल्यामुळें तेही त्यांना मदत देत असत. आज त्यांच्यापुढें एक मोठी अडचण उत्पन्न झाली होती. शाळेची मुलें वाढत होती. परंतु त्यांना बसण्यास पुरेशी अशी इमारत नव्हती. बोर्डाकडे सध्याच्या इमारतीस जोडून चार खण बांधून देण्याबद्दल विनंति करण्यांत आली होती. परंतु "इमारतीसाठीं बोर्डाजवळ पैसे नाहींत. फार तर एका वर्गास पुरेल एवढी जागा भाड्यानें घेण्याची सोय बोर्ड करील. शाळेजवळ एखादी सोयीस्कर जागा असल्यास पाहून भाडें किती द्यावें लागेल तें कळविणें म्हणजे इंजीनिअरसाहेबांना लिहून त्यांचेकडून जागा पसंत करून घेतां येईल." असे मे. चेअरमनसाहेब यांचेकडून उत्तर आलें होतें. इमारतीचा प्रश्न गांवकऱ्यांपुढें ठेविला, दुसरी जागा भाड्यानें घेण्यापेक्षां आहे तीच इमारत वाढवून घेणें जास्त हिताचे आहे. कारण त्यायोगें हेडमास्तरांना सर्व वर्गांवर देखरेख करतां येते व कमीजास्त ताबडतोब कळते. मालमसाला मिळाल्यास इमारत उभी करून देण्याची जबाबदारी गांवकऱ्यांनीं पत्करली. बोर्डाकडून इमारत दुरुस्तीसाठीं म्हणून पन्नास रुपये मिळण्याबद्दल बोर्डाकडे विनंति करण्यांत आली व मे. ॲड. ऑफिसरांच्या खटपटीनें आमची मागणी मंजूर झाली. या पन्नास रुपयांबरोबर गांवकऱ्यांकडून पन्नास रुपये मिळाले. दिवाळीपूर्वीं इमारत उभी करण्याचें ठरविलें. उन्हाळ्याची सुट्टी झाल्याबरोबर रा. भाऊसाहेब व हेडमास्तर यांनीं शहरांत जाऊन वासे व पत्रे खरेदी केले व इमारतीचे कामास सुरवात झाली.

# प्रकरण ९ वें

## उद्घाटन समारंभ व मे. चेअरमनसाहेब यांचें भाषण

आरोग्यविषयक प्रयत्न गांवांत थोडा फार सुरू झाला. शाळेमध्यें प्रार्थनेनंतर मुलांच्या कपड्यांची पाहाणी करण्याचा परिपाठ आम्ही ठेविला. रोज कपडे टापटिपीनें घालणाऱ्या विद्यार्थ्यांना आम्हीं अभ्यासाप्रमाणें कांहीं गुण देऊं लागलों. यामुळें जास्त टापटिपीनें राहण्याकडे मुलांची प्रवृत्ति दिसूं लागली. जीं मुलें दांत घाशीत नव्हती तीं घांसू लागलीं. रोज आंघोळ करणें किती हितावह आहे, जेवण कसें जेवावें, पाणी केव्हां व किती प्यावें, वगैरे गोष्टींविषयीं मी किंवा हेडमास्तर मुलांना सांगत असूं. आरोग्यासंबंधीं नुसतें व्याख्यान देणें कधींहि फलदायी होत नाहीं. मुलांमध्यें आरोग्याविषयीं आवड उत्पन्न व्हावी लागते आणि ही आवड संवयीशिवाय निर्माण होत नाहीं. मुलें अनुकरणप्रिय असतात. आईबाप, शिक्षक, यांचे तीं अनुकरण करतात. शिक्षकानें स्वतः स्वच्छ कपडे व्यवस्थेनें घातले म्हणजे ते कपडेच योग्य तो धडा मुलांना देण्यास समर्थ असतात. शिक्षणामध्यें प्रत्यक्ष शब्दज्ञानापेक्षां कृतीमुळें मिळणाऱ्या सूचनांचाच जास्त फायदा होतो. आरोग्य एका दिवसात सुधारणार नाहीं. त्यासाठीं चिकाटीनें सतत प्रयत्न व्हावयास पाहिजेत व ते आम्ही चालू ठेविले होते.

शाळेच्या इमारतीकडे गांवकऱ्यांनीं लक्ष घातलें होतें. यापूर्वी शिक्षणाप्रीत्यर्थ वडगांवानें जे प्रयत्न केले होते, त्यामुळें वडगांवचें नांव चार चौघांमध्यें निघूं लागलें. डेप्युटी कलेक्टर गांवावरून जातांना गांवची ख्याती ऐकून त्यांनीं शाळेला मुद्दाम भेट दिली. हेडमास्तरांना शाबासकी दिली व गांवकऱ्यांचें अभिनंदन केलें. कलेक्टरसाहेबांना मी तुमच्या कामाची

कल्पना देईन व पुढेंमागें शाळा पाहाण्यास त्यांना घेऊन येईन, असेंही त्यांनीं आश्वासन दिले. यामुळें गांवकऱ्यांना मूठभर मांस चढलें. आपण इतरांपेक्षां कांहीं तरी नवीन करून दाखवीत आहोंत, या भावनेनें त्यांचा हुरूप दुणावला व ते दुप्पट जोरानें इमारतीचे कार्यास लागले.

या इमारतीसाठीं दुसरी ईर्षा कारणीभूत झाली होती. जी गोष्ट बोर्डाला शक्य झाली नाहीं ती आम्ही केली, हें त्यांना दाखवावयाचें होते. मे. कलेक्टरसाहेबांचे अध्यक्षतेखालीं शाळेच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ घडवून आणावयाचा. बोर्डाचे चेअरमन व इतर सभासद यांना मुद्दाम आमंत्रण द्यावयाचें व त्यांना भर सभेमध्यें लाजवावयाचे, असा गांवकऱ्यांचा हेतु होता. कोणत्या का निमित्तानें होईना शाळेचें काम झपाट्यानें होऊं लागलें एवढें मात्र खरें. मध्यें थोडा पाऊस लागून राहिला. तेवढेच काय ते आठ दिवस गेले असतील. सप्टेंबर १५ चे सुमारास इमारतीचें काम बहुतेक संपलें. १७ आक्टोबरला दिवाळी होती, दिवाळीमध्यें उद्घाटन समारंभ धरावा असे बहुतेकांना वाटलें. परंतु मे. कलेक्टरसाहेबांना जर आमंत्रण द्यावयाचें तर त्यांच्या सोयीनीं तारीख घ्यावी लागेल. तारीख नक्की करण्याकरितां दोन माणसांनीं शहरांत जाऊन मे. कलेक्टरसाहेबांना भेटावयाचे असें ठरलें. मे. ठकार डेप्युटी कलेक्टर-ज्यांनीं पूर्वीं शाळेला भेट दिली होती ते—यांचेमार्फत कलेक्टरसाहेबांना आमंत्रण देण्याचें ठरलें. ठकारसाहेबांनीं कलेक्टरची व आम्हां गांवकऱ्यांची भेट घालून दिली. गांवसुधाराईच्या चालविलेल्या प्रयत्नांबद्दल कलेक्टरसाहेबांनीं आमचे आभार मानले. " कामाच्या निकडीमुळें मी येऊं शकत नाहीं, याबद्दल दिलगिरी वाटते. माझेऐवजीं माझे मित्र रा. ठकार यांनाच आपण अध्यक्षस्थान द्या. " असा त्यांनीं सल्ला दिल्यामुळें नाइलाज झाला व मे. ठकारसाहेबांना अध्यक्षस्थानीं मुक्रर करावें लागलें. तारीख नोव्हेंबर ५ निश्चित झाली. हें ठरल्यावर

मे. चेअरमनसाहेब स्कूलबोर्ड यांना भेटून समारंभास येण्याबद्दल आम्ही आग्रहाची विनंति केली. शहरांत जेवढे सभासद होते त्यांनाही आमंत्रण दिलें. आमंत्रणपत्राचा मसूदा तयार करून तो छापखान्यांत पाठविला. अजून समारंभास बराच अवधि होता, परंतु लोकांकडे आमंत्रण—पत्रिका शक्य तितक्या लवकर जाणें इष्ट असल्यामुळें गांवीं परत जातांनाच पत्रिका छापून नेण्याचें आम्ही ठरविलें.

सर्वांना आमंत्राणें गेलीं. दिनूकाका व त्यांचे कुटुंब दुर्गाकाकू यांना मी येण्याबद्दल विशेष कळकळीनें लिहिले होते. वृद्धापकाळामुळें दिनुकाकांची प्रकृति फारशी चांगली नव्हती, परंतु त्यांनींही येण्याचें अभिवचन दिलें. यात्रेच्या वेळीं देवळाचे कामासाठीं गांवकरी जितक्या प्रेमानें देवाचें कार्य म्हणून झटतात, तितक्याच प्रेमानें ते या समारंभासाठीं झटूं लागले. समारंभाच्या दिवशीं तर एकच गर्दी झाली. कांहीं जणांनीं केळीचे खुंट आणले. अशोकाचा पाला मुलांनीं गोळा केला. साहेबांची वाट पहात कांहीं माणसें गांवचे वाजंत्री घेऊन रस्त्यावर उभी होती. साहेब वर टरलेल्या वेळीं मोटारींतून आले, स्कूलबोर्ड चेअरमन व ॲड. ऑफिसर हे दुसऱ्या मोटारींतून आले. कांहीं स्कूलबोर्ड सभासद व जवळपासची ठळक ठळक मंडळी हजर होती. या समारंभाला स्त्रियांना बसण्याची स्वतंत्र सोय केली होती. या कामीं आमच्या दुर्गाकाकूंचेच श्रम कारणीभूत झाले. त्या पाटलांच्या मंडळीकडे गेल्या व त्यांना आग्रहानें समारंभास घेऊन आल्या. पाटलांची मंडळी आल्यामुळें इतरही स्त्रिया आल्या. समारंभामध्यें पुरुषांनीं मिरवावे व स्त्रियांनीं तो समारंभ लांबून आड बसून पहावा ही नेहमीची वहिवाट. ती वहिवाट मोडून पुरुषाबरोबर स्त्रिया बसलेल्या पाहून गांवकऱ्यांना आपण आज कांहीं तरी नवीन करतो आहोंत असें वाटलें.

आज पन्नास मुलांची ड्रील होणार होती. मुलींचेही खेळ व संवाद

होते. साक्षरता-प्रसार-मंडळाचे समासद समारंभांत 'मी बोलणार' म्हणून आग्रह धरीत होते. मुलांमुलींचें प्रार्थना गीत, स्वागतपर गीत झालें. रा. भाऊसाहेबांनीं आज स्वतः शाळेचा रिपोर्ट वाचला. त्याबरोबरच साक्षरता-प्रसार व आरोग्यविषयक कामगिरी निवेदन केली. 'गांवकऱ्यांनीं एवढी मेहनत घेऊन ज्ञानदानाचें कार्य चालविलें आहे, परंतु या बाबतींत स्कूल-बोर्डाची जवळ जवळ कांहींच मदत मिळत नाहीं, याबद्दल दिलगिरी वाटते' असे भाऊसाहेबांनीं ठासून वाचून दाखविलें. या मताचे पुष्टयर्थ जणूं काय, लोकांनीं टाळ्या वाजविल्या. रिपोर्ट वाचनानंतर सद्गृहस्थांचीं भाषणें होतीं. प्रथम मे. चेअरमनसाहेबांना विनंति करण्यांत आली व ती त्यांनीं आनंदानें स्वीकारली.

चेअरमनसाहेब:—बंधु भगिनींनो! आजच्या या प्रसंगीं मला आपण बोलण्याची संधि दिली याबद्दल मी आपला आभारी आहे. स्कूलबोर्ड ही संस्था काय स्वरूपाची आहे, याची योग्य कल्पना लोकांना नसल्यामुळें पुष्कळ वेळां तीसंबंधीं गैरसमज होतो. स्कूलबोर्डाची स्थिति काय आहे. हें थोडक्यांत आपल्या नजरेस आणावें व गैरसमज होत असतील तर ते टाळावेत; यांसाठीं ज्या ज्या वेळीं मला बोलण्याची संधि मिळते त्या त्या वेळीं मी तिचा फायदा घेतो.

आपल्या सर्वांची अशी समजूत झालेली असते कीं, बोर्डाजवळ पुष्कळ पैसा आहे, परंतु ती चुकीची आहे. ज्याप्रमाणें आपल्याला कुटुंबाचा खर्च भागवितांना अडचणी येतात, तशाच अडचणी स्कूलबोर्डालाही येतात. प्रथम ही गोष्ट आपण लक्षांत ठेविली पाहिजे कीं लोकलबोर्डाच्या संमतीशिवाय स्कूलबोर्ड एक पैचाही खर्च करूं शकत नाहीं. स्कूलबोर्डाला लागणारे पैसे लोकलबोर्डाला सरकार देते व लोकलबोर्डाकडून मग ते स्कूलबोर्डाला मिळतात. आपल्या बोर्डाला सर-

कारची सहा लाखाची देणगी असते व लोकलबोर्डाकडून ६० हजार मिळतात. बहुतेक पैसे सरकारकडून मिळत असल्यामुळें त्यांचे नियमाप्रमाणें सर्व खर्च करावा लागतो. कोठें किती खर्च करावयाचा हे सरकार ठरविते. जर एकादी नवीन वस्तू घ्यावयाची असेल तर सरकारची परवानगी घ्यावी लागते. ही परवानगी मिळाली तर सरकार आपल्या हिस्स्याचा खर्च करण्यास तयार आहे असें समजावें. ज्यावेळीं सरकारची खर्चास मंजुरी नसते, त्यावेळीं लोकलबोर्डाच्या संमतीनें लोकलबोर्डाच्या ६० हजारांतून स्कूलबोर्डाला खर्च करावा लागतो. यावरून स्कूलबोर्ड किती परस्वाधीन आहे याची आपल्याला कल्पना येईल. परवाचेच उदाहरण घ्या, आपली शाळा वाढली होती. इमारतीची अडचण भासूं लागली व आपल्याला जादा जागा भाड्यानें पाहिजे होती आपण जागाही शोधली व ती जागा घेण्यास परवानगी मागितली; परंतु बोर्डास अशा रीतीनें परवानगी देतां येत नाहीं. तुम्ही जागा पसंत केल्यावर आम्ही लोकल बोर्डाचे इंजीनिअरसाहेबांना लिहितो कीं अमुक अमुक जागा भाडयानें घ्यावयाची आहे, इतकें भाडें ठरलें आहे, वगैरे इंजीनिअरसाहेब जागा पाहातात. आरोग्याचे दृष्टीनें हवा, उजेड पुरेसा आहे कीं नाहीं, तसेंच मागितलेलें भाडें योग्य आहे कीं नाहीं याचा ते विचार करतात. ते जेव्हां म्हणतील कीं मागितलेलें भाडें योग्य आहे तेव्हां आम्हाला ती बाब स्कूलबोर्डापुढें मांडून मंजूर करून घ्यावी लागते. मागितलेलें भाडें जास्त आहे असें इंजीनीअर साहेबांनीं म्हटलें कीं आम्हाला कांहींच करतां येत नाहीं. एका लहानशा कामाला बोर्ड किती वेळ लावते, बोर्डाचा कारभार फार शिथिल आहे असें आपण मनांत म्हणत असाल, परंतु आम्ही तरी काय करणार! नियमच असे चमत्कारिक आहेत कीं त्यायोगें तांतडीनें काम होणें शक्य नाहीं.

सरकारनें हें शाळाखातें लोकलबोर्डाच्या म्हणजे लोकांच्या ताब्यांत

दिलें. त्यावेळीं शिक्षण प्रसारासाठीं दरवर्षीं वाढीनें खर्च देण्याची सरकारची तयारी होती. परंतु पुढें काळच असा खडतर आला कीं, त्यायोगें सर्वत्र काटाकाटी सुरू झाली. शाळाखातें बोर्डाचे ताब्यांत देतांना सरकारास कदाचित अशी अपेक्षा होती कीं लोकलबोर्ड लोकांवर कर बसवून प्राथमिक शिक्षणासाठीं पैसा उभा करील. परंतु पुष्कळ ठिकाणीं लोकलबोर्ड गरीब शेतकऱ्यावर कर लादण्यास तयार होईना व यामुळें सरकारचे मदतीवरच भागवून घेणें भाग पडते. आज सरकार म्हणते कीं आम्ही शाळा लोकलबोर्डाच्या, म्हणजे लोकांच्या, स्वाधीन केल्या. परंतु लोक लोकलबोर्ड याचा अर्थ सरकार असाच करतात. लोकलबोर्डाच्या शाळा म्हणजे सरकारच्या शाळा व सरकारजवळ पुष्कळ पैसा आहे अशी त्यांची समजूत आहे. सरकार म्हणजे कोण, ते पैसे कोठून आणते याची तरी त्यांना कल्पना कोठें आहे! एकूण शाळा कोणाच्याच ताब्यांत नाहींत. सरकारकरतां म्हणून शाळा चालविण्याचें काम स्कूलबोर्ड करतें, एवढेच.

आमच्या पैशावर लोकल बोर्डाच्या आणि स्कूल बोर्डाच्या उड्या, हे पाहून सरकारनें एक एक खर्च नामंजूर करण्यास सुरवात केली आहे. शाळेच्या बागेकडे होणारा खर्च नामंजूर, कारण बाग हा कांहीं प्राथमिक शिक्षणाचा भाग नाहीं. दुसऱ्यानें शाळेस बक्षिस दिलेली बाजाची पेटी दुरुस्त करावयाची झाल्यास दुरुस्तीचा खर्च नामंजूर, कारण गायनाचा अंतर्भाव प्राथमिक शिक्षणांत होत नाहीं. प्राथमिक शिक्षणाची व्याख्या कांहीं दिवसांनीं फारच मर्यादित होईल अशी भीति वाटते.

शिक्षणाचा प्रसार व्हावा यांसाठीं लहान गांवांला—जेथें लोक शाळा मागतात तेथें—शाळा देण्यांत येते. कांहीं महिने शाळा बरी चालते. पुढें एखादा रोग उद्भवतो व त्यामुळें लोक गांव सोडून जातात व शाळा बंद पडते. कित्येक वेळां शिक्षकाचें लक्ष कामाकडे नसते. त्याला

बदली हवी असते. तो बदलीबद्दल अर्ज करतो. बदली न झाली म्हणजे मुलें हळू हळू कमी करून तो शाळा उठवितो. या व इतर कारणामुळें शाळा बंद होते. यांत स्कूलबोर्डाचा किंवा गांवकऱ्यांचाहि दोष नसतो. परंतु बंद झालेल्या शाळावर केलेला खर्च सरकार देत नाहीं, म्हणजे तो लोकल बोर्डाला सोसावा लागतो. सरकारनें नियम केले असले तरी ज्या शिक्षण प्रसारासाठीं ते नियम केले आहेत तो शिक्षण प्रसारच जर नियमांच्या कडक अम्मलबजावणीनें थांबत असेल तर नियमांत बदल तरी व्हावयास पाहिजे किंवा ते नियम थोड्या सहानुभूतीनें तरी वापरावयास पाहिजेत.

एका स्कूलबोर्डामध्यें शिक्षकांचीं सर्व्हिस बुकें भरावयाचें काम तुंबून राहिलें. त्यांनीं प्लेगमुळें बंद झालेल्या शाळांच्या शिक्षकांच्या मदतीनें कांहीं सर्व्हिस बुकें भरून घेतलीं. यावर ऑडिट खात्यानें अशी चूक काढली कीं ज्या अर्थी शिक्षकांचा उपयोग कारकुनासारखा केला त्या अर्थी शिक्षकांचा पगार बोर्डास देण्यांत येऊं नये. म्हणजे प्लेगच्या सुटी-मुळें शिक्षकाला बसून पगार देण्यापेक्षां त्यांच्याकडून बोर्डानें इतर काम-गिरी करून घेतली ही बोर्डाची चूक झाली, असेंच पर्यायानें सरकारचें म्हणणें आहे. या उदाहरणावरून स्कूलबोर्डाबद्दल सरकारी खात्याची किती सहानुभूति आहे, हें दिसून येणार आहे.

अशा परिस्थितींत एकच तरणोपाय आहे व तो म्हणजे आपण गांव-कऱ्यांनीं घालून दिलेला धडा हाच होय. गांवकऱ्यांनीं यापुढें सरकार लोकलबोर्ड यावर फारसे अवलंबून न रहातां **शाळा माझी आहे** या भावनेनें शाळेकडे पाहिले पाहिजे. शाळा हेंच तुमचें पवित्र देवालय आहे. देशाला उद्धरून नेणारे कर्तबगार वीर याच देवालयांत तयार होणार आहेत. दगडाच्या देवळावर कितीहि खर्च केला तरी तेथें परमेश्वर प्रकट होणार नाहीं, ही गोष्ट आपण लक्षांत ठेवा.

खेडेगांवांत यापुढें फळ्या राहतां उपयोगी नाहींत. स्पृश्यास्पृश्य हिंदु-मुसलमान हे भेद राहतां उपयोगी नाहींत. खेडयांत बंधुत्वाचा प्रेमभाव जागृत झाला पाहिजे. नुसती इच्छा करून प्रेमभाव वाढत नसतो. जातीजातीमध्यें जाणें येणें राहील व सलोखा वाढेल असे केले पाहिजे. दुसऱ्याच्या आनंदामध्यें आनंद मानण्यास आपण शिकलें पाहिजे. हिंदूंच्या दिवाळींतली करंजी मुसलमानाला मिळाली पाहिजेत व ताबूताचें सणांतील मुसलमानांचा रोट हिंदूंना मिळाला पाहिजे. वडगांवच्या लोकांनीं शिक्षण प्रसार प्रौढामध्यें सुरू केला, गांवचें आरोग्यही सुधारलें याबद्दल त्यांचे कोणीही अभिनंदनच करील. यापुढें जाऊन मी त्यांना अशी विनंती करतो कीं, ज्यायोगें जातीजातींतील वैमनस्यें नष्ट होतील व आपण एका परमेश्वराचीं लेकरें आहोंत ही भावना उत्पन्न होईल, असा प्रयत्न त्यांनीं करावा. अशा तऱ्हेचा उपदेश मी कोठेंही केला नाहीं परंतु वडगांवचीं माणसें कर्तबगार दिसतात. त्यांच्यामध्यें शिस्त दिसेत व ते मनांत आणतील तर वाटेल ती गोष्ट करून दाखवितील, असें वाटल्या-वरूनच मी ही थोडी अवघड गोष्ट त्यांना सांगत आहे. आपली उन्नती आ-पण—ज्यानें त्यानें—करावयास पाहिजे. ही गोष्ट आपण विसरूं नका. बोर्ड शक्य तोंवर आपणास मदत करील, पण खरें यश तुमच्या प्रयत्नावरच अवलंबून आहे. मी खरोखर आपला फार वेळ घेतला; परंतु केव्हांतरी माझी बाजू मला आपल्यापुढें मांडावयाचीच होती व आपण मला ही संधि दिली याबद्दल मी आपला आभारी आहे.

यानंतर दोन तीन लोकांनीं थोडक्यांत भाषणें केलीं. शेवटीं अध्यक्ष महाराजांनीं मुलांना बक्षिसें वाटलीं व छोटेसें भाषण केलें. त्यांनीही चेअरमनसाहेबांचे भाषणाचा हवाला देऊन त्याप्रमाणें प्रयत्न करण्याचा उपदेश केला.

# प्रकरण १० वें

## धर्म–साधन

उद्‌घाटन समारंभ पार पडला. समारंभाप्रीत्यर्थ मे. डेप्युटी कलेक्टर साहेबांनीं शाळेस सुटी देण्याबद्दल हेडमास्तरांना विनंति केली होती. मुलांना व शिक्षकांनाही आनंद झाला. समारंभाची निरवानिरव करण्यासाठीं शिक्षकांना दुसरा दिवस पाहिजे होताच. कोणाची तार्टे, अत्तरदाण्या, गुलाबदाण्या, कोणाच्या सतरंज्या, झाजमे, तर शाळेला शोभा आणण्यासाठीं कोणाच्या तसबिरा आणल्या होत्या त्या परत करावयाच्या होत्या. केळीचे खुंट व ठिकठिकाणीं लावलेले अशोकाच्या पाल्याचे घोस काढून जागा साफ करावयाची होती व सगळ्या कामासाठीं अर्धा दिवस तरी पाहिजे होता. दुपारीं चार वाजतां आम्ही मोकळे झालों. दिनूकाका समारंभाकरितां आले, परंतु समारंभाचे दिवशीं त्यांच्याशीं १० मिनिटें बोलण्यास मला फुरसत झाली नाहीं. संध्याकाळीं मी हेडमास्तरांना घेऊन आमच्या बिऱ्हाडीं गेलों, कारण दिनूकाका माझे बिऱ्हाडीं उतरले होते. गांवच्या प्रगतीविषयीं दिनूकाकांना बऱ्याचशा गोष्टी समजल्या होत्या, त्या ऐकून त्यांना संतोष वाटला. शिक्षणप्रसाराचे बाबतींत मे. चेअरमनसाहेब यांनीं केलेलें वर्णन यथार्थ आहे असें दिनूकाकांचें मत पडलें. प्रत्येक खेड्याला शाळेबद्दल प्रेम वाटून ती वाढविण्याचा प्रयत्न आपुलकीचे भावनेनें व्हावयास पाहिजे, त्याशिवाय सध्याच्या काळांत तरणोपाय नाहीं.

परंतु शिक्षण सर्व गोष्टी करील काय ? आज खेड्यामध्यें काय किंवा शहरामध्यें काय जी उदार दृष्टि सर्वांमध्यें यावयास पाहिजे, ती केवळ शिक्षणानें होईल काय ? उदार मतें बनण्यास शिक्षणाचा उपयोग होईल

परंतु सर्व शिक्षणानें होईल असें मात्र नाहीं. हिंदूंनीं देवळांत जाऊन रामाची पूजा केली व मुसलमानांनीं मशिदींत जाऊन अल्लांची प्रार्थना केली तर त्यांत फारसे बिघडत नाहीं. परंतु जोपर्यंत हिंदूंच्या देवांना घंटानाद आवडतो व घंटानादामुळें मुसलमानांच्या प्रार्थनेचा भंग होतो तेथें हिंदुमुसलमानांचें मन जमावे कसे ? आज हिंदूंना, मुसलमानांना, ख्रिस्त्यांना व इतर धर्माचे लोकांना एका परमेश्वराचे मंदिरांत कसे आणतां येईल, हा प्रश्न आहे. एके ठिकाणीं जमून ' आपण एका परमेश्वराचीं लेकरें आहोंत ' अशी भावना सर्वांच्या ठिकाणीं जेव्हां उत्पन्न होईल, तेव्हांच खऱ्या प्रगतीस सुरवात होईल. तेव्हांच खरा धर्म लोकांना समजूं लागला असें म्हणतां येईल.

दिनूकाका या प्रश्नाचा स्वतःशीं विचार करीत होते. माझे विचार ऐकून ते म्हणाले, "अरे, बापू तूं म्हणतोस ते सर्व खरें आहे; पण ही घाट गळ्यांत बांधावयाची कोणी ? मला वाटते या तुझ्या धर्माला सुरवात शाळेंतच व्हावयास पाहिजे. आपण सर्व जातीच्या लोकांना शाळेंत घेतो. आतां आपलें राज्य असल्यामुळें स्पृश्य अस्पृश्य हा भेदहि आतां राहिला नाहीं. अशा सर्व जातीच्या लोकांना एकत्र करून परमेश्वर साधन करावयास पाहिजे. हिंदूंचें देऊळ नको, मुसलमानांची मशीद नको किंवा ख्रिस्त्यांचें चर्च नको. निसर्ग रमणीय अशा ठिकाणीं सर्वांना न्यावे, सभोंवार पसरलेली शोभा पहाण्यास मुलांना सांगावे, उंचवट्या-वरून लांबवर पसरलेले आजूबाजूचे भूमिभाग मुलांना दाखवावे, म्हणजे जगाच्या विशालतेची थोडी तरी कल्पना त्यांना येईल. अशा वेळीं त्यांची स्वार्थी व कोती दृष्टी वर डोकें काढणें शक्य नाहीं. अशा वेळीं विश्वाची कल्पना मुलांना द्यावी, स्वतःची क्षुद्रता त्यांना पटवावी म्हणजे शेजाऱ्या-

बद्दल—मग तो कोणत्याही जातीचा व धर्माचा असो—प्रेम उत्पन्न झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

दिनूकाकांनीं सुचविलेली युक्ति एकदां करून पाहाण्यासारखी होती. परंतु ती करण्यास हेडमास्तर किंवा मी समर्थ नव्हतो. परमेश्वराविषयीं ज्यांना कल्पना नाहीं अशांना—मग तीं लहान बालकें असोत किंवा मोठीं माणसें असोत—ती देणें, किंवा अशांचें लक्ष परमेश्वराकडे आकर्षणें ही खरोखर कठीण गोष्ट होती. हें कार्य यशस्वी रीतीनें करण्यास कोणी समर्थ असतील तर ते दिनूकाकाच, असें वाटून मी त्यांना हा प्रयोग करण्याबद्दल विनंति केली व ती त्यांनीं मान्यही केली.

कोणत्याहि कार्याला सुरवात करावयाची ती लहान प्रमाणांतच करावयाची असा आमचा नेहमींचा नियम असल्यामुळे प्रथम सातवींचीं मुलें घेऊन आम्ही जवळच्या टेकडीवर गेलों. सकाळीं लवकर उठून मुखमार्जन करून निघावयाचें असें आम्ही ठरविलें. दिनूकाकांनीं एक तुकारामाची गाथा व दुसरें कसलेंसें पद्यांचें पुस्तक घेतलें होते. सकाळचा गार वारा वाहात होता. टेकडीवर पसरलेल्या झाडाखालीं आम्ही बसलों होतों. झाडें हिरवी गार असून सर्वत्र मऊ गवत गालिचाप्रमाणें पसरले होते. सूर्य नुकताच वर आला होता. गांव आतां कोठें जागा व्हावयास लागला होता. टेकडीवरून सभोंवतालचा रम्य देखावा दिसत होता, दिनूकाकांच्या सभोंवतीं आम्ही सगळे बसलों. दिनूकाकांनीं पुस्तक काढलें व खालील दोन पद्यें गायिलीं. ते प्रथम एक ओळ म्हणत व आम्ही त्यांचे मागून ती म्हणत असूं.

उठा उठा हो सकळिक । वाचे स्मरा जगपालक ॥ शुद्धबुद्धीचा दायक । सुखकारक दासांसी॥१॥तोचि थोर या त्रिभुवनीं ।त्याच्या समान नाहीं कोणी ॥ तोचि दिनातें निर्वाणीं । पावें प्रेमें दीनसखा

॥ २ ॥ भावें आठवुनी अंतरीं । ध्याऊं दिनांचा कैवारी । तोचि तारक भवसागरीं। उद्धरि वेगें निजभक्तां ॥ ३ ॥ गाऊं त्याचें मंगल नाम । तोचि योग्यांचा विश्राम ॥ पावूं निश्चित निजसुखधाम । घेऊं दर्शन आनंदें ॥ ४ ॥

शुद्ध करूनि मन जन हो आपण नमूं ईशपायीं । जगिं ज्याचें सौंदर्य प्रगटलें या प्रातःसमयीं ॥ ध्रु० ॥ सत्य सनातन जीवन-दाता परम दयाळू पिता । नसेचि आम्हां घोर संकटीं सबळ दुजा त्राता । अनन्यभावें आर्तरवानें जो करुणा भाकितां । कळवळूनियां उडी घालितो भक्तहितांकरितां ॥ शुद्ध ॥ १ ॥ काल अमोलिक जातां वायां विसरुनि प्रभुराया । अनुतापानें चित्त जळुनियां लागो या पायां ॥ मंदबुद्धि ते दवडिति ऐशी अमूल्य नरकाया । सत्य सत्य हें वचन बोलले साधु ठाय ठायां ॥ शुद्ध ॥२॥ थोर आजि भाग्योदय झाला उत्सव दिन आला । स्तवन मनन प्रार्थना करुनियां आळवुं त्या प्रभुला ॥ रत होऊनि सत्कार्यीं त्याच्या मागूं सहाय्याला । न उपेक्षी जो वत्सल त्राता कदापि भक्तांला ॥ शुद्ध० ॥ ३ ॥

आज आपण लहान थोर या प्रातःसमयीं परमेश्वराचें सन्निध आलों आहोंत. परमेश्वर सर्वत्र भरलेला आहे, हें जरी खरें असलें, तरी त्याचें अस्तित्व कांहीं ठिकाणींच पटते ही गोष्ट तितकीच खरी आहे. हवा सर्वत्र असली तरी कांहीं ठिकाणीं ती दाट तर कांहीं ठिकाणीं ती विरल असते. सायकलच्या टायरमध्यें हवेचा दाब जास्त आहे. यामुळेंच सायकलवरून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं आपण जाऊं शकतो. या प्रभातकाळीं आपापलीं घरें सोडून ज्या ठिकाणीं विश्वकर्म्याचें सौंदर्य कोंदलें आहे अशा ठिकाणीं आपण जमलों आहोंत. एथें परमेश्वराजवळ आल्याचा आपणांस भास होतो. सुंदर वृक्ष, हिरवें गार गवत, सभोंवार पसरलेला भूमी प्रदेश, नुकताच वर येणारा रवि,

शरीराला आल्हाद देणारा थंड वारा, या सगळ्या गोष्टी पैसा खर्चून बांधलेल्या घरांमध्यें आपणास मिळणार नाहींत. देऊळ बांधून तेथें आपण मूर्तीची स्थापन करतो. देवदर्शनासाठीं आपलीं घरें सोडून तेथें जातो, परंतु तेथें देखील हा आनंद आपणास लाभत नाहीं. कारण उघड आहे. देऊळ हें देखील एक घरच आहे. तें उत्तम शृंगारलेलें असेल, मनाला प्रसन्नता उत्पन्न करणारें असेल, परंतु शेवटीं तें घरच. हें माझें घर असें आपण ज्या अभिमानानें म्हणतो त्याच अभिमानानें 'हें माझें देऊळ' असें म्हणणारे असतात ना! आपण सर्व सारख्याच अधिकाराचीं, एका परमेश्वराचीं' लेंकरें ही भावना तेथें उत्पन्न होत नाहीं. अस्पृश्य हे अनाधिकारी, त्यांना मी माझ्या मालकीच्या देवळांत शिरूं देणार नाहीं, असे न्यायासनासमोर सांगणारे प्रतिष्ठित लोक आज आपल्या समाजांत आहेतच ना! घरांत उत्पन्न होणारा अभिमान-स्वार्थी कोती दृष्टी—या ठिकाणीं उत्पन्न होत नाहीं. घराशेजारीं घर असले तरीं शेजाऱ्यांचीं मनें एकमेकाजवळ असतात असें मात्र नाहीं. एथें गांवाच्या वेगवेगळ्या भागांतून आपण आलों असलों तरी आपण एक आहोंत असें वाटतें. आपणामध्यें स्पृश्य आहेत, हिंदु आहेत, मुसलमान आहेत, वृद्ध आहेत, तरुण आहेत, तरी आपण सर्व एकाच दालनांतून सूर्याच्या किरणाकडे—परमेश्वराकडे पहात आहोंत असें वाटतें. हा जो सुप्रसंग घडून आला त्याबद्दल परमेश्वराचें आपण आभार मानूं या!

या ठिकाणावरून आजूबाजूचा पांच दहा मैलाचा भाग आपणांस दिसतो. उंच अशा डोंगरावर आपण गेलांत तर याहीपेक्षां जास्त विस्तार आपण पाहूं शकूं. विमानांतून तर पुष्कळच गोष्टी आपल्या नजरेस येतील. पृथ्वी सोडून लांब जाणें शक्य झालें तर पृथ्वी हा एक गोळ आकाशांत स्वतः भोवतीं फिरतांना आपणांस दिसेल. हा प्रचंड गोळ पाहून तुम्ही थक्क व्हाल, परंतु यासारखे अनेक गोळ सूर्याभोंवतीं

फिरत आहेत. सूर्य व त्याचे भोंवतीं फिरणारे गोल हे सूर्याचें लहानसें कुटुंब किंवा सूर्यमाला आपण म्हणूं या. हजारों मैल लांब दूर असून सूर्याचा ताप आपणास असह्य होतो. यावरून त्याच्या तेजाची कल्पना करतां येण्यासारखी आहे. सूर्य हा सर्वांत मोठा अशी आपली समजूत असेल. परंतु या सूर्यापेक्षां पुष्कळ पटीनें मोठे असे असंख्य सूर्य असून त्यांनाच ताऱ्यांच्या रूपांत आपण रात्रीं पाहातों. आपला सूर्य आपल्या गणगोताला बरोबर घेऊन दुसऱ्या सूर्याभोंवतीं फिरत आहे. तो मोठा सूर्य तिसऱ्या बलाढ्य सूर्याभोंवतीं फिरत आहे. असे वर वर जाऊं लागलों व मोठमोठे सूर्य धुंडाळूं लागलों म्हणजे सर्वांत मोठ्या सूर्याची व तुमची भेट होईल, असे तुम्हांस वाटेल. परंतु तें शक्य नाहीं; म्हणून या विश्वाचा विस्तार अतर्क्य आहे असें आपण म्हणतों. म्हणून परमेश्वराला **अनंत** असें म्हणतात.

अनंताची कल्पना एका जर्मन पंडितानें खालीलप्रमाणें दिली आहे. ' अगदीं उत्तरेच्या बाजूला एक प्रांत आहे. तेथें एक खडक आहे. तो शंभर मैल उंच व शंभर मैल लांबरुंद आहे. हजार वर्षांतून फक्त एक दिवस एक लहान पक्षी आपली चोंच या दगडावर परजण्याकरितां येतो. अशा तऱ्हेनें घासून घासून जेव्हां तो खडक नाहींसा होईल तेव्हां अनंताचा एक दिवस होईल. '

हें अनंत विश्व आपण आपल्या डोळ्यांपुढें ठेवून तेथें आपली पृथ्वी कोठें आहे हें शोधण्याचा प्रयत्न करूं या. ही पृथ्वी शोधणें म्हणजे समुद्रकाठीं पडलेल्या असंख्य वाळूच्या कणामध्यें तुमचा वाळूचा कण शोधण्यासारखे आहे. जेथें तुमच्या पृथ्वीचा पत्ता लागत ह नाहीतेथें, तुमचा देश, तुमचा गांव, तुमचें घर व तुम्ही स्वतः कोठून दिसणार ! या विश्वाचें दर्शन घ्या व मग गर्वानें फुगलेल्या व्यक्ती पहा. तुम्हाला त्यांच्या मूर्खपणाचें हसूं येईल.

बंधूहो आपण तितकेच अभिमानी नाहीं काय? जात, देश, धर्म, कूळ यांचा फाजिल अभिमान बाळगून आपण स्वतःचें हंसे करून घेत नाहीं काय! एकमेकांबद्दल कोते विचार प्रगट करीत नाहीं काय? ही आपली चूक आपल्या लक्षांत येत नाहीं व म्हणूनच आपण आपल्याला घोर संकटांत पाडून घेतों. एथें आपण जमलों व ही चूक-हें संकट-आपल्याला दिसूं लागलें; म्हणूनच एथें परमेश्वर भेटला असें आपण म्हणतों.

या मंगल समयीं आपण गाऊं या. आपलें मन आपण शुद्ध करूं या व साधुसंतांनीं जो उपदेश आपणासाठीं लिहून ठेवला आहे तो पाहूं या. रोज आपणांस एकत्र एथें जमतां येणार नाहीं परंतु आठवड्यांतून एकदां तरी आपण एथें येऊन परमेश्वराचें स्मरण करूं या. तुकाराम नामदेवादि संतांचे ग्रंथ घ्या. इतर धर्मांचे ग्रंथ घ्या, त्यांचें वाचन करा, अर्थ समजावून घ्या व त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करा. एकदम सर्व गोष्टी साध्य होणार नाहींत. परंतु आपलें चुकतें आहे व तें दुरुस्त करावयास पाहिजे, ही भावना ठेवून आपण कार्यास लागला तर, पद्यामध्यें म्हटल्याप्रमाणें, आपला काळ-आपलें आयुष्य-वांया जाणार नाहीं; व शेवटीं परमेश्वराच्या या दरबारांत परमेश्वराच्या नियमाप्रमाणें मी वागलों, एवढें समाधान प्राप्त होईल. आपण देवाची प्रार्थना कवितेमधून करतो. 'देवा आम्ही बाळ, आमुचा सांभाळ कीजे सर्व काळ, दीनबंधु! आहो बळहीन नाहीं आम्हा ज्ञान आमुचें पालन कीजे देवा॥' आपण ही कविता गात असतों व गातांना पुष्कळ वेळेला नादाकडे-संगीताकडे-लक्ष गेल्यामुळें जी जाणीव व जो भाव अंतःकरणांत उत्पन्न व्हावयास पाहिजे तो उत्पन्न होत नाहीं यासाठीं तीच कविता साध्या शब्दामध्यें बोलून आपण परमेश्वराची प्रार्थना करूं या.

"देवा! आपण समर्थ आहांत, आपण मायबाप आहांत, आम्ही

तुझी अज्ञ लेकरें आहोंत. आम्ही पदोपदीं चुकतों. ज्याप्रमाणें प्रेमळ माता बालकांचा सांभाळ करते, त्याप्रमाणें तूं आमचा सांभाळ कर. तूं आम्हांसाठीं सुंदर सृष्टि निर्माण केलीस, आम्ही मात्र स्वतःच्या घरांत दाराआड बसून ती दृष्टीआड केली; तूं प्रकाश दिला, पण आम्ही दार लावून अंधार केला व अंधारामध्यें ठेंचाळून तुलाच दोष देत बसलों. ही आमची प्रभुराया भूल आहे. ही भूल नाहींशीं कर. हीच तुझे चरणीं आमची प्रार्थना आहे. ''

सर्वांनीं प्रभूला नमस्कार केला. पांच मिनिटें तेथेंच बसून नंतर टेकडी उतरण्यास आम्ही लागलों.

थोडयाच वेळांत गांवांत प्रवेश केला. कांहीं लोक शेतावर निघाले होते. तर कांहीं नुकतेच उठले असून आळसत दांत घाशीत बसले होते. आम्ही या गांवचें व हीं माणसेंही याच गांवचीं. दोन तास अगो-दर उठून टेकडीवर जाऊन जें आम्ही मिळविलें त्याची कल्पना या आळशांना कोठून येणार, असा ओझरता विचार माझ्या डोक्यांत आला. हीं माणसें आळस टाकतील तर ! वडगांवचें भाग्य आजच्यापेक्षां जास्त उदयास येईल.

मुलें आपापल्या घरीं गेलीं. दिनूकाका, हेडमास्तर व मी आमच्या बिऱ्हाडीं गेलों. हेडमास्तरांना आज आमच्या येथेंच जेवणाचें आमंत्रण होतें; घडीभर गप्पा मारतां याव्यात हा हेतु होता.

बारा वाजतां जेवणें झालीं. आम्ही सर्व मंडळी एकत्र बसलों. आमच्या बरोबर माझी आई व दुर्गाकाकू ह्या होत्या. आजच्या नवीन उपक्रमाची हकीकत दुर्गाकाकूंना सांगितली. धर्मशिक्षण शाळांतून देतां येत नसलें तरी त्या शिक्षणाची आज जरूर आहे, असें सर्वांचें म्हणणें पडलें. पूर्वीची धर्मशिक्षण देण्याची पद्धत आज फारशी उपयोगी पडणार नाहीं.

हिंदूंचा धर्म वेगळा व मुसलमानांचा धर्म वेगळा ही भावना नष्ट होऊन सर्वांचा धर्म एक ही भावना रुढ व्हावयास पाहिजे व त्या अनुरोधानें शिक्षण दिलें गेलें पाहिजे. हिंदूंनीं आपला धर्म काय आहे हें जरूर पाहावें, परंतु हें पाहिल्यावर इतर धर्माचें सुद्धां काय म्हणणें आहे याचा थोडासा विचार करावा. अशा प्रकारें तारतम्यानें धर्मशिक्षण झाल्यास सर्वांचा धर्म एकच ही समजूत रुढ होईल व वेड्या धर्मसमजुतीमुळें होणारे कलह टाळतां येतील.

दुर्गाकाकू:—तुमचा हा एक धर्म किंवा एकेश्वर प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केव्हांही स्तुत्य आहे, परंतु या धर्माची सुरवात कोठें व कशी करणार हाच माझ्या मतें विचाराचा प्रश्न आहे. आज धर्म जो शिल्लक राहिला आहे तो स्त्रियांमध्येंच. खरे पहातां खाण्यापलीकडे धर्मच राहिला नाहीं. आज काय दिवाळी आली करंज्या करा, उद्यां काय शिमगा आला पोळ्या करा; याशिवाय धर्माच्या काय कल्पना राहिल्या आहेत? परमेश्वराचा आणि आपला कांही संबंध आहे ही जाणीव जागृत करण्याचे प्रसंग रोज नाहीं, आठवड्यांतून एकदाही येत नाहीं. घरांत देव असले म्हणजे एकाद्या मुलाला किंवा मुलीला ते पुजायला सांगायाचें. त्या मुलांनीं तें आपल्यावर एक संकटच समजून कसेंबसें त्या देवाना पाण्यांतून बुडवून काढावयाचे. या व्यतिरिक्त आम्ही काय करतों? अशीं किती कुटुंबें आहत कीं तेथें लहान थोर सकाळीं किंवा रात्रीं देवाला स्मरून त्याची प्रार्थना करतात किंवा साधूसंतांनीं तयार केलेलीं भक्तिपर पद्यें म्हणतात? तुमच्या धर्मामध्यें स्त्रियांचा शिरकाव झाल्याशिवाय किंवा त्यांनींच यामध्यें पुढाकार घेतल्याशिवाय विशेष प्रगति होईल असें मला तरी वाटत नाहीं.

हेडमास्तर:—मी आज सकाळपासून या नवीन उपक्रमाबद्दल विचार करतो आहे. यापासून हिंदूंना काय वाटेल, मुसलमानांना काय

वाटेल, आपल्याला कोणती कामगिरी करतां येईल, शिक्षकानें या धार्मिक बाबतींत पडावे कीं हें कार्य दुसऱ्यावर सोंपवावें. दुर्गाकाकूंचा विचार आम्हां पुरुषांना पटण्यासारखा नसला तरी त्यांत बरेचसे तथ्य आहे. आतां त्या विचाराप्रमाणें एथें कार्य सुरू करावयाचे म्हटलें तर मोठी अडचण आहे. पुरुष आतां थोडे घराबाहेर पडूं लागले आहेत, तोंड उघडून बोलूं लागले आहेत. त्या दिवशीं समारंभाच्या वेळीं मोठ्या जुलु-मानें दुर्गाकाकूंनीं कांहीं बाया जमा केल्या. आता कोठे थोड्याश्या मुली शाळेंत येऊं लागल्या आहेत. स्त्रियांमध्यें जागृती उत्पन्न होऊन त्यांच्या-मध्यें कार्यकर्त्या विदूषी निर्माण होण्याला बराच अवकाश आहे असे मला वाटते.

दिनूकाका:—मास्तरांनीं अडचण दाखविली ती बरोबर आहे, परंतु या धार्मिक बाबतीमध्यें शिक्षणाचें विशेष काम नाहीं. धार्मिक बाब-तींत जेवढ्या स्त्रिया एकत्र येतील तेवढ्या इतर कार्यामध्यें येणार नाहींत. समारंभाच्या वेळीं स्त्रिया जमविणें कठीण पडेल पण कथेला तितकीशी अडचण भासणार नाहीं. भाविकपणा हा स्त्रियांमध्यें फार आहे. प्रेम, इतराकरितां त्रास सोसण्याची तयारी, स्त्रियांमध्यें नेहमींच आपण पाहातों. त्यांना फक्त मार्गदर्शन पाहिजे आहे म्हणजे अगदीं अडाणी बाया देखील काम करून दाखवितील.

मी:—मला वाटते या बाबतींत बराचसा विचार व थोडेसें कार्य दुर्गाकाकूंनीं केले आहे, त्यांनींच या बाबतीत पुढाकार घ्यावा व आमच्या या वडगांवावर उपकार करावेत.

दुर्गाकाकू:—मी काय दोन दिवसांची पाहुणी. दुसऱ्या कोणीतरी बाया तयार करणें जास्त बरें. मोठ्या सभा करण्यापेक्षां दोन तीन कुटूं-बांनी मिळून गुरुवारचें किंवा रविवारचें भजन सुरू करावे. भजनाची आवड एकदां लागली म्हणजे मग महिन्यांतून एकदा आठ दहा कुटुं-

बांनीं मिळून धर्मसाधन करावें. एखाद्या विद्वानांनीं तुकाराम ज्ञानेश्वरांच्या अभंगाचा अर्थबोध करावा. या उपक्रमामुळें कुटुंबाकुटुंबांत जाणें तरी सुरू होईल.

दिनूकाका:—या कामीं धार्मिक प्रवृत्तीच्या कांहीं वृद्धांची मदत घेतली पाहिजे. हीं माणसें व्यावहारिक असतील, चार लोकांवर त्यांचें वजन असेल तर त्यांचा फारच उपयोग होईल. या मंडळींनीं दर रविवारीं किंवा फुरसतीच्या दिवशीं कांहीं कुटुंबांना भेटी द्याव्यात, त्यांचीं सुखदुःखें विचारावींत. त्यांच्या सुखांत त्यांचे वाटेकरी व्हावें व दुःखांतही वाटेकरी होऊन तें हलकें करण्याचा प्रयत्न करावा, हाच तुकारामाचा महाराष्ट्र धर्म आहे. त्याच्या प्रसाराला कोण विरोध करील ?

आरोग्याची वाढ व्हावी यासाठीं जशी आरोग्यमंडळाची स्थापना झाली व त्याचे मार्फत थोडें थोडें काम होऊं लागलें, त्याचप्रमाणें धार्मिक मंडळ स्थापन होणें जरूर होतें. परंतु या कामीं घाई न करितां मंडळ स्थापण्याचें काम पुढें करावयाचें, शक्य तर कुटुंबाकुटुंबामध्यें प्रथम भजन करावयाचें, अशी लहानशी सुरवात आम्ही केली. दुर्गाकाकूंना पाटलांचे घराण्याचा थोडा परिचय झाला होता. तेथेंच पहिलें भजन करण्याचें आम्ही ठरविलें. फारसा मोठा समुदाय गोळा न करतां पाटलांचे शेजारीं व आमचे घरची मंडळी याशिवाय फारसे कोणी बोलावण्यांत आले नाहीं. दुर्गाकाकूंनीं एक अभंग म्हटला. दिनूकाकांनीं खालील अभंग म्हणून त्यावर निरूपण केलें.

राग—प्रभाति

जाग जाग मज निंद न करिये, अब तो रोषन होया रे ॥ जो जागा सो अमृत चाखा जो सोया तिन खोयारे ॥ धृ ॥ लाख लाख की घडी जात है, पाइ पलंग क्यौं सोया रे । हीरे जैसा

जनम अमोलक कवडी बदले खोया रे ॥ १ ॥ काल नगारा शिरपर वाजे क्यौं कर गाफिल सोया रे ॥ कहे बलिराम संतकने संग मन-मल क्यौं ना धोया रे ॥ २ ॥

---

# उपसंहार

वडगांवच्या शाळेची एथपर्यंत झालेली प्रगती वाचकांच्यापुढें ठेविली आहे. ही हकिकत लिहिण्याचा मुख्य उद्देश माझे शिक्षक मित्रांना त्यापासून थोडा बोध व्हावा हा आहे. आज शाळेकडे सरकारचें लक्ष नाहीं, स्कूलबोर्ड किंवा लोकलबोर्ड त्याकरितां विशेष धडपड करीत नाहीं, लोकांनाही शाळेबद्दल प्रेम वाटत नाहीं. सर्वांनीं अशा रीतीनें हयगय केली तरी शिक्षकाला तशी हयगय करतां येणार नाहीं, अशाही बिकट परिस्थितींत त्यांनीं प्रयत्न केल्यास गांवकऱ्यांना आपल्या बाजूला वळवितां येईल. शाळा कोणाची नसली तरी ती शिक्षकाची खास आहे. **ही माझी शाळा** असें प्रेम त्यानें शाळेवर केलें तर गांवकरीही मदत देण्यास तयार होतील. गांवच्या लोकांना मोठेपणा देऊन पुष्कळ गोष्टी शिक्षकांना गांवकऱ्यांकडून करून घेतां येतील.

सरकारच्याही होत असलेल्या चुका जातां जातां दाखविल्या आहेत. प्राथमिक शिक्षणाचा दोषी कायदा शक्य तितक्या लवकर सुधारला पाहिजे. शिक्षकाशिक्षकांमध्यें अलौन्स खाणारा हा हेडमास्तर व हा असिस्टंट, हा १९२३ चे पूर्वींचा तर हा १९२३ चे नंतरचा, असे नसते भेद उत्पन्न होऊन समानता नष्ट झाली आहे. बोर्ड कोणत्या हेतुनें कार्य करीत आहे हें न पाहतां कायद्यांची कठोर अंमल बजावणी

होत आहे. लोकल बोर्ड, इन्स्पेक्टर, असि० इन्स्पेक्टर, डायरेक्टर या अधिकाऱ्यांचा स्कूल-बोर्डाचे कारभाराशीं संबंध येत असल्यामुळें नाना प्रकारची माहिती व याद्या पुरविण्यांतच स्कूलबोर्ड ऑफिसचा वेळ खर्च होऊं लागला आहे.

आहे या पद्धतीनें शिक्षण चालल्यास त्याचा मगदूर दिवसानुदिवस कमी होण्याचा संभव आहे. लहान लहान गांवांतून शाळा सुरू होणार नाहींत. आहेत त्या हळू हळू बंद होतील कारण वर्षभर न चाललेल्या शाळांचा खर्च ऑडिटखातें नामंजूर करीत आहे. शिक्षण प्रसार व्हाव-याचा असेल तर लोकांनीं शिक्षणाचें कार्य हातीं घेतलें पाहिजे. बोर्डाच्या हातून तें होणार नाहीं. हळू हळू सर्व ठिकाणीं ग्रँट इन-एड प्राथमिक शाळा सुरू झाल्या पाहिजेत व या शाळांना प्रत्येक मुला-मागें ८ ते १० रुपयांपर्यंत मदत दिली गेली पाहिजे. राजकीय हक्क मिळत आहेत. परंतु ते योग्य रीतीनें बजावण्यास प्रजा साक्षर व्हावयास पाहिजे, ही गोष्ट कळत असूनही वळत नाहीं, याचें आश्चर्य वाटतें.

शिक्षकाचे कार्यांत अडचणी आहेत ही गोष्ट मी जाणून आहे. त्यांना दिनूकाकासारखा मार्गदर्शक नेहमींच लाभेल असें नाहीं; परंतु मार्गदर्शक शोधण्याचा ते कधीं प्रयत्न करतात का? शिक्षणविषयक, आरोग्यरक्षक, धार्मिक, सामाजिक सर्व प्रकारची चळवळ एकदम होणार नाहीं. परंतु पुस्तकांत सुचविलेल्या मार्गाचा अवलंब केल्यास व गांवकऱ्यांचें लक्ष गांव सुधारणेकडे वळविल्यास काय होणार नाहीं? गांवकऱ्यांमध्यें कार्य करण्याची ताकद आहे. परंतु त्यांचे ठिकाणीं कार्याची इच्छा उत्पन्न करून कार्याला उद्युक्त करणाऱ्या, योजकाची जरूरी आहे. हें कार्य शिक्षक करूं शकणार नाहीं काय?

---

११९४६
IRBK-0111946